म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं.

# औद्योगिक सहकारदर्शन

कृष्णाजी भाऊराव देशपांडे

REFBK-0012673

१०७८९६
७८३०८
११।३।६९
९।८
८५८

सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासेस व डिप्लोमा परीक्षेसाठी महाराष्ट्र स्टेट
को-ऑपरेटिव्ह युनियनच्या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें लिहिलेले

# औद्योगिक सहकार-दर्शन

७८३०८
११।३।६९
८५८

लेखक

कृ.

लेक्चरर, ...य

REFBK-0012673

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

किंमत तीन रुपये

चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणें २

मुद्रक : प्र. भा. काळे,
प्रतिभा मुद्रणालय,
टिळक रस्ता, पुणे २.

प्रथमावृत्ती : २२-२-६३,
महाशिवरात्र.

प्रकाशक : दे. श्री. जोशी, व म. द. लोखंडे
चिरंजीव ग्रंथ प्रकाशन,
टिळक रस्ता, पुणे २.

# प्रस्तावना

भारताच्या पंचवार्षिक योजनेत सहकारी चळवळीला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. स्वतंत्र भारताची सामाजिक व आर्थिक विधायक पुनर्रचना करण्यासाठी ग्रामीण भागातील छोट्या व मोठ्या धंद्याचा विकास होणे जरूर आहे. निरनिराळ्या उद्योगधंद्यांचा विकास करण्यासाठी व ग्रामोद्योगासंबंधी सरकारला सल्ला देण्यासाठी नेमलेल्या मंडळानेही ग्रामीण भागात काही धंद्यांची वाढ सहकारी पद्धतीने करतां येईल असा निर्वाळा दिलेला आहे. त्याला अनुसरून आता औद्योगिक सोसायट्यांची झपाट्याने वाढ होऊ लागली आहे.

ग्रामीण भागातील कारागीर लोक आपल्या संघटना सहकारी तत्वावर करून आपल्या धंद्यासाठी औद्योगिक सोसायट्या स्थापन करू लागले आहेत. परंतु या सोसायट्या कशा चालवाव्यात याचे शिक्षण त्यांच्या चिटणिसाला देणे हे तितकेच महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्रराज्य सहकारी संघाकडून प्रत्येक जिल्ह्यांत औद्योगिक सोसायट्यांच्या चिटणिसाकरिता को. ऑप. ट्रेनिंग इन्स्ट्रक्टर्सकरवी १९४९ सालापासून औद्योगिक सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासेस घेतले जात आहेत. त्याचप्रमाणे खादी आणि ग्रामोद्योगतर्फे सहा महिन्यांचे औद्योगिक डिप्लोमा वर्गही चालविण्यात येतात. यासाठी तयार केलेल्या अभ्यासक्रमाला धरून लिहिलेले मराठीत एकही पुस्तक नाही. त्यामुळे शिकविणाऱ्या शिक्षकांची व त्याचप्रमाणे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची खूपच कुचंबणा होत होती. या वर्गात शिकविण्यात येणारा औद्योगिक सहकार हा विषय विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टीने सोपा जावा म्हणून व माझ्या अनेक स्नेह्यांनी आग्रहाने पत्रे पाठवून सुचविल्यावरून मी सदर पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचा फायदा औद्योगिक सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासमधील विद्यार्थी, लोअर डिप्लोमा कोर्सचे औद्योगिक सहकार विषय घेतलेले विद्यार्थी व खादी आणि ग्रामोद्योग औद्योगिक सहकारी शिक्षणवर्ग प्रमाणपत्र परीक्षेचे विद्यार्थी यांना जरूर होणार आहे.

औद्योगिक सहकार विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांची पाठ्य पुस्तकाभावी होणारी कुचंबणा अंशतः दूर करण्याच्या हेतूने ' औद्योगिक सहकार दर्शन ' हें पुस्तक मुद्दाम लिहिले आहे. सदरपुस्तक दोनतीन वर्षांपूर्वीच लिहून तयार होते. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळें ते प्रसिद्ध करता आले नाही.

प्रतिभा छापखान्याचे उत्साही मालक मेसर्स जोशी आणि लोखंडे यांनी पाठीमागे निकड लावून पुस्तक पुरे करण्यास भाग पाडले व उशीरा का होईना सदर पुस्तक प्रसिद्ध करण्याचा योग आणून दिला. याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद ! ! त्यांनी निकड लाविली नसती तर पुस्तक अद्यापीही प्रसिद्ध झाले नसते. पुस्तकाचे मूल्यमापन करण्याचे काम मी वाचकावरच सोपवितो. वाचकांनी पुस्तकातील उणीवा नजरेस आणून दिल्यास किंवा विधायक सूचना केल्यास त्यांचा पुढील आवृत्तीत जरूर विचार केला जाईल.

लेखक

# अनुक्रमणिका

प्रकरण पान

१. आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मुख्य स्वरूप १

२. मोठे उद्योगधंदे, छोटे उद्योगधंदे, ग्रामोद्योग व गृहद्योग ४

‘ ग्रामीण ’ उद्योगधंदे म्हणजे काय ? ( ४ ). छोटे उद्योगधंदे म्हणजे काय ? ( ४ ). ‘ घरगुती ’ उद्योगधंदे ( ५ ). ‘ घरगुती ’ उद्योगधंद्याचा इतिहास ( ६ ). ग्रामीण अर्थव्यवस्थेत उद्योगधंद्याचे स्थान ( ६ ). परकीय सत्तेचे घरगुती उद्योगधंद्यावरील परिणाम ( ६ ). घरगुती उद्योगधंद्याच्या अडचणी ( ७ ). घरगुती धंद्याचे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत स्थान ( ८ ). काही महत्त्वाचे व ठळक घरगुती उद्योगधंदे ( ९ ).

३. खेड्यातील उद्योगधंदे खालावण्याची कारणे. १६

ग्रामीण अर्थव्यवस्थेत आलेला विस्कळीतपणा ( १६ ). खेड्यातील उद्योगधंद्याची आजची परिस्थिति ( १७ ). लहान उद्योगधंद्याची राष्ट्राला आवश्यकता ( १७ ). सहकारी तत्त्वावर लहान उद्योगधंद्याची उभारणी ( १८ ).

४. औद्योगिक सोसायट्या १९

औद्योगिक सहकारी बँक ( २४ ). जंगलकामगारांची सोसायटी ( २७ ). को-ऑर्डिनेशन कमिटी ( ३५ )

उत्पादक सहकारी सोसायट्यांचे वेगवेगळे प्रकार आणि त्यांची वैशिष्ट्ये ३६

स्वतःचा कारखाना ( वर्कशॉप ) चालविणारी सोसायटी ( ३६ ). आपापल्या घरी काम करणाऱ्या कारागिरांची सोसायटी ( ३६ ). वेगवेगळ्या खेड्यात राहाणाऱ्या कारागिरांची सोसायटी ( ३६ ). मजुरीचा ठेका घेणाऱ्या संस्था ( ३७ ). वेगवेगळ्या कारागिरांची मिश्र संस्था ( ३७ ). कारागीर

| | | |
|---|---|---|
| | कच्च्या मालाचे उत्पादक यांची संमिश्र संस्था ( ३८ ). उत्पादक व ग्राहक यांची संयुक्त सोसायटी (३८). वाहतुक करणाऱ्या सोसायट्या ( ३९ ). | |
| | उत्पादक किंवा मजूर यांच्या सहकारी सोसायट्या चालविताना लक्षात ठेवावयाच्या काही गोष्टी. | ३९ |
| ५. | उत्पादक सोसायट्यांची इतर देशांतील काही माहिती | ४१ |
| ६. | जिल्हा औद्योगिक सहकारी संघ | ४५ |
| | प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रियल को० असोसिएशन मुंबई | ४९ |
| ७. | खरेदीविक्रीसंबंधी कांही विचार | ५२ |
| | कच्च्या मालाची व यंत्रे. अवजारांची घाऊक खरेदी करणें (५४). मालाची प्रतवारी लावणें (५५). मालाचा वाण, रंग वगैरे सुधारणे ( ५५ ). उत्पादनाची विक्री स्थानिक बाजारात करणे ( ५६ ). मालाची दूरवर विक्री करणें ( ५६ ). आधुनिक धंद्याची पद्धत (५७). वजने मापे सर्वत्र एकसारखीच वापरणे ( ५८ ) वाहतुकीसंबंधाचे काही विचार ( ५९ ). जाहिराती देणे व प्रदर्शन भरविणे ( ६१ ) | |
| ८. | औद्योगिक सहकारी सोसायट्यांना भांडवलपुरवठा | ६२ |
| | कर्जाची कारणे (६२) परिस्थितीप्रमाणे कर्जाचे प्रकार (६३). कर्ज मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी ( ६३ ). कच्च्या मालाची खरेदी ( ६४ ). मजुरांची मजुरी व स्वतःचा खर्च (६४). मालाचा साठा व विक्रीसाठी मदत ( ६४ ) | |
| ९. | ग्रामीण उद्योगधंद्यास सरकारची मदत व सहाय्य | ६२ |
| | वैयक्तिक कारागिरांना आर्थिक सहाय्य ( ६९ ). खरेखुरे कारागीर (७०). पिढीजात कारागीर (७०). मागासलेल्या वर्गांना सहाय्य ( ७० ). उद्योगधंद्यांना राज्यातर्फे मदत देण्यासंबंधीच्या नियमांखाली देण्यात येणारे आर्थिक सहाय्य ( ७१ ). औद्योगिक सहकारी संस्थांना कर्ज ( ७१ ). औद्योगिक सहकारी संस्थांना सेंट्रल बँकामार्फत खेळत्या भांडवलाकरिता कर्ज ( ७२ ) | |

१०. औद्योगिक सहकारासंबंधी शिफारशी ७२

इंटर नॅशनल प्लॅनिंग टीम ( ७२ ). वस्त्रव्यवसाय चौकशी समिती ( कानुंगो समिती ) ( ७३ ). कर्वे समितीच्या शिफारशी ( ७५ ).

११. ग्रामोद्योग शिक्षण आणि आर्थिक मदत ७७

अखिल भारतीय खादी ग्रामोद्योग कमिशन (७७). खादी उद्योग (७८). आगपेट्या तयार करणें (८१). कुंभार काम (८२). अखाद्य तेल व साबण उद्योग (८४). ग्रामीण चर्मोद्योग (८६). ग्रामीण तेल उद्योग (८८). हातकागद उद्योग (९०). गूळ व खांडसारी उद्योग (९२). ताडगूळ उद्योग (९३). हातकुटाईचा तांदूळ उद्योग (९४). आटाचक्की उद्योग (९५). मधमाशा पाळण्याचा उद्योग (९५). तंतुउद्योग(९६).

न्. क. 92८03

# औद्योगिक सहकारदर्शन

## १. आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मुख्य स्वरूप

भारतामधील आर्थिक प्रश्न अनेक गुंतागुंतीचे आहेत. त्यापैकी काही प्रश्न अत्यंत महत्त्वाचे असून ते आपल्या जीवनाशी निगडीत अशा प्रकारचे आहेत. जीवनाशी निगडीत असलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांवर नीट विचार करून जर आपण आपली बाजू समजावून घेतली नाही, तर भारताची अर्थव्यवस्था कोलमडल्याशिवाय राहाणार नाही.

भारत हा खेड्यांचा देश असून त्यात राहाणारी बहुसंख्य जनता ही शेतकरीवर्ग आहे. अर्थात आपल्या देशाची सुधारणा करणे म्हणजेच खेड्यांची सुधारणा करणे होय. खेड्यांची सुधारणा करण्याकरिता खेड्यांची पुनर्रचना करणे अत्यंत जरूर आहे.

आज आपल्या देशात अनेक प्रश्न आहेत. त्यांपैकी सर्वात मोठा व महत्वाचा प्रश्न म्हणजे लोकांचे दारिद्र्य होय. शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या सारखी वाढत असून पीक उत्पादन होणाऱ्या जमिनीचे आपापसांतील भांडणामुळे लहानलहान तुकडे होत आहेत. या वाढत्या लहान तुकड्यांमुळे शेतीचा धंदा दिवसेंदिवस अधिक कष्टाचा व कमी फायद्याचा होऊ लागला आहे. पाटबंधारे अतिशय कमी असल्यामुळे देशातील बऱ्याच भागातील शेतकऱ्यांना अनिश्चित अशा पावसावरच अवलंबून राहावे लागत आहे. भारतात शेकडा ७० लोक शेतीवर अवलंबून आहेत. ग्रेट ब्रिटनमध्ये शेतीमध्ये गुंतलेले लोक फक्त ७ टक्के दिसतील.

कोट्यावधी माणसांना इतरत्र कामधंदा नसल्यामुळे प्रमाणापेक्षा जास्त इसमांना शेतीवरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी पडण्याचे हे एक कारण आहे. यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने शेती करण्याची योजना झाली पाहिजे. मात्र ती आखताना शेतकी योजना व औद्योगिक योजना यांची परस्पर सांगड घालून त्या एकमेकांना पूरक होतील अशा त्या झाल्या पाहिजेत.

पूर्वी खेडेगावात विणकर, कुंभार, चांभार, सुतार, तेली वगैरे लोकांचे

उद्योग स्वावलंबी होते. बारा बलुत्यांची पद्धत म्हणून जी ओळखली जात होती ती आज पूर्णपणे विस्कळीत होऊन खेड्यांतील प्रत्येक कारागीर आज शहरातील कारखान्याकडे धाव घेऊ लागला आहे. शहरातील कारखान्यांमध्ये सुद्धा त्याला पूर्ण काम मिळू शकत नाही. त्यामुळे शहरात स्थापन झालेले मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंदे फारसे उपयुक्त नाहीत असे म्हणण्याची पाळी येते. परंतु याच्या उलट बराचसा शेतकरीवर्ग आपली शेती सोडून शहरातील कारखान्याकडे जाऊ लागला, त्यामुळे सुतार-लोहार वगैरे कारागीर लोकांचे व्यवहार नीट चालेनासे झाले, ग्रामीण अर्थव्यवस्थेची स्वावलंबी योजना मोडण्याच्या पंथास लागली. तरी सुद्धा गुणवान् पिढीजाद कारागिरांच्या चांगुलपणामुळे अद्यापही काही ग्रामोद्योग खेड्यात मूळ धरून राहिले आहेत.

यंत्रामुळे उत्पादनात जरी वाढ होत असली तरी परिणामी ती असंतुष्टपणा निर्माण करणारी ठरते. जरी आपण आपल्या सर्व गरजा यंत्रांच्या साह्य ने भागविण्याचे ठरविले तरी हिंदुस्थानात शेती व ग्रामोद्योग यावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या एवढी मोठी आहे की, मोठ्या व छोट्या उद्योगधंद्यांत सामावून सुद्धा ती बरीच उरणारी अशी आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे जरी आपणास लागणाऱ्या आवश्यक वस्तूंचे सर्व उत्पादन हिंदुस्थानात करण्याचे ठरविले तरी देखील शेती व ग्रामोद्योग या धंद्यांवर अवलंबून असलेल्या असंख्य जनतेपैकी अत्यंत थोड्या शेकडेवारीचा समावेश मोठ्या व लहान उद्योगधंद्यात होईल व बाकीची जनता तशीच निरुद्योगी व बेकार राहील.

हिंदुस्थानात मजुरांची कमतरता नसून खरा अभाव भांडवलाचा आहे. पाश्चिमात्य देशांत हीच परिस्थिति नेमकी उलट आहे. मजुरांना कामधंदा मिळवून देणे ही बाब राष्ट्रीय योजनेमध्ये समाविष्ट केलेली आहे. त्याच दृष्टीने पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये या गोष्टीला महत्त्व देण्यात आले असून मुंबई सरकारने १·०३ कोट रुपये खास ग्रामोद्योगाच्या विकासासाठी बाजूला काढून ठेविले होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत या प्रश्नास प्राधान्य दिले असून, बेकारांना काम मिळवून देणे हा एक महत्त्वाचा उद्देश समोर ठेवला होता.

अशा प्रकारे जरी मोठे उद्योगधंदे चालू राहिले तरी लाखो श्रमजीवी मजुरांच्या अन्नाचा प्रश्न त्यामुळे सुटू शकत नाही; म्हणून शेतीवर अवलंबून असणाऱ्या असंख्य लोकसंख्येला आपली रोजची मिळकत वाढविण्यास व जीवन कंठण्यास मदत होण्यासाठी ग्रामोद्योग हाच मदत करणारा असा मार्ग आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेची घडी नीट बसविण्यासाठी ग्रामीण विभागांतील शेतकऱ्यांना छोटे-मोठे उद्योगधंदे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

यांत्रिक उद्योगवाढीमुळे मजुरी कमीत कमी पडते. बाजारात मालाचा साठा भरपूर दिसतो. परंतु लोकात बेकारी व गरिबी असल्यामुळे मालाचा उठाव व्हावा तसा होत नाही व त्याचा फायदा गरीब जनतेला इच्छा असूनही घेता येत नाही. यासाठी धंद्यांचे विकेंद्रीकरण करणे जरूर आहे. खेड्यातील जनतेची आर्थिक परिस्थिति मोठ्या उद्योगधंद्यांमुळे सुधारणार नाही. कारण खेड्यातील बरीचशी जनता शेतकरी वर्गात आढळून येते व शेतीच्या धंद्याला उपयुक्त असा पूरक धंदा म्हणजे ग्रामोद्योग होय. ग्रामोद्योगाच्या वाढीमुळेच लोकातील क्रयशक्तीची वाढ होणार आहे व लोकातील क्रयशक्तीची वाढ म्हणजे ग्रामीण जनतेच्या आर्थिक पुनर्रचना करण्याचा मार्ग होय यावरून अर्थव्यवस्थेत, ग्रामोद्योगाचे कार्य किती मोठे व महत्त्वाचे आहे हे लक्षांत येईल. थोडक्यात ग्रामोद्योग हाच ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या प्रमुख अंगापैकी एक आहे असे आपणांस म्हणता येईल.

सन १९५५ मध्ये प्रो. डी. जी. कव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या नियोजन समितीने एकंदर २६ ग्रामोद्योगांना मान्यता दिली असून, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत त्यांची अंमलबजावणी भारतसरकारने सुरू केली आहे. त्यापैकी काही ग्रामोद्योग पुढीलप्रमाणे आहेत:— १. हातमाग कापड, २. तेलघाणी, ३. भाताची हातसडाई, ४. लोकर विणकाम, ५. कातडी काम, ६. रेशीम विणकाम, ७. काड्याच्या पेट्या, ८. गूळ व खांडसारी, ९. मधुमक्षिका-पालन वगैरे.

ग्रामोद्योगाचे आजचे स्वरूप विचारात घेतल्यास असे दिसून येईल की, बहुतेक ग्रामोद्योग विस्कळीत झालेले असून जे थोडेफार आहेत ते विखुरलेले आहेत. त्यांची उत्पादन करणाची पद्धत ही मागासलेली असून ती कमी उत्पादनाची आहे. याशिवाय भांडवलाचा अभाव, कमी कसब, यंत्रउत्पादनामुळे चढाओढ व त्यामुळे बाजारपेठ कमी; बाजार सुसंघटित नसल्यामुळे गळचेपी, कर्ज मिळ-ण्याची व्यवस्था नाही. हे स्वरूप पालटावयाचे असेल तर ग्रामोद्योगाची पुनर्रचना झाली पाहिजे व त्याकरिता आपणांला भांडवल, मजूर, कसबी शिक्षणाची व्यवस्था आणि बाजार या चार गोष्टींचा विचार केला पाहिजे. या चारही दृष्टीने विचार करता सहकार या एकाच उपायाने या सर्व बाबतीत पुन-र्घटना करणे आज शक्य आहे.

ग्रामोद्योग वाढविण्यासाठी मदत करणाऱ्या आज पुढील सहकारी संस्था आहेत—( १ ) प्रांतिक औद्योगिक सहकारी संघ. ( २ ) जिल्हा औद्यो-

गिक सहकारी बँक. ( ३ ) जिल्हा औद्योगिक सहकारी संघ. ( ४ ) प्राथमिक औद्योगिक सहकारी सोसायट्या.

या संबंधाने विचार आपण पुढे करणारच आहोत.

### स्वाध्याय

( १ ) ग्रामोद्योगाचे आजचे स्वरूप सांगा.

( २ ) ग्रामीण अर्थव्यवस्थेची प्रमुख अंगे कोणती ?

( ३ ) ग्रामोद्योगाची पुनर्घटना सहकारी पद्धतीवर कशी करता येईल ?

( ४ ) भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सध्याचे स्वरूप समजावून सांगा व ग्रामीण भागामध्ये ग्रामीण उद्योगधंद्यांची वाढ होणे का आवश्यक आहे ?

( ५ ) कर्वे कमिटीसंबंधी माहिती लिहा.

◆◆◆

## २. मोठे उद्योगधंदे, छोटे उद्योगधंदे, ग्रामोद्योग व गृहोद्योग

१. "ग्रामीण" उद्योगधंदे म्हणजे काय ?—यांत्रिक युगाचे आगमनापूर्वी सर्व उद्योगधंदे मानवी अगर जनावरांच्या शारीरिक बळाच्या जोरावर चालविले जात. कारखानदारी ही कल्पनाच तेव्हा अस्तित्वांत नव्हती. अशा काळी साहजिकच "ग्रामीण उद्योगधंदे" या शब्दसमुदायाची व्याख्या काय असा प्रश्नच उद्भवला नाही; पण जेव्हा यांत्रिक किंवा विजेच्या जोरावर उद्योगधंदे चालू लागले व ग्रामीण छोटे कारागीर व कारखानदार यांच्या हितसंबंधांचा संघर्ष होऊ लागला तेव्हा खरोखरीच "ग्रामीण व छोटे उद्योगधंदे" यांचा निश्चित व नेमका अर्थ काय हे ठरविण्याची आवश्यकता सरकारला व अर्थतज्ज्ञाला भासू लागली. सर्वांस मान्य होणारी व अत्यंत शास्त्रशुद्ध व बंधनकारक व्याख्या करणे फार कठीण आहे. तथापि खालील व्याख्या आपण ग्राह्य मानण्यास हरकत नाही–"स्वतःच्या कुटुंबातील व आप्तातील माणसांच्या सहकार्याने व क्वचित् प्रसंगी नऊपेक्षा कमी नोकर नेमून वीज अगर कोणतीहि मानवेतर शक्तीचा वापर न करता, मालकाचे घरात अगर छोट्या कारखान्यात चालविलेला धंदा."

२. छोटे उद्योगधंदे म्हणजे काय ?—कित्येकदा सरकारला प्रचलित अशा काही उद्योगधंद्यांना सवलती देणे जरूर वाटते. अशा वेळी "छोटे उद्योगधंदे" म्हणजे नेमके काय ही गोष्ट ठरविणे क्रमप्राप्त होते. "वीज अगर इतर अन्य शक्तींचा अंवलब करून किंवा केवळ मानवी शक्तीचाच वापर करून, रु. ३०,००० च्या आत ज्यात भांडवल गुंतविलेले आहे व जेथे कामगाराची

संख्या ५० पेक्षा अधिक नाही अशा उद्योगधंद्यास छोटे उद्योगधंदे अशी संज्ञा देण्यास हरकत नाही. "छोट्या" उद्योगधंद्यांच्या संज्ञेमध्ये "ग्रामीण" उद्योगधंद्यांचा समावेश होतो हे उघड आहे; तथापि "ग्रामीण" उद्योगधंद्यांसंबंधी काही खास वैशिष्ट्ये लक्षात ठेवणे जरूर आहे. ती येणेप्रमाणे—(१) वीज अगर इतर मानवेतर शक्तींचा उपयोग ग्रामीण धंद्यात केला जात नाही. (२) कामगारांची संख्या ९ पेक्षा कमी असते. (३) त्यांना फॅक्टरी ॲक्ट लागू नाही. (४) कारखान्याची जागा साधारणतः उत्पादकाचे घर हीच असते. (५) फक्त स्थानिक गरजेला पुरेल इतकाच माल तयार केला जातो. (६) उत्पादक हा निव्वळ व्यवस्थापकाचें काम न करता प्रत्यक्ष कामकाजात, इतरांच्या बरोबरीने, भाग घेतो. (७) अवजड व अद्ययावत् यंत्रसामग्री न वापरता फक्त जरूर तेवढी हत्यारे वापरली जातात.

मोठे उद्योगधंदे—ज्या ठिकाणी कामाचे स्थळ कारखाना असून कामगारांची संख्या ५०चे वर असते, जेथे विद्युत्शक्तीचा भरपूर उपयोग केला जातो व भांडवल ३० हजारांचे वर असते, अशा उद्योगधंद्यांना मोठे उद्योगधंदे म्हणतात.

३. "घरगुती" उद्योगधंदे—उद्योगधंद्यांचे वरीलप्रमाणे केलेले वर्गीकरणही समाधानकारक नाही असे अनुभवांती दिसून येते. काही धंदे कोणत्याही सदरात येऊ शकत नाहीत. कामगारसंख्या, शक्ति व भांडवल या तीन गोष्टींच्या कमीजास्ती होण्यावर हे वर्गीकरण अवलंबून आहे. वीज जशी जशी स्वस्त मिळू लागली तसा तिचा "ग्रामीण" उद्योगधंद्यांमध्ये सुद्धा उत्पादनाच्या कामी वाढता वापर होऊ लागला. विजेच्या उपयोगामुळे ग्रामीण उद्योगधंद्यांची कार्यक्षमता व उत्पादन या दोन्हीहि गोष्टींची वाढ होऊन माल ग्राहकांना स्वस्त दरात देणे शक्य होऊ लागले. सरकारच्या विद्युत्-उत्पादन योजनांची जशी वाढ होऊ लागली तशी तशी उद्योगधंद्यांचे वरील वर्गीकरणाची पद्धत निरुपयोगी ठरली. पुष्कळ विचारविनिमयानंतर मुंबई सरकारने घरगुती उद्योगधंद्यांची व्याख्या स्वीकृत केली आहे.

"घरगुती" उद्योगधंदे हे तीन वैशिष्ट्यांनी ओळखले जातील :— (१) कामगारसंख्या नऊपेक्षा कमी असणे. (२) कायम यंत्रसामुग्रीत गुंतवलेली रक्कम रु. ६००० पेक्षा जास्त नसणे. या व्याख्येमध्ये कारखान्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या "शक्ती" चा उल्लेख टाळलेला आहे ही लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट आहे. या व्याख्येमध्ये समाविष्ट न केलेल्या पण गृहीत धरलेल्या काही गोष्टी आहेत. घरगुती उद्योगधंदे स्थानिक बाजारपेठेच्या उपयोगासाठीच उत्पादन करतात, त्यांनी उपयोगात आणलेली यंत्रे सोपी व

अत्याधुनिक नसतात, त्यांमध्ये फक्त स्थानिक पेठेतच मिळणाऱ्या कच्च्या मालाचा उपयोग केला जातो, मजुरांची हलवाहलव (म्हणजेच बेकारी) होण्याचे कारण नसते.

४ "घरगुती" उद्योगधंद्यांचा इतिहास—ज्ञात इतिहासकाला-पासून हे धंदे आपल्या देशात चालू होते व ते भरभराटीला आले होते. प्राचीन काळी भारताच्या वैभवाची ख्याती परदेशात पोहोचली, याची जी अनेक कारणे आहेत त्यात येथील सुसूत्र व संघटित घरगुती धंदे हे एक प्रमुख कारण आहे. सिंधूच्या खोऱ्यात किंवा इजिप्तमध्ये केलेल्या भूखननामध्ये भारतीय घरगुती धंद्यांतील तयार वस्तूंचे अवशेष दिसून आले—विशेषतः लोकरविण-कामाचे व भरतकामाचे. इजिप्तचे विलासी राजे भारतीय मखमलीचा विपुल उपयोग करीत. या मखमलीचे नमुने मसाले घालून जपून ठेवलेल्या इजिप्तच्या राजघराण्यांतील लोकांच्या अंगावर पाहावयास सापडतात. प्राचीन हिंदुस्थानात प्रवास करणाऱ्या पाश्चिमात्य व पौर्वात्य प्रवाशांनी देखील भारतीय मालाचे यथोचित गुणगान केले आहे. कापूस, लोकर व रेशमी विणकाम, कापड-रंगणी व छपाई; धातू, दगड व लाकूडकाम या सर्व घरगुती धंद्यांमध्ये आपला देश त्या काळी अग्रेसर होता.

५. ग्रामीण अर्थव्यवस्थेत उद्योगधंद्यांचे स्थान—परठिकाणची मदत न घेता सुखाने कालक्रमण करणारे स्वयंपूर्ण केंद्र म्हणजे हिंदी खेडेगाव. येथे खेडुतांच्या गरजा व उद्योगधंदे यांचा सुरम्य संगम झाला होता. ग्रामीण कलाकार हा खेडुतांचा एक अविभाज्य घटक होता. या गोष्टीचे एक प्रत्यंतर म्हणजे तेव्हा प्रचलित असलेली बलुतेदारी पद्धत. ग्रामीण कलावंताचे जीवन स्थिर व्हावे म्हणून त्यांना जमिनींची वतनेहि तोडून दिल्याची उदाहरणे आहेत. महत्त्वाकांक्षी व विशेष हुशार कलावंत खेडेगावचे क्षेत्र अपुरे वाटले तर राजदरबारी जात.

६. परकीय सत्तेचे घरगुती उद्योगधंद्यांवरील परिणाम—ग्रामीण कलाकाराचे हे सुखी जीवन परकीय ब्रिटिश सरकारचा अंमल बसल्यामुळे विराम पावले. "व्यापार" हाच अर्थव्यवस्थेचा ध्येयबिंदू ठरल्यामुळे ग्रामीण कलाकाराची अर्थव्यवस्था कोलमडली. यांत्रिक युगाच्या उदयामुळे तर त्याची आर्थिक परिस्थिति केवळ शोचनीय झाली. आश्रय देणाऱ्या मांडलिक सरदार-दरखदारांची आवडसुद्धा परकीय राज्यकर्त्यांच्या दडपणामुळे, पाश्चिमात्य धर्तीची झाल्यामुळे ग्रामीण कलाकारांचा तो आधार तुटला. १९०५ सालच्या स्वदेशी चळवळीचासुद्धा काही फायदा घरगुती उद्योगधंद्यांना म्हणावा तसा मिळाला नाही. ग्रामीण कलाकार उद्योगविहीन झाल्यामुळे केवळ जमिनीवर अवलंबून राहणाऱ्यांचे प्रमाण शे ६१% हून शे. ७३% वर गेले ! महात्मा गांधींच्या

परिणामकारक प्रचारामुळे अखेरीस परकीय ब्रिटिश सरकारचे लक्ष अपेक्षित घरगुती धंद्याच्या प्रश्नाकडे सन १९२० च्या सुमारास वेधले गेले. पण घरगुती धंद्यांच्या पुनरुत्थानाच्या प्रश्नाची व्याप्ति एवढी मोठी आहे की, गेले ३०-३५ वर्षे प्रयत्न करूनही सरकारला यामध्ये उल्लेखनीय यश लाभले नाही.

७. **घरगुती उद्योगधंद्यांच्या अडचणी** :— घरगुती उद्योगधंद्यांच्या अधोगतीची कारणे फार लांबवर पसरलेली आहेत. आपण काही प्रमुख व ठळक अडचणींचाच येथे विचार करू.

**( अ ) अज्ञान** :— कातडी कमाविणे, दोर वळणे, वांबूकाम हे धंदे एका विशिष्ट जातीतलेच लोक करीत असल्यामुळे व वंशपरंपरा ते चालत आल्यामुळे या क्षेत्रात नवीन माणसे आली नाहीत व असणारे कलावंत अज्ञानी राहिल्यामुळे त्यांनी आपल्या परंपरेच्या धंद्याचा विकास केला नाही. नवीन यंत्रसामुग्रीच्या चांगल्या कच्च्या मालाचा उपयोग केला नाही.

**( ब ) संशोधनाचा अभाव** :— परकीय सरकाराने मोठ्या उद्योगधंद्यांच्या बाबतीत संशोधन करणाऱ्या संस्थांना काही सहाय्य केले पण छोट्या घरगुती धंद्यांच्या संशोधनाकडे मात्र दुर्लक्ष्य केले. संघटणेच्या अभावी ग्रामीण कलावंतांना स्वतःच्या तांत्रिक शिक्षणाची सोय करून घेता आली नाही. दर क्षणाला बाह्यजग संशोधनाच्या बाबतीत पुढे पाऊल टाकीत असताना आमचा भारतीय ग्रामीण कलावंत मात्र मागेच राहिला.

**( क ) सावकारी पाश** :— आर्थिक दैन्यावस्थेमुळे, ग्रामीण कलावानांस त्यास लागणारा कच्चा माल घाऊक दराने व मोठ्या प्रमाणावर घेता येत नाही व हा खरेदीचा प्रश्न त्याला सावकाराच्या मध्यस्थीने सोडवावा लागतो.

**( ड ) विक्रीची गैरसोय** :—मध्यस्थामार्फत माल विकणाऱ्या कलाकाराला फारच थोडा फायदा उरतो कारण फायद्याचा मोठा हिस्सा कमिशन व दलाली यांवर खर्च होतो. तयार होणाऱ्या मालाचा दर्जा एकसा खास न ठेवल्यामुळे योग्य ती प्रसिद्धीची व्यवस्था न केल्यामुळे व नवीन नवीन बाजारपेठांचा शोध न केल्यामुळे ग्रामीण कलावंतांच्या अडचणीत नित्य नवीन भर पडत गेली.

**( ई ) आर्थिक अडचण** :— उद्योगधंद्यांत गुंतलेल्या माणसाला यंत्रे, हत्यारे, कच्चा माल यांसाठी पैसा लागतो. तसेच तयार मालाचा उठाव होईपर्यंत उदरनिर्वाहासाठी व धंदा चालू ठेवण्यासाठी खेळता पैसा हवा असतो. उधारीत माल अडवून पडल्यामुळे त्याच्या परिस्थितीची फार ओढाताण होते. जवळ रोकड नसल्यामुळे त्याला उधारीने व महागाईच्या दराने कच्चा माल विकत घ्यावा लागतो. व्याजाने पैसा उभा केला तर व्याजाचे दर भारी असतात.

(ड) **स्थानिक कर :—** घरगुती उद्योगधंदे विशेषत: खेडेगावात व लहान शहरात चालू असतात. आयात व निर्यात होणाऱ्या कच्च्या व पक्क्या मालावर स्थानिक म्युनिसिपालट्या व ग्रामपंचायती जबर कर घेतात. कित्येकदा हा कर लांबून माल आणावा लागला तर, एकापेक्षा अधिक स्थानिक संस्थांना द्यावा लागतो. याशिवाय राज्य व केंद्रीय सरकार कर आकारतात तो वेगळाच. थोडक्यात ग्रामोद्योगाच्या ऱ्हासाची कारणे पुढीलप्रमाणे देता येतील:— (१) कारागिरांचा अशिक्षितपणा व मागासलेपणा. (२) नवीन प्रयोग व संशोधनाचा अभाव. (३) कच्चामाल स्वस्त व पुरसा मिळत नाही. (४) कारागिरांनी तयार केलेला माल विकण्यासाठी पुरेशा सोई नाहीत. (५) भांडवलाचा अपुरेपणा व स्थानिक स्वराज्य संस्थांचा कराचा बोजा.

८. **घरगुती धंद्यांचे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत स्थान :—** पुष्कळांना असे वाटते की घरगुती उद्योगधंद्यांचे उत्पादन हिणकस असल्यामुळे ते मोठ्या कारखानदारीच्या स्पर्धेत टिकणार नाहीत व म्हणून घरगुती उद्योगधंद्यांना संरक्षण देणे म्हणजे पैशाचा अपव्यय होय. पण ही विचारसरणी बरोबर नाही. ग्रामीण कलाकारांची संघटना तयार केली व त्यांच्या अडचणींचे निराकरण केले म्हणजे त्यांच्या उत्पादित मालाची किंमत व दर्जा हा कारखान्यात तयार केलेल्या मालाप्रमाणेच होतो हे अनुभवसिद्ध आहे. स्थानिक गरजेनुसार उत्पादन केले तर घरगुती उद्योगधंद्यांचे भवितव्य निश्चित उज्ज्वल आहे. प्रचंड कारखान्यांचे अस्तित्व असूनसुद्धा पाश्चिमात्य राष्ट्रात छोटे, ग्रामीण व घरगुती उद्योगधंदे चालू आहेत ही एकच गोष्ट वरील विचारसरणी चुकीची आहे ही गोष्ट सिद्ध करण्यास पुरेशी आहे. भारतातसुद्धा अजून हे घरगुती धंदे चालू आहेत ही गोष्टहि या धंद्यांची आवश्यकता आहे हा विधानास पुष्टी देते. अपुऱ्या पाऊसमानामुळे आपला शेतकरी जास्तीत जास्त एका वर्षात ९ महिने शेतीकाम करतो. त्याने जर घरगुती उद्योगधंद्यांचा आश्रय घेतला तर शेतीचे काम होऊन त्याबरोबर त्याला इतरही एक उत्पन्नाचे साधन मिळेल व त्याचे राहणीचे मान वाढेल यांत शंका नाही. तसेच जर या आपल्या घरगुती धंद्यांचा नायनाट झाला तर वाडवडिलांपासून जतन केलेल्या व जोपासलेल्या कलेचा समाजाला व राष्ट्राला काहीहि उपयोग होणार नाही व बेकार होणारा हा ग्रामीण कलाकारांचा वर्ग अतज्ज्ञ कामकरीवर्गाचे जिणे जगेल. मागे एकदा केवळ शेतकीवर अवलंबून राहाणाऱ्या लोकसंख्येच्या वाढत्या प्रमाणाचा उल्लेख केला आहेच. हा जमिनीचा भार ग्रामीण धंद्यांची वाढ व संगोपन केल्यानेच कमी होईल. खेडेगावातील बेकारीलासुद्धा आळा घरगुती उद्योगधंद्यांना

प्रोत्साहन दिल्याने बसेल. आर्थिक व लष्करी दृष्ट्या औद्योगिकरणाचे विकेंद्रीकरणाची अपरिहार्यता ही अर्थतज्ञांनी मान्य केलेली गोष्ट आहे. हे धोरण अंमलात आणण्यास घरगुती उद्योगधंद्यांच्या वाढीइतके फलदायी दुसरे साधन आज उपलब्ध नाही. या बाबतीत जपानचे उदाहरण डोळ्यासमोर आहेच. जपानमध्ये तयार होणारा ६३% पक्का माल दहापेक्षा कमी कामगार असणाऱ्या घरगुती कारखान्यांतून तयार झालेला असतो! देशाचे हित मोठ्या व छोट्या उद्योगधंद्यांच्या स्पर्धेत नसून समन्वयांत आहे. काही बाबतीत तर छोटे व बडे उद्योगधंदे एकमेकांना पूरक आहेत. येथे पुन्हा जपानचेंच उदाहरण देणे भाग आहे. तेथे मोठ्या कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाचे ४० ते ५० टक्के भाग घरगुती कारखान्यांतून करविले जातात. आज आपल्या उदयोन्मुख व तरुण राष्ट्रपुरुषाला विणकर व गिरणीवाला, गाडीवान व बसमालक, कुंभार व ॲल्युमिनियमची भांडी करणारा कारखानदार, चांभार व शू फॅक्टरीचा धनी या सर्वांचीच आवश्यकता आहे व म्हणूनच राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत घरगुती उद्योगधंद्यांचे स्थान महत्त्वाचे व अढळ आहे.

९. काही महत्त्वाचे व ठळक घरगुती उद्योगधंदे :—(अ) हातमाग :—आपल्या महाराष्ट्र राज्यात सुमारे ५॥ लाखांच्या वर विणकर असून ते प्रतिवर्षी रु. २० कोटींच्यावर उलाढाल करतात. शेतीच्या व्यवसायानंतर हाच एक महत्त्वाचा धंदा या राज्यात आहे, या एकाच गोष्टीवरून या धंद्याचे महत्त्व कळून येईल. चादरीपासून मलमलीपर्यंत सर्वप्रकारचे कापड आपल्या हातमागावर करता येते ही अभिमानाची गोष्ट नव्हे काय? हातमागावर कापसाशिवाय सोने, चांदी, लोकर व रेशमाचे धागेहि विणता येतात. बहुसंख्य विणकर मात्र २० ते ३० नंबरच्या सुतापासून कापड विणण्याच्या व्यवसायात गुंतलेले आहेत. या धंद्याच्या प्रगतीचे बाबतींत गेल्या ५० वर्षांत बरीच चढउतार झाली. सतत २५ वर्षे मंदाईच्या झळीने या धंद्याला भाजून काढले. दोन युद्धांच्या काळात मात्र या धंद्याला बरीच बरकत आली. मात्र सरकारने नियंत्रणाचे धोरण सैल करताच या धंद्याच्या उतरणीला पुनश्च सुरवात झाली आहे. केवळ हातमागाचे नक्षीदार विणीचे कापड तयार करता येते, ह्या एकच गुणाच्या जोरावर हा धंदा मिलच्या कापडाबरोबरच्या चढाओढीत आजपर्यंत कसाबसा का होईना तग धरून आहे. तसेच या धंद्यात विणकऱ्याच्या वैयक्तिक कलेला मोल आहे. रेशमाचे व लोकरीचे काही विशिष्ट प्रकारचे कापड केवळ हातमागावरच चांगल्या प्रकारे विणता येते. मागाचे सुधारलेले प्रकार उपयोगात आणून कापडाची वीण, दर्जा व उत्पादन या सर्व बाबतीत मिलच्या कापडाइतके गुण हातमागाच्या कापडात देखील उतरविता येणे शक्य आहे.

रंगणीची सुधारलेली पद्धत अवलंबून कापडाचा दिखाऊपणा वाढविता येण्याजोगा आहे. सुमारें ९० % हातमागांवरील कापड रंगीत असते. या गोष्टीवरून 'रंगणीला' किती महत्त्व आहे हे दिसून येईल. या धंद्याचे क्षेत्रातहि (इतर बहुतेक सर्व घरगुती धंद्यांप्रमाणेच) ऐतखाऊ एजंटाने ग्रासले आहे. उदाहरणार्थ, सोलापूर जिल्ह्याचे उदाहरण घ्या. तेथे सुमारे १२,००० चालू माग आहेत. तेथे कामकरी विणकर मालक विणकराचे (त्याला "मुंगा" म्हणतात) हाताखाली काम करतो. मालक विणकऱ्यावर कारखानदार विणकर नियंत्रण ठेवतो व या सर्वांच्या वर अडत्या विणकर असतो. मुंगा, कारखानदार अडत्या याचे कमिशन वजा जाता कामकरी विणकराला काय मिळत असेल याची तुम्हीच कल्पना करा.

भारतात एकूण ३० लाख हातमाग असून त्यांतील २० लाख नोंदले आहेत. महाराष्ट्रांत एकूण एक लक्ष पंचाऐंशी हजार हातमाग असून त्यांपैकी एक लक्ष आठेचाळीस हजार नोंदले गेले आहेत. भारतात ७५ लक्ष विणकर या धंद्यात आहेत. त्यांपैकी महाराष्ट्रात १॥ लाख आहेत. भारतात ११ हजार विणकर सहकारी सोसायटया असून त्यांत सुमारे १२ लाख हातमाग येतात. व त्यामुळे ११ लाख विणकरांना उद्योग मिळतो. महाराष्ट्रात ६६८ विणकर सहकारी संस्था असून त्यांच्या कक्षेत नव्वद हजार हातमाग येतात व त्यांवर ८१६०० विणकरांना रोजगार मिळतो.

हातमागाच्या विकासासाठीं सरकारने राज्य हातमाग मंडळाची स्थापना केली आहे. विणकरांच्या सहकारी संस्था स्थापन करणे, त्यांना कर्ज व अनुदान देऊन त्यांचा विकास करणे, हातमाग कापडाचे उत्पादन वाढवून त्याचा दर्जा वाढविणे व विणकरांची सामाजिक उन्नति करणे या बाबतींत हे मंडळ सरकारला सहाय्य देते.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये खालील गोष्टी साध्य करण्यात येणार आहेतः—

१५० हातमाग विणकर संघाची स्थापना, ६००० हातमाग विणकरांना माग-भांडवल खरेदीसाठीं सहाय्य, नवे हातमाग व सुधारलेली अवजारें घेण्यासाठीं आठ लाख रुपयांची मदत; सूत रंगविण्याचे ४० छोटे कारखाने व ८० सूत रंगविण्याची केंद्रे; गरम कापड विणणाऱ्या एक हजार आणि रेशमी कापड विणणाऱ्या १८६ हातमागाला खेळत्या भांडवलासाठीं सहाय्य; हातमाग कापडावर रिबेटसाठी १०८ लाख रुपयांची मदत, ६० विक्रीकेंद्रांची सुरवात, ७६० विणकरांसाठी सहकारी पद्धतीवर घरें बांधणें, हातमाग धंद्यास अल्प

व्याजाने कर्जाऊ रक्कम देता यावी म्हणून मध्यवर्ती बँकांना २ लाख ८० हजार रुपयांचे अनुदान, हातमागाचे उत्पादन, विक्री व साठा यांची आकडेवारी १६ केंद्रांतून जमविणे.

वरील सर्व गोष्टींसाठी तिसऱ्या योजनेमध्ये १ कोटी ६५ लक्ष ३१ हजार रुपये खर्च होणार आहेत. विदर्भामध्ये सहकारी तत्त्वावर सूतगिरणी निघाल्यास त्याला सरकार मदत देणार आहेत.

हातमागाचे प्रकार :—१. थ्रो शटल पीट, २. खड्डा हातमाग, ३. फ्लाय शटल पीट, ४. ऑटोमॅटिक टेक अप् मोशन अटॅचमेंट, ५. फ्रेमलूम, ६. हस्टर्ली वायंडर स्ले. ७. पायडल लूम, ८. पॉवर लूम.

( क ) लोकरीचा धंदा :—हा धंदा करणाऱ्यांची लोकसंख्या सात लाखांच्या आसपास आहे. विजापूर, धारवाड व बेळगाव जिल्ह्यात हा धंदा हातमागाच्या धंद्याच्या खालोखाल महत्त्वाचा गणला जातो. लोकर कापणे, सूत काढणे व लोकर विणणे या तीन पायऱ्या या धंद्यात आहेत. काही ठिकाणी मेंढ्या पाळण्यापासून ते लोकरीचे कापड विणण्यापर्यंतचा सर्व उद्योग एकाच ठिकाणी केला जातो. परदेशातून आयात होणारी सर्व लोकर मिलच्या धंद्याला लागते. तेथे निर्माण होणाऱ्या लोकरीचा फक्त काही भागच या घरगुती धंद्यात विणण्यासाठी उपयोगात आणला जातो. अहमदाबाद जिल्ह्यात सर्वांत भारी लोकर निर्माण होते. ही पांढऱ्या रंगाची असून फारच भारी प्रकारच्या 'धावळ्या' यापासून तयार करतात. इतर ठिकाणच्या लोकरीपासून जाड्या-भरड्या 'कांबळी' तयार होतात. विजापूर जिल्ह्याच्या बागलकोट तालुक्यात तयार होणाऱ्या काळ्या घोंगड्या परदेशीय 'अस्पाका' कापडाप्रमाणे भासतात. दरवर्षी एका मेंढीपासून सुमारे १॥ पौंड लोकर निघते. परदेशांत मेंढ्यांना नदीच्या प्रवाहाच्या उलट्या दिशेने पोहावयास लावून नंतर चराऊ रानांत त्यांची अंगे वाळवितात. असे केल्याने त्यांच्या अंगावरील लोकरीचे धागे विलग, स्वच्छ, मऊ व तजेलदार होतात. ही पद्धत आपणाकडे आणण्यासारखी आहे. एका मेंढीच्या सर्वांगावरील लोकर सारख्या प्रकारची नसते. कापून काढलेल्या लोकरीचे ( परराष्ट्राप्रमाणे ) येथेहि शास्त्रशुद्ध वर्गीकरण होणे जरूर आहे. धंद्याच्या दृष्टीने काही प्रकारच्या लोकरीत इतर लोकरीच्या प्रमाणात मिश्रण करावे लागते. या गोष्टीचा विचार आपल्या येथील कारागिरांनी केलेला नाही. लोकर पिंजण्याच्या व स्वच्छ करण्याच्या बाबतीत देखील योग्य ती दक्षता घेतली जात नाही. पिंजलेल्या लोकरीचे टकळीवरून अगर चरख्यावरून धागे काढतात व नंतर ते विणले जातात.

(ड) **कापड–रंगणीचा व कापड–छपाईचा धंदा** :— या धंद्यावर ५०,००० वर लोकांचे पोट भरते. हा धंदा हातमागाच्या धंद्याला पूरक व सहाय्यकारक आहे. हा धंद्यात विणकर समाजच आढळतो. छपाईचा धंदा 'खत्री' लोक करतात. कापड-छपाईचे काम निरनिराळ्या प्रकारच्या ब्लॉक्सच्या सहाय्याने केले जाते. प्राचीन काळी तर केवळ हाताने कापडाला रंग देण्याची व छापण्याची कला अस्तित्वात होती. विजेता ॲलेक्झांडर, शहाजहान राजा, इंग्लंडचा पहिला चार्लस राजा यांना हिंदुस्थानात रंगविलेले कापड फार आवडत असे. मेण-ब्रश यांचा उपयोग करून हाताने काम केले जाई. हा धंदा सध्या शहरवस्तीत केंद्रीभूत आहे. स्त्रियांना हा धंदा शिकता येण्याजोगा आहे.

(इ) **कुंभारकाम** :—हा धंदा जरी फार जुना असला तरी नक्षीदार व पॉलिश झिलई केलेली नक्षीदार चिनी मातीची भांडी तयार करण्याचा हा धंदा आपल्या या राज्यांत अगदी अलीकडचा म्हणजे इ. स. १८२३ सालापासूनचा आहे. काश्मिर व म्हैसूर या दोन राज्यात हा धंदा फार भरभराटीला आला आहे. या धंद्यात कौले व विटा तयार करणे यांचाहि समावेश होतो. विशेषत: खेडेगावात मातीची भांडी आजहि मोठ्या प्रमाणात वापरली जातात, त्यामुळे या धंद्याला क्षेत्र फार मोठे आहे. हा धंदा करणाऱ्यांची वस्ती सुमारे ६०००० आहे. माल, कौशल्य व व्यापारी पेठ ह्या तिन्हींहि गोष्टी अनुकूल असल्यामुळे हा धंदा विकसित होणे पूर्ण सहजशक्य आहे. योग्य तऱ्हेच्या मातीचा वापर, जरूर ते मिश्रण वापरणे, नवीन आकाराची व घाटाची भांडी तयार करणे, सुधारलेले चाक व आधुनिक भट्टी वापरणे या गोष्टींचा कुंभारांनी स्वीकार केला तर या धंद्याला सोन्याचे दिवस दिसतील.

(फ) **रेशमाचा धंदा** :—या राज्यातील वातावरण व हवामान या धंद्याच्या वाढीला अनुकूल आहे. रेशमी किड्यांची जोपासना करणे हा एक फायदेशीर जोडधंदा शेतकऱ्यांना लाभू शकेल. या धंद्याला भांडवल फार अल्प लागते. तसेच कामहि सोपे व विनाकष्टाचे आहे. लहान मुलांना व स्त्रियांना फावल्या वेळात करण्याजोगा हा एक आदर्श उद्योग आहे. हे किडे गरम व दमट हवेत पोसले जातात. या धंद्यांत फायदा मात्र फार कमी असतो.

(ग) **कातड्याचा धंदा** :—शेतकी व औद्योगिक क्षेत्रात सारखाच महत्त्वाचा म्हणून गणलेला असा हा धंदा आहे. हातमागाच्या धंद्यानंतर हाच धंदा महत्त्वाचा समजला जातो. या धंद्यावर पोट चालविणाऱ्या चांभार, ढोर, मोची, धेड, महार, कसाई या जातींतील एकूण लोकांची संख्या १२ लाख

आहे. मात्र प्रत्यक्ष काम करणाऱ्यांची संख्या ५० हजार आहे. सुमारे अर्धा कोटी कातडी दरवर्षी मुंबई राज्यांत कमाविली जातात. या धंद्याची प्रमाणबद्ध व पद्धतशीर वाढ केली तर जास्त लोकांचा निर्वाह या धंद्यावर होऊं शकेल. खेडेगावात मेलेल्या गुराला ओढून आणल्यामुळे त्याचे कातडे खराब होते. ही गोष्ट सहज टाळता येण्याजोगी आहे. तसेच मृत जनावराच्या शरीराच्या इतर भागांचा ( हाडे, शिंगे, खूर, चरबी, मांस, आतडी वगैरे ) पुरेसा उपयोग केला जात नाही. तसेच काही मृत जनावरांची कातडी न काढताच त्यांना कुंजू दिले जाते. या गोष्टीलाहि आळा घालावयास हवा. कातडी कमाविण्यास आवश्यक असलेली द्रव्ये (बाभळीची साल, तरवडांची साल, हिरडा, खैर या झाडांची साल वगैरे ) परदेशात व कारखान्यात रवाना होत असल्यामुळे या घरगुती धंद्याला पुरेसा माल मिळत नाही. याला आळा घालण्यासाठी सरकारी जंगलातील कातडी कमाविण्यास लागणारी झाडे आसपासच्या चांभारांना सवलतीच्या दराने मिळावीत अशी योजना सरकारने केली आहे. कारखान्यात तयार होणाऱ्या मालामुळे या धंद्याला स्पर्धा होत आहे. सरस तयार करण्याचा धंदाही उपेक्षिला जात आहे. हा धंदा मागासलेल्या वर्गाच्या लोकांच्या ताब्यात असल्यामुळे भांडवलाची टंचाई हे तर याचे वैशिष्ट्यच आहे. पैशाच्या तंगीमुळे कित्येकदा अर्धवट कमाविलेले कातडे बाजारात विकले जाते.

( ह ) मधुमक्षिका पालन—मध हे एक उत्कृष्ट व औषधी अन्नद्रव्य आहे. तसेच मधमाशा पाळल्यामुळे फळाफुलांच्या वाढीस मदत मिळते. त्याला कमी भांडवल लागते व मधाला भाव चांगला असल्यामुळे या जोड-धंद्यामुळे शेतकऱ्यांना चांगली प्राप्ति येते. मधमाश्यांची वाण महाराष्ट्र राज्यात नाही, मात्र त्याचा हवा तसा व हवा तितका उपयोग केला जात नाही हे मात्र सत्य आहे. जास्त मध देणाऱ्या मधमाश्या पाळणे व त्यांना योग्य त्या वनस्पतींच्या सहवासात ठेवणे ह्या गोष्टीने उत्पादन वाढेल.

( ज ) तेल गाळण्याचा धंदा :— तेल गाळण्याचे कारखाने निघाल्या-पासून बैलाच्या घाणीपासून तेल गाळण्याचा धंदा मोडकळीस आला आहे. महाराष्ट्र राज्यात सुमारे दहा हजार घाणे चालू आहेत. ‘ हास्केल ’ पद्धतीच्या घाण्याचा उपयोग केल्यास बैलास कमीत कमी त्रास होऊन तेलाचे प्रमाण वाढते असा अनुभव आहे. बैलाला त्याच्या वजनाच्या $\frac{१}{८}$ वजन ओढावयास लावणे शास्त्रशुद्ध आहे, या तत्त्वावर या सुधारलेल्या घाण्याची योजना केली असून यंत्रणेमध्ये बॉल-बेअरिंगचा उपयोग केला असल्यामुळे ओढण्याची क्रिया जास्त सुकर झाली आहे. सावणधंद्यांत वापरल्या जाणाऱ्या तेलापैकी ५०%

तेले अखाद्य ( non-eatable ) वापरली तरी चालू शकते असे प्रयोगान्ती सिद्ध झाले आहे. या संशोधनाचा उपयोग करून तेल्यांनी अखाद्य तेले गाळून साबण तयार करण्याचा जोडधंदा सुरू केला, तर तो निश्चित फायदेशीर होईल. या घरगुती धंद्याला संरक्षण देण्याच्या हेतूने तेलोत्पादन कारखान्यांना उत्तेजन व सवलती द्यावयाच्या नाहीत. असे सरकारने धोरण ठरविले आहे. तुपाच्या टंचाईच्या व महर्गतेच्या या दिवसात शुद्ध व खाद्य तेलाचे महत्त्व फार मोठे आहे.

( क ) ताडगूळ–उत्पादन :— या राज्यात सुमारे १५००० एकर क्षेत्रात नारळाची झाडे सोडून सुमारे ३० लाख ताडाची झाडे आहेत. या झाडांच्या रसाचा 'नीरा' म्हणून उपयोग केला नाही तर मग त्याचा 'ताडगूळ' करण्यावाचून दुसरा फलदायी उपयोग नाही. हा एक महत्त्वाचा जोडधंदा ठरू शकेल. पुरुष मंडळी रस गाळण्याचे काम करतील व स्त्रिया या रसाचे गुळात रूपांतर करण्याचे काम बघतील. या गुळाचा त्यांना घरात उपयोग करता येऊन शिवाय बाकीचा स्थानिक पेठेत विकता येईल.

( ख ) वाखकाम :— ज्या वनस्पतींपासून वाखाचे धागे निघू शकतात, अशा अनेक प्रकारच्या वनस्पती महाराष्ट्र राज्यात मुबलक सापडतात. विशेषतः ताग, अंबाडी व घायपात यांपासून वाख चांगले निघतात. पाऊण लाख एकर जमीन या तीन वनस्पतींच्या उत्पादनाखाली आहे. विशेषतः रस्ते व लोहमार्गांच्या कडेला या वनस्पती स्वभावतः उगवलेल्या दृष्टीस पडतात. त्याचप्रमाणे कुंपण म्हणूनहि त्यांचा उपयोग होऊ शकतो. अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा या तालुक्याच्या गावी केवळ घायपाताच्या उत्पादनाचे प्रयोग करण्यात आले. घायपाताचे उत्पादन जसे मुद्दाम करावे लागत नाही तशी गोष्ट ताग व अंबाडी यांच्या बाबतीत मात्र नाही. त्याचे बी मुद्दाम पेरावे लागते. घायपाताचा धागा बळकट व राकट असतो. उलटपक्षी ताग व अंबाडी यांपासून निघणारा वाख मऊ असतो. तागाचे उपयोग दोन प्रकारांनी करतात. एक दोर करण्यासाठी म्हणून व दुसरा खतासाठी म्हणून उपयोगात आणतात. रत्नागिरी जिल्ह्यातील "देवगडी" ताग परराष्ट्रात फार प्रसिद्ध आहे. या देवगडी तागात इतर ताग मिसळून त्यापासून होणारे दोर फार उत्कृष्ट म्हणून भारी दराने युरोपात विकले जातात. चटया, गलबताचे दोर, माश्यांची जाळी या कामी तागाच्या वाखाचा विशेष उपयोग केला जातो. अंबाडीचे उत्पादन जोडपीक म्हणून ज्वारीबाजरीच्या शेतातून करतात. याचा भाजी म्हणून देखील उपयोग कोणीकोणी करतात. याचा धागा फार मऊ असतो. पण

तागाच्या धाग्याइतका टिकाऊ मात्र नसतो. अंबाडीच्या धाग्यापासून सुतळ्या तयार करतात. खाद्य धान्याचे क्षेत्र मुळीच कमी न करता वाखाचा धंदा करता येतो. म्हणून हा धंदा वाढण्यास फार मोठे क्षेत्र आहे.

घायपाताच्या पानांची पूर्ण वाढ झाल्यावर मोठ्या चाकूने त्यांचे उभे तीन-चार तुकडे करून वाळवत ठेवतात. नंतर त्या पानांची बंडले बांधून ती पाण्यात कुजेपर्यंत भिजवत ठेवतात. नंतर ती झोडपून काढतात. नंतर निघालेला धागे वेगळे करून वाळवितात. मात्र या पद्धतीमुळे वाख बराच वाया जातो व तो पांढर शुभ्र निघत नाही. रॉस्पेडोर मशीनचा उपयोग करून जर घायपातापासून धागा काढला तर तो जास्त स्वच्छ निघतो व अत्यंत कमी भाग वाया जातो.

तागाचा वाखासाठी व खतासाठी असा दुहेरी उपयोग करता येणे शक्य आहे. मूळ शेंडा जमिनीत गाडून त्याचा खत म्हणून उपयोग करावा व देठाचा उपयोग वाख काढण्याच्या कामी करावा. हा दुहेरी उपयोग शेतकऱ्यांच्या नजरेत आणला पाहिजे. ताग ऊन पाण्यात भिजत ठेवल्यास त्याचे धागे लवकर सुटतात.

अंबाडीचे ज्यूटशी फार साम्य आहे. ती तागापेक्षा पाण्यात लवकर कुजते.

( म ) **दोराचा धंदा** :—नारळाच्या झाडाच्या प्रत्येक भागाचा उपयोग करून घेता येतो. खोबरे खाद्यपदार्थ म्हणून व तेलासाठी उपयोगी पडते. या तेलाचा उपयोग स्वयंपाकात करतात. तसेच साबण, मेणबत्त्या, सौंदर्य-प्रसाधने वगैरे करण्याच्या बाबतीतहि खोबरेल तेलाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. कच्च्या नारळावरील धाग्यापासून दोर चांगले निघतात. नारळाचे कवच जळण्याच्या कामी उपयोगी पडते. तसेच ते जाळून औषधी तेल काढता येते. बटणेहि तयार करण्याच्या कामी याचा उपयोग होतो. पानांचा उपयोग पंखे व टोपल्या तयार करण्याच्या कामी होतो. केरसुण्याही करता येतात. बुंधाचा उपयोग बांधकामात होतो. बुंधातून निघणाऱ्या रसापासून आल्कोहोल तयार करता येते. नारळाच्या उत्पादनाच्या बाबतीत हिंदुस्थान युद्धपूर्व काळात अग्रेसर होता. आता ते स्थान फिलिपाईन्स या देशाने घेतले आहे. सुमारे २९००० एकर जमीन महाराष्ट्र राज्यात नारळीच्या खाली आहे. परदेशी फार मोठ्या प्रमाणावर याची निर्यात होते.

स्वाध्याय

( १ ) ग्रामोद्योगातून तयार होणाऱ्या मालाची विक्री वाढविण्याच्या दृष्टीने कोणकोणते उपाय तुम्ही सुचवाल?

( २ ) भारतात प्रचलित असलेले प्रमुख ग्रामीण उद्योगधंदे सांगून त्यांपैकी तुमच्या गावी कोणकोणत्या उद्योगधंद्यास वाव आहे ते सांगा.

( ३ ) कोणताही धंदा हा ग्रामीण उद्योग, लहान उद्योग किंवा मोठा उद्योग आहे हे तुम्ही कशावरून ठरवाल ते तपशीलवार द्या.

◆◆◆

## ३. खेड्यातील उद्योगधंदे खालावण्याची कारणे

हिंदुस्थानात ब्रिटिशांचा अंमल सुरू होण्यापूर्वी हिंदुस्थानच्या मालाला परक्या देशाची बरीच मागणी होती. काही काळ हिंदुस्थानातील मालाला बाहेरील व्यापाऱ्यांची व परकीय प्रवाशांची मागणी फार वाढली. त्यांची मागणी पुरी करून स्वस्त माल पुरविण्यासाठी (१) कारागीर लोक निकृष्ट व हलक्या दर्जाचा माल तयार करू लागले. त्यामुळे बाहेरील लोकांची मागणी बंद पडली. (२) ब्रिटिश अमदानीत सरकारचे धोरण हिंदुस्थानातील धंद्यास पोषक नव्हते. (३) पूर्वी खेड्यातील उद्योगधंद्यांना अमीरउमराव, राजे, संस्थानिक यांच्याकडून मदत मिळत होती. ती मदत ब्रिटिश अंमदानीत बंद झाल्यामुळे खेड्यांतील उद्योगधंदे खालावले. (४) सुशिक्षित वर्गाचा कल फॅशन म्हणून दिवसेंदिवस परदेशी वस्तूकडे जाऊ लागला व त्यामुळे आपल्या देशात उत्पन्न होणारा माल खपेनासा झाला.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेत आलेला विस्कळीतपणा**—आपल्या भारताची पूर्वीची अर्थव्यवस्था बलुतेदार म्हणून ओळखली जात असे. त्या वेळी भट किंवा ज्योतिषी, मुलाणी, सोनार, सुतार, लोहार, कुंभार, परीट, न्हावी, गुरव, कोळी, चांभार व महार अशी ही बारा बलुते होती. पूर्वीचे प्रत्येक खेडे हे स्वयंपूर्ण व कलावान् असे केंद्र होते. कित्येक कला वंशपरंपरागत चालत आलेल्या होत्या. खेड्यातील जनता व इतर देशातील लोक खेड्यात उत्पन्न झालेल्या वस्तु खरेदी करत होते. त्या वेळी कलावंत लोकांना राजेरजवाडे, संस्थानिक, सरदार वगैरे लोकांचा आश्रय असे. त्यामुळे कलेची वाढ झपाट्याने झाली व त्या वेळचे कलावंत पिढ्यान् पिढ्या आपल्या कलेत गुंतून राहिले होते व त्यांचे

जीवन सुखी होते. आपल्याकडील ग्रामीण उत्पादनाची ख्याती दूरवर पसरली होती. हे ५-७ हजार वर्षांपूर्वी इजिप्त, मध्य आशिया व यूरोप येथे गेलेल्या वस्तूवरून दिसून येते. डाक्क्याची मलमल पूर्वी फार प्रसिद्ध होती. कापड, धातू, लाकूड यावर केलेली रंगीबेरंगी कलाकुसरीची कामें त्या वेळी हिंदुस्थानची कीर्ति वाढवत होती. परंतु कालांतराने ही सर्व परिस्थिति पालटली.

**खेड्यातील उद्योगधंद्यांची आजची परिस्थिति**—आज खेड्यातील उद्योगधंदे जवळ जवळ नाहीसे झाले आहेत. जे लहान लहान उद्योगधंदे आहेत त्यांमधील लोक अत्यंत गरीब आहेत. त्यांचे उद्योगधंदे चालविण्यासाठी त्यांच्याजवळ भरपूर भांडवल नाही. त्यांच्या ठिकाणी धंद्याला लागणाऱ्या तांत्रिक ज्ञानाचा अभाव दिसतो. त्यामुळे पुष्कळ वेळा असे दिसून येते की, त्यांनी तयार केलेला माल कलेच्या व गिऱ्हाइकांच्या दृष्टीने कमी दर्जाचा ठरतो व त्यामुळे मालाचा खप किंवा उठाव होत नाही व त्यामुळे मालात त्याचे भांडवल गुंतून पडते. पुष्कळ वेळा असेही दिसून येते की हे कारागीर आपला तयार झालेला माल एखाद्या दलालामार्फत विकीत असतात. त्यामुळे त्याना श्रमाचा योग्य मोबदला मिळत नाही. विक्री करणे हे एक शास्त्र आहे. खेड्यातील कारागिरांना अज्ञानामुळे हे विक्रीशास्त्र जमत नाही. शिवाय जुने ते सोने समजून गिऱ्हाइकांची आवडनिवड लक्षात घेत नाहीत व परंपरागत चाललेल्या रूढीप्रमाणे माल तयार करतात. अर्थात् त्यामुळे खप कमी होतोच, परंतु मालाला भावही मिळत नाही. अशा प्रकारे आर्थिक अडचण निर्माण होते आणि आर्थिक अडचण निर्माण झाल्यावर त्यांना सावकाराकडे धाव घेतल्याखेरीज मार्ग उरत नाही. शेवटी नाइलाजास्तव सावकार मागतील त्या भावात त्यांना माल विकावा लागतो किंवा गहाण ठेवण्याची पाळी येते. अशा प्रकारे आज खेड्यातील उद्योधंद्याची स्थिति झाल्यामुळे साहजिकच कारागिरांना खेडे सोडून पोटापाण्याकरिता शहरात जाऊन काहीतरी नोकरीचाकरी करावी असे वाटते व त्यांचा ओढा खेडे सोडून शहराकडे जाण्यासाठी दिसून येतो.

**लहान उद्योगधंद्यांची राष्ट्राला आवश्यकता**—आज लहान उद्योगधंद्यांची राष्ट्राला अतिशय आवश्यकता आहे. विचारांअंती त्यापासून आपणांला बरेच फायदे दिसून येतील. हिंदुस्थानात शे. १० टक्के लोक लहान उद्योगधंद्यात गुंतलेले आहेत. अशा प्रकारचे लहान उद्योगधंदे शेतकरी लोकांना दुय्यम धंदा म्हणून करता येण्यासारखे आहेत. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात

भर पडेलच. शिवाय एकदा या धंद्याची गोडी लागली, की ते धंदे आस्थेवाईक-पणाने केले जातील. काही धंद्यात मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवावे लागते. परंतु या मोठ्या प्रमाणावर चाललेल्या धंद्यात जरी माल मोठ्या प्रमाणात उत्पन्न होत असला तरी निरनिराळ्या लोकांच्या भिन्न अभिरुची असतात व त्या पुरविल्या जात नाहीत. लहान धंद्यात एकाच इसमाची देखरेख असते. त्यामुळे त्याला तयार होणाऱ्या मालाकडे कलेच्या दृष्टीने पाहाता येते व श्रेष्ठ दर्जाचा माल उत्पन्न करता येतो. लहान उद्योगधंद्यांचा नैतिक दृष्ट्याही फार फायदा आहे. कारण या लोकांतील धंद्यामध्ये मालक व मजूर ही भावना नसल्यामुळे प्रत्येकजण मनःपूर्वक व आस्थेवाईकपणाने काम करतो.

**सहकारी तत्त्वावर लहान उद्योगधंद्यांची उभारणी**— लहान उद्योगधंदे चांगल्या प्रकारे चालण्याकरिता त्यांची उभारणी सहकारी तत्त्वावर होणे जरूर आहे. या धंद्यातील लोकांना लागणारे भांडवल समाईक पातळीवर सहकार्याने उभारता येईल. धंद्याला लागणारा कच्चा माल समाईक रीत्या त्यांना एकत्र खरेदी करता येईल. त्यामुळे त्यांना तो माल स्वस्त व चांगल्या प्रकारचा मिळू शकेल. उत्पादनाच्या बाबतीत त्यांना लागणारी उपकरणे समाईक पद्धतीने घेता येतील व उत्पादनावर देखरेखीची व्यवस्था करता येईल. त्यामुळे माल चांगल्या प्रकारचा निघू लागेल. मालाच्या विक्रीची सोय चांगल्या प्रकारे करता येईल. संस्थेचा माल लांबच्या बाजारपेठेत पाठविता येईल व वाहतुकीचा खर्च कमी पडेल. संस्थेला तयार झालेला माल परस्पर गिऱ्हाइकास विकता येईल. त्यामुळे तो माल गिऱ्हाइकाला स्वस्त पडेल, संस्थेलाही भाव बरा मिळेल आणि मधले दलाल नाहीसे होतील. मालाची विक्री करण्याच्या दृष्टीने संस्थेला मालाची जाहिरात करणे शक्य असते व मालविक्री करण्याच्या दृष्टीने ती फायदेशीर होते. उत्पादक व ग्राहक यांचा परस्पर संबंध येतो. ग्राहकाच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन मालाचे उत्पादन करता येते. बाजारात मालाची गरज किती आहे हे अजमाविता येते. अशा प्रकारे लहान उद्योग-धंद्यांची उभारणी सहकारी तत्वावर केल्यास त्यापासून अनेक फायदे होतात. म्हणून सहकारी तत्त्वावर लहान उद्योगधंद्यांची उभारणी करणे अत्यंत जरूर आहे.

## स्वाध्याय

(१) भारतातील ग्रामीण उद्योगधंद्यांच्या ऱ्हासाची कारणे देऊन त्यांच्या विकासाकरिता सरकार करीत असलेल्या प्रयत्नांची थोडक्यात कल्पना द्या.

# ४. औद्योगिक सोसायटया

१९०४ च्या कायद्यात क्रेडिट सोसायटयांशिवाय इतर सोसायटया काढण्याची सोय नव्हती. म्हणून सुरवातीस विणकर लोकांना कर्जे पुरविण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यात १९०६ साली विणकर सोसायटी निघाली. पुढे कर्जासाठी चांभार, सुतार वगैरे लोकांचे अर्ज येऊ लागले व त्यांच्या सोसायटयांची आवश्यकता भासू लागली. १९१२ मध्ये कायद्यात दुरुस्ती झाली व त्यामुळे निरनिराळया उत्पादक संस्था स्थापन करण्याची सोय झाली. १९२० साली त्या वेळचे रजिस्ट्रार रॉथफिल्ड यांनी इंग्लंड व हंगेरीमधील उत्पादक सोसायटयांचा अभ्यास केला आणि या संस्थेमध्ये एकाच धंद्याचे लोक असावेत असा नियम केला. त्या वेळेपासून खऱ्या उत्पादक संस्थांना मदत देण्याचे धोरण जाहीर केले व विणकर लोकांकडे लक्ष पुरवून त्यांना सरकारी मदत मिळू लागली. पुढे श्री. व्ही. एल्. मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती नेमली. तिने या सोसायट्यांच्या वाढीसाठी व प्रगतीसाठी नवीन धोरण आखून पोटनियमात सुधारणा केली व औद्योगिक किंवा उत्पादक सोसायटयांसाठी ई ई पत्रक तयार केले. त्यापूर्वी विणकर सोसायट्या 'फ'पत्रक वापरीत होत्या. आता सर्वच औद्योगिक सोसायटया ई ई पत्रक पोटनियम म्हणून वापरू लागल्या आहेत.

राष्ट्राचा विकास म्हणजे शेती व उद्योगधंद्यांचा विकास हे मान्य झाल्यामुळे सहकारी तत्त्वावर शेती व उद्योगधंद्यांचा विकास करण्याचे ठरले व त्यामुळे औद्योगिक क्षेत्राचा विस्तार खूपच वाढत चालला आहे. सध्या औद्योगिक सोसायटयांच्या प्रकारात पुढील सहकारी संस्था मोडतात:–(१) उत्पादक सहकारी संस्था, (२) प्रक्रिया सहकारी संस्था, (३) इंडस्ट्रियल इस्टेट सहकारी संस्था, (४) इंडस्ट्रियल सर्व्हिस को. संस्था. त्यापैकी उत्पादक सहकारी सोसायटयांची व्याख्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये पुढीलप्रमाणे केलेली आहे. – "उत्पादक संस्था म्हणजे मालाचे उत्पादन करणे व त्याची विल्हेवाट लावणे किंवा आपल्या सदस्यांनी केलेले श्रमदान सामुदायिकपणे कामी लावणे हा ज्या संस्थेचा उद्देश असेल ती संस्था." या प्रकारच्या संस्थेत विणकर, चर्मकार, तेलघाणी, बांबूकाम किंवा बुरूड, कुंभार, दोरखंड-उत्पादक, खादीउत्पादक, नीरा-ताडगूळ वगैरे प्रकारच्या संस्था येतात. त्याचप्रमाणे उत्पादक सोसायटयांच्या दुसऱ्या भागात जंगल–कामगार व लेबर कॉन्ट्रॅक्ट सहकारी संस्था मोडतात. या सर्व प्रकारच्या उत्पादक सोसायटया

सहकारी खात्याकडून नोंदल्या जातात. परंतु त्यांना यात्रयाचे कर्ज किंवा अनुदान दोन्हींकडूनहि मिळू नये म्हणून काही उत्पादक सोसायटयांना मदत राज्य खादी बोर्डाकडून मिळत असते. अशा सोसायटयांना व्यवस्थापनाचा खर्च फक्त सहकारी खाते देते. खादी बोर्डाच्या कक्षेतील उत्पादक सोसायटया पुढीलप्रमाणे आहेत– १ खादी, अंबर आणि लोकर. २ मधुमक्षिका पालन. ३ नीरा नाडगूळ. ४ गूळ आणि खांडसारी. ५ ग्रामीण तेल उद्योग. ६ हातसड तांदूळ योजना. ७ आटाचक्की योजना. ८ फ्रूट कॅनिंग. ९ हातकागद. १० अखाद्यतेल स बण. ११ कुंभार उद्योग. १२ चर्मोद्योग. १३ शिरस उद्योग, १४ वाख आणि रेषा उद्योग व १५ गोबरगॅस प्लँट योजना.

औद्योगिक सोसायटयांचा दुसरा प्रकार म्हणजे प्रक्रिया सहकारी संस्था होय. "प्रक्रिया करणारी संस्था म्हणजे मालावर प्रक्रिया करणे हा ज्या संस्थेचा उद्देश असेल ती संस्था." कच्चा माल उत्पन्न अगर तयार करणारे लोक एकत्र येऊन ते प्रक्रिया संस्था बनवितात. यामध्ये जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी, ऑईल मिल, शुगर फॅक्टरी, स्पिनिंग मिल वगैरे संस्था येतात. तिसरा प्रकार म्हणजे इंडस्ट्रियल इस्टेट को. सोसायटया होत. शेडची उभारणी करून देणे अगर बांधून भाड्याने देणे. पाणी, वीज, बँकिंगची सोय, पोस्टाची सोय, सर्वसामान्य सुखसोयी वगैरे पुरविण्याच्या दृष्टीने तयार केलेल्या सोसायटया यामध्ये मोडतात. यानंतर इंडस्ट्रियल सर्व्हिस को. सोसायटी सुरू करण्यास काहीच हरकत नाही. कारण बऱ्याच औद्योगिक सोसायटयांमध्ये यंत्रसामुग्री वापरण्यात येत असल्यामुळे छोटया छोटया संस्थेत तांत्रिक मदतीची वारंवार गरज भासते. त्या दृष्टीने इंडस्ट्रियल सर्व्हिस सोसायटया स्थापन होण्यास काहीच हरकत नाही. त्यामुळे लहान लहान औद्योगिक सोसायटयांना मदत मिळून त्यांचा विकास होण्यास मदत होईल.

• • •सन १९४६ सालापासून व्हिलेज इंडस्ट्रीज व इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह हे खाते सुरू झाले. त्यापूर्वी ग्रामोद्योगामध्ये यांत्रिक सुधारणा करणे व त्याबद्दल माहिती गोळा करणे ही सर्व कामे डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रीज यांजकडे होती. कारागिरांची संघटना करणे, त्यांना भांडवलाची मदत करणे, कच्चा माल मिळवून देणे व पक्क्या मालाची विक्री करून देणे ही कामे सहकारी खात्याकडे सोपविली होती. अशा तऱ्हेने कामाची फारकत होण्यापेक्षा एकाच खात्याकडे ही सर्व कामे सोपविली तर ग्रामोद्योगाची प्रगती एकसूत्रीपणाने होईल असे वाटून १९४६–४७ मध्ये ग्रामोद्योगाचे काम सहकारी खात्याकडे दिले व त्यासाठी एक स्वतंत्र जॉइंट रजिस्ट्रार नेमला गेला. तसेच प्रत्येक जिल्ह्यासाठी

१२६७३

डिस्ट्रिक्ट ऑफिसर फॉर इंडस्ट्रीज हा अधिकारी नेमला गेला. सोसायट्यांची वाढ झपाट्याने होऊ लागल्यामुळे सन १९५७ पासून घरगुती उद्योगधंदे आणि औद्योगिक सहकारी संस्था यांच्या विकासासाठी "घरगुती उद्योगधंदे आणि औद्योगिक सहकारी संस्था" या नावाचे खाते निर्माण करण्यात आले. सन १९५७ पासून १९६१ पर्यंत राज्याच्या सहा विभागांसाठी सहा घरगुती उद्योगधंद्यांचे उपसंचालक आणि औद्योगिक सहकारी संस्थांचे सहा उपरजिस्ट्रार प्रमुख होते. त्यांच्या मदतीला सहाय्यक संचालक, जिल्हा अधिकारी व जिल्ह्यातून प्रत्यक्ष काम करणारा नोकरवर्ग होता.

महाराष्ट्र राज्य स्वतंत्र झाल्यानंतर सहकारी खात्याची नवीन घडण झाली व त्यामुळे पूर्वी असलेले "घरगुती उद्योगधंदे आणि औद्योगिक सहकारी संस्था" हे खाते मूळ सहकारी खात्यात विलीन झाले असून त्यासाठी एक स्वतंत्र जॉइंट रजिस्ट्रार आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली डेप्युटी रजिस्ट्रार फॉर इंडस्ट्रीज, टेक्स्टाइल एक्स्पर्ट, स्पेशल फॉरेस्ट ऑफिसर, असिस्टंट रजिस्ट्रार के. सा. खादी व व्हिलेज इंडस्ट्रियल को. सोसायटीज, टेक्स्टाइल ऑफिसर फॉर इंडस्ट्रियल को. सोसायटी व टेक्स्टाइल ऑफिसर फॉर पावरलूम हे अधिकारी काम करीत आहेत. जिल्ह्यातील कोणत्याही प्रकारची सोसायटी नोंदण्याचा अधिकार जिल्हा डेप्युटी रजिस्ट्रार यांस आहे. मात्र त्या सोसायटीचे खेळते भांडवल ५० हजार ते ५ लाखांपर्यंत असले पाहिजे. १ ते ५ हजारांपर्यंत खेळते भांडवल असणाऱ्या संस्था असिस्टंट रजिस्ट्रार नोंदू शकतात व ५ लाखांच्या वरील खेळते भांडवल असणाऱ्या संस्था जॉइंट रजिस्ट्रार नोंदू शकतात.

जीवनमान सुधारणे, उद्योगधंद्यांची परिस्थिति सुधारणे आणि उत्पादन-पद्धतीत सुधारणा करणे हे औद्योगिक संस्थांचे उद्दिष्ट असते. उत्पादन-संस्थांच्या नोंदणीबाबतचे अधिकार घरगुती उद्योगधंद्यांच्या असिस्टंट डायरेक्टरांना आणि औद्योगिक सहकार संस्थांच्या असिस्टंट रजिस्ट्रारना देण्यात आले होते. प्रत्येक जिल्ह्याला असिस्टंट डायरेक्टर ऑफ् कॉटेज इंडस्ट्रीज हे अधिकारी नेमलेले होते. परंतु फब्रुवारी १९६१ पासून ही सर्व घडण बदलली आहे. सध्या प्रत्येक जिल्ह्याला एक डेप्युटी रजिस्ट्रार असून ते ५० हजार ते ५ लाख रुपयेपर्यंत खेळते भांडवल असणाऱ्या सर्व प्रकारच्या संस्था नोंदतात.

औद्योगिक सहकारी संस्था खाते पुढील कार्य करते—

( १ ) औद्योगिक सहकारी संस्था संघटित करणे व त्यांची नोंद करणे.

( २ ) या संस्थांच्या कारभाराची तपासणी करणे व त्यावर देखरेख ठेवणे.

( ३ ) या संस्थांना भाग-भांडवल, खेळते भांडवल, हत्यारे आणि इतर सामुग्री व्यवस्थेचा खर्च यांसाठी आर्थिक सहाय्य देणे आणि त्यांनी उत्पन्न केलेला माल विकण्याची व्यवस्था करणे.

औद्योगिक सोसायटया पुढील तत्त्वांवर चालविण्यात येतात—( १ ) उत्पादक सभासदांना मालविक्रीपासून होणाऱ्या नफ्याचा योग्य वाटा मिळाला पाहिजे. ( २ ) उत्पादक सभासदांना उत्पन्नाच्या पद्धतीवर नियंत्रण ठेवता आले पाहिजे. उदा०—विणकर सोसायटीत सभासद आपल्या घरातील मागांवर साड्या अगर धोतरे तयार करतात व तो माल सोसायटीच्या दुकानी विक्रीसाठी ठेवतात. या विणकामाबद्दल सोसायटी त्यांना मजुरी देते परंतु साड्या अगर धोतरे विकून जो काही नफा राहील त्यामध्ये सभासद या नात्याने त्यांना नफ्याचा हिस्सा मिळतो. शिवाय कोणत्या प्रकारचा माल तयार करावयाचा म्हणजे तो ताबडतोब विकला जाईल हे ठरविण्याचीसुद्धा त्यांना मुभा असते. सोसायटीचे सभासद हेच मॅनेजिंग कमिटीचे पंच असतात व कोणता माल ताबडतोब विकला जाईल, हे त्यांना माहीत असते व तोच माल काढण्यास ते सांगतात. थोडक्यात, नफ्यातील भागीदारी व उत्पन्नाच्या पद्धतीवरील नियंत्रण या दोन तत्त्वांवर उत्पादक सोसायटयांचे काम चालत असते.

या सोसायट्यांची काम करण्याची पद्धत—एका विवक्षित क्षेत्रात राहणाऱ्या एकाच धंद्यातील लोकांनी सोसायटी स्थापन करावयाची. आपल्या सामुदायिक पतीच्या तारणावर व बँककर्जाच्या मदतीने कारखान्याची जागा मिळवायची, तसेच यंत्रसामुग्री व कच्चा माल मिळवावयाचा. आपल्या सभासदांच्या श्रमाने पक्का माल तयार करून तो सोसायटीचा माल म्हणून विकावयाचा व जो नफा होईल तो काही प्रमाणांत पोटनियमाप्रमाणे सभासदांमध्ये वाटून द्यावयाचा.

यामुळे कारागीर अधिक चांगले व सुबक काम करतात. कारण त्यांना संस्थेच्या नफ्यामध्ये हिस्सा मिळतो. मजुरी तर मिळतेच मिळते व त्यांचीच संस्था असल्यामुळे जो माल ताबडतोब विकण्यासारखा असेल तोच माल ते तयार करतात.

औद्योगिक सोसायट्यांच्या मार्गातील अडचणी—( १ ) कारागीर आळशी. ( २ ) अप्रामाणिक. ( ३ ) एकत्र येऊ शकत नाहीत. ( ४ ) भांडवल अपुरे पडते. ( ५ ) हुशार कारागीर आपल्या ज्ञानाचा फायदा दुसऱ्यास देत नाहीत. ( ६ ) ते लहरी असतात. ( ७ ) जास्त कार्यक्षम बनण्याची इच्छा नसते.

उद्देश—( १ ) मालाचे उत्पादन करणे अगर करवून घेणे. ( २ )

मंडळीच्या स्वतःच्या व तिच्या सभासदांच्या उपयोगासाठी कच्चा माल, पक्का माल, हत्यारे व अवजारें यांची खरेदीविक्री करणे. ( ३ ) सभासदांचा कच्चा व पक्का माल आपल्या ताब्यात ठेवून कर्जाऊ रकमा देणे.

सर्वसाधारण उत्पादक सोसायट्यांची व्यवस्थापक कमिटी ५ ते ७ इसमांची असून जबाबदार मंडळ ३ जणांचे असते. इतर बहुतेक नियम वि. का. सो. प्रमाणेच असतात.

व्यवस्थापक कमिटीची कामे—( १ ) सभासदत्वासाठी आलेल्या अर्जांचा विचार करणे. ( २ ) मंडळीच्या नोकरांची नेमणूक करणे अथवा त्यांस काढून टाकणे. ( ३ ) साधारण सभेचा ठराव होईपर्यंत एखाद्या इसमाचें सभासदत्व तहकूब ठेवणें. ( ४ ) सर्व हिशेब करणे व तपासणे. ( ५ ) कर्ज उभारणे व ठेवी मिळविणे. (६) कच्चा माल, पक्का माल, हत्यारे व इतर आवश्यक वस्तूंची खरेदीविक्री व त्याविषयीं जरूर ती व्यवस्था करणे. ( ७ ) नोकरवर्ग व सभासद यांना द्यावयाच्या मजुरीचे प्रमाण ठरविणे. ( ८ ) मंडळीचे काम चालविण्यासाठीं आवश्यक ती प्रत्येक गोष्ट करणे. ( ९ ) टेंडर देणे, करार करणे, माल खरेदीसंबंधाने निर्णय घेणे. ( १० ) काम करण्याची पद्धत व प्रत्यक्ष कामाचा उरक यासंबंधी निर्णय घेणे. ( ११ ) सभासद व नोकर यांच्यामध्ये कामाच्या वांटणीसंबंधी निश्चिती ठरविणे. ( १२ ) फिर्यादी करणे, प्रतिपक्ष चालविणे व चालू असलेल्या खटल्यात तडजोड करणें. ( १३ ) मंडळीचा व्यवहार सुरक्षित चालण्यासाठीं करावी लागणारी इतर सर्व कामे करणे.

जबाबदार मंडळ—हे मंडळ महिन्यातून एकदा तरी भरेल. या मंडळाला सोसायटीचे वाटेल ते कागदपत्र तपासण्याचा व मालाची नोंद करताना किंवा स्टॉक घेताना हजर राहण्याचा अधिकार आहे. व्यवस्थापक मंडळास सूचना करण्याचाहि अधिकार आहे. विशेष साधारण सभा बोलावून व्यवस्थापक मंडळीस अथवा तिच्यामधील एक अथवा अधिक सभासदांस काढून टाकण्या-संबंधाने शिफारस करण्याचा अधिकार आहे. याशिवाय सोसायटीच्या सर्व हिशेबाची पाहाणी करविणे व निदान तिमाहीतून एकदा तरी तपासणी करविणे व सोसायटीची सांपत्तिक स्थिती व कार्य यासंबंधाने वर्षअखेरीस रिपोर्ट करणे ही कामे करावी लागतात.

सेक्रेटरीची कामे—( १ ) मंडळीचा पत्रव्यवहार करणे. सर्व पुस्तके, हिशेब व नोंद-पुस्तके ठेवणे. ( २ ) व्यवस्थापक मंडळीच्या हुकमान्वये मंडळीच्या वतीने पैशाची देवघेव करणे. ( ३ ) व्यवस्थापक मंडळीने सोंपविलेल्या इतर सर्व कामांकडे लक्ष पुरविणे.

**नफावाटणी**—( १ ) ४० टक्के गंगाजळी. ( २ ) ५ टक्क्यापेक्षा जास्त नाही अशा भागावरील नफा वाटण्याकरिता २० टक्केपर्यंत. ( ३ ) ३० टक्के नोकरांना बोनस. ( ४ ) १० टक्के प्रॉव्हिडंट फंड. ( ५ ) उरलेला नफा सर्व हितकारी फंडास.

**सरकारी मदत**—अलीकडे अनेक प्रकारच्या औद्योगिक सहकारी संस्था बऱ्याच झाल्यामुळे प्रत्येक प्रकारच्या संस्थेचा स्वतंत्र विचार करून त्यांना मदत देण्यात येते. ही मदत देताना सोसायटीचे पोटनियम, भाग-भांडवल वगैरे गोष्टींचा विचार केला जातो. साधारणपणे औद्योगिक सोसायट्यांना पुढील प्रकारची मदत मिळू शकते :—( १ ) शेअर-भांडवलासाठी सरकारची भागीदारी. ( २ ) खेळत्या भांडवलासाठी सवलतीच्या दराने कर्ज व मदत. ( ३ ) हत्यारे व अवजारांकरितां कर्ज व मदत. ( ४ ) वर्कशेड्स, गोडाऊन इत्यादींसाठी लांब मुदतीचीं कर्जे. (५) संस्थेच्या व्यवस्थापकाच्या खर्चासाठी मदत. (६) याशिवाय इतर धंद्यांसाठी रिबेट, विक्रीव्यवस्था, प्रचार वगैरे कारणांसाठी मदत मिळू शकते.

मागासलेल्या वर्गांकरिता कामगारांसाठी किंवा त्यांच्या सोसायट्यांसाठी ज्या थोड्याशा सवलती मिळू शकतात त्या पुढीलप्रमाणे—( १ ) हत्यारे व साधनसामुग्री यांसाठी मदत व बिनव्याजी कर्ज. ( २ ) खेळत्या भांडवलासाठी काही प्रमाणात बिनव्याजी कर्ज व काही कर्जाला व्याज घेतले जाते.

**लेबर कॉन्स्ट्रॅक्ट सोसायट्या**—मजूर लोकांनी आपल्या सोसायट्या स्थापन केल्यास २०,००० रु. पर्यंतची सार्वजनिक कॉन्ट्रॅक्ट्स् सरकारकडून टेंडर न भरता मिळू शकतात व भाग-भांडवलाच्या प्रमाणांत ५००० रु. पर्यंत कर्ज मिळूं शकते.

**औद्योगिक सहकारी बँक**—या बँकेचे पोटनियम सामान्यपणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पोटनियमांप्रमाणेच असतात. मुख्य फरक एवढाच की, या बँका वैयक्तिक कारागिरांना, त्याचप्रमाणे औद्योगिक सहकारी संस्थांना भांडवलाचा पुरवठा करतात, तर जिल्हा मध्यवर्ती बँका मुख्यत: जिल्ह्यातील सलग्न असलेल्या सहकारी संस्थांना भांडवल पुरवितात.

उद्देश — ( १ ) कारागीर, तसेच कुटीर उद्योग, ग्रामोद्योग अगर लहान प्रमाणावरील उद्योग स्थापन करणारे अगर करू इच्छिणारे इसम यांना भांडवल पुरविणे. ( २ ) औद्योगिक सहकारी सोसायट्या किंवा संस्था, तसेच ज्या सहकारी सोसायट्यांच्या सभासदांपैकी काही सभासद कारागीर असून जे आपले उद्योगधंदे चालवितात किंवा अशा कारागिरांना असे धंदे चालविण्यास जरूर ती मदत करण्यात येते, अशा सहकारी संस्थांना भांडवल पुरविणें. ( ३ ) कारागीर व मजूर यांच्यामध्ये बचत, स्वावलंबन व परस्पर सहाय्य हे गुण

[library stamp] ६८३७८ ... ५५१८ ... ११।३।६७

वाढविण्याचा प्रयत्न करणे. (४) वरील उद्देशाला बाध न आणता या बँकेला पुढील कामे करता येतील-(अ) जॉईंट रजिस्ट्रार हे पसत करतील त्या अटींस पात्र राहून बँकेच्या जिंदगीच्या तारणावर, तसेच ऋणको सभासदांनी तारण दिलेल्या स्थावर मिळकतीचे तारणावर डिबेंचर्स उभारणे. (आ) सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारणे. (इ) डिबेंचर्सशिवाय इतर प्रकारची कर्जे काढणे. (ई) सभासदांना कर्जे देणे. (उ) धंद्यास सोईच्या वाटतील अशा स्थावर-जंगम मिळकती विकत घेणे, भाडेपट्ट्याने अगर अदलाबदलीने घेणे अगर अन्य प्रकारे संपादन करणे. तसेच व्यवहाराच्या सोईच्या अगर जरुरीच्या वाटतील त्या कोणत्याही इमारती अगर कोठे (गोडाउन्स) बांधणे, त्यात फेरफार करणे, अगर ते दुरुस्त ठेवणे. (ऊ) चेक, हुंड्या यांचा व्यवहार करणे, तसेच बँकिंगचे इतर व्यवहार करणे. मात्र हे व्यवहार रजिस्ट्रारसाहेब यांच्या संमतीने बोर्डाने मंजूर केलेल्या नियमांप्रमाणे केले जातील. (ए) सभासद व इतर कारागीर यांना त्यांचा गुमास्ता या नात्याने कुटीर उद्योग, ग्रामोद्योग व लहान प्रमाणावरील उद्योग यांसाठी लागणारा कच्चा माल, अवजारे, यंत्रे वगैरे पुरविणे, तसेच अशा उद्योगधंद्यांनी उत्पादन केलेल्या मालाचा साठा करून ठेवणे व त्याची विक्री करणे इत्यादि कामे करणे. (ऐ) संलग्न औद्योगिक सोसायट्यांची किंवा ज्यांना बँकेने भांडवलाचा पुरवठा केला असेल अशा सहकारी सोसायट्यांची तपासणी करणे. (ओ) सहकारी सोसायट्यांचा कायदा व कानू यास पात्र राहून जादा भांडवलाची गुंतवणूक करणे. (औ) नोकर नेमणे, त्यांचे वेतन ठरविणे, त्यांना अगर त्यांच्या कुटुंबियांना अलौन्स, बोनस अगर बक्षिसे देणे. (अं) रजिस्ट्रारसाहेब यांच्या पसंतीने शाखा काढणे. (अ:) वरील उद्देश साध्य होण्यासाठी जरूर ती इतर सर्व कामे करणे.

**सभासदत्व**—कार्यक्षेत्रात असणाऱ्या औद्योगिक सहकारी सोसायट्या व संस्था किंवा ज्या सोसायट्यांचे काही सभासद कारागीर असून जे उद्योग-धंदे करतात अशा सोसायट्या, तसेच इतर सहकारी संस्था व कार्यक्षेत्रांत राहणारे व जे कारागीर असून आपले धंदे करतात अगर करूं इच्छितात अशा व्यक्ति यांना या बँकेचे सभासदत्व खुले असते.

**भाग**—प्रत्येक भाग ५० रुपयांचा असून ती रक्कम हप्त्याने भरली तरी चालते. भाग-भांडवल दोन लाख रुपयांचें असावें लागतें.

**घटना**—बँकेचा दैनंदिन कारभार साधारण सभेने निवडून दिलेल्या डायरेक्टर बोर्डामार्फत चालतो. या डायरेक्टर बोर्डात पुढीलप्रमाणे १५ सभासद असतात—(१) संलग्न औद्योगिक सहकारी सोसायट्या व संस्था

यांनी निवडलेले ५. ( २ ) औद्योगिक सहकारी संस्था व सोसायट्या यांखेरीज इतर सभासदांनी निवडलेले ६. ( ३ ) डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रिअल असोशिएशनने बँकेच्या कार्यक्षेत्रातून निवडलेला १. ( ४ ) जॉइंट रजिस्ट्रारसाहेब यांचा प्रतिनिधी १. ( ५ ) डिबेंचर्स होल्डर्सनी निवडलेला प्रतिनिधी १. ( ६ ) प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को० असोसिएशनचा १. याशिवाय जर बोर्डाने मॅनेजिंग डायरेक्टर नेमला असेल तर तो याशिवाय जादा डायरेक्टर म्हणून बोर्डाचा सभासद असेल.

कार्यकारी समिती—बँकेचें दैनंदिन काम बोर्डाच्या वतीने व बोर्डाच्या हुकमतीत राहून चालविण्यासाठी, कार्यकारी समिती सातापेक्षा जास्त नाही इतक्या सभासदांची बोर्डास नेमतां येते व त्या समितीकडे बोर्डाचा दैनंदिन कारभार सोपविता येतो. या समितीची घटना येणेप्रमाणे :—१. चेअरमन ( अधिकारपरत्वे ), एक मॅनेजिंग डायरेक्टर नेमलेला असल्यास ( अधिकार-परत्वे ), इतर सभासदांपैकी बोर्डानी आपणांतून निवडलेले पाच सभासद.

नफा-वाटणी—२५ टक्के रिझर्व्ह फंड, ६। टक्के भागावरील नफा. जरूर तेवढा एज्युकेशन फंड, कर्जदार सोसायट्यांना ठरेल ते रिबेट देण्यासाठी लागणारी रक्कम. मात्र रिबेट वजा जाता कोणत्याही सोसायटीच्या कर्जा-वरील पडणारा व्याजाचा ऐन दर हा द. सा. द. शें. तीन टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये.

वरीलप्रमाणे रक्कम बाजूला काढल्यावर उरणारी रक्कम खालील सर्व अगर काही बाबींसाठी काढतां येईल–( १ ) डिव्हिडंड इक्विलायझेशन फंड. ( २ ) बुडीत कर्जफंड. ( ३ ) बिल्डिंग फंड. ( ४ ) प्रचारफंड. ( ५ ) नोकरास बोनस–जास्तींत जास्त दोन महिन्यांच्या पगाराइतका.

## स्वाध्याय

( १ ) औद्योगिक सोसायट्यांचे वेगवेगळे प्रकार सांगून त्या प्रत्येकाची स्थूलमानाने थोडक्यांत माहिती द्या.

( २ ) उत्पादक सोसायट्यांचे उद्देश सांगून त्या सोसायटीमुळे सभा-सदांना कोणते फायदे मिळू शकतात ?

( ३ ) या सोसायट्यांच्या मार्गातील अडचणी सांगून त्या दूर करण्या-साठी कोणते उपाय योजावेत ?

( ४ ) तुमच्या भागातील एखाद्या घरगुती धंद्याबद्दल माहिती द्या. सहकारी संस्थांमार्फत त्याला काय मदत करता येण्यासारखी आहे ?

( ५ ) आपल्या देशात सहकारी पद्धतीने ग्रामोद्योग, कुटिरोद्योग सुसंघटित करण्याला किती महत्त्व आहे याची चर्चा करा.

( ६ ) उत्पादक सोसायटीला कर्ज पाहिजे असल्यास तिने कोणकोणत्या गोष्टींचा उल्लेख आपल्या अर्जात केला पाहिजे? कर्ज देताना बँक कोणत्या बाबींकडे लक्ष देईल?

( ७ ) महाराष्ट्र राज्यात सहकारी पद्धतीवर कुटिरोद्योग आणि लहान उद्योगधंदे यांची उभारणी करण्याची कशी शक्यता आहे याचे वर्णन करा.

( ८ ) जिल्हा औद्योगिक मंडळ व महाराष्ट्र स्टेट इंडस्ट्रिअल को-आपरेटिव्ह असोसिएशनचे उद्देश व घटना सांगा.

जंगल-कामगारांची सोसायटी :—

सरकारी जंगले ही फॉरेस्ट खात्याच्या ताब्यात असतात व या जंगलापैकी कोणता भाग तोडण्यालायक आहे, हे फॉरेस्ट डिपार्टमेंट ठरवून देत असते. जंगलाचे सोयिस्कर असे विभाग पाडण्यात येतात व ज्या झाडांची पूर्ण वाढ झालेली असते, त्या विभागातील झाडे तोडण्याची परवानगी देण्यात येते. या प्रत्येक विभागास 'कूप' असे म्हणतात. हे कूप तोडण्यासाठी व त्या लाकडांची विक्री करण्यासाठी या विभागाचा लिलाव करण्यात येतो. व्यापारी चढाओढीने हे लिलाव घेत असतात व नंतर त्या विभागातील झाडे पाडून व त्यांची इमारती लाकडे, जळाऊ लाकडे, कोळसा वगैरे करून तो माल शहरात विकीत असतात. या धंद्यामध्ये व्यापाऱ्यांना पुष्कळच नफा होत असे.

आपल्या प्रांतात ठाणे, नाशिक, पंचमहाल वगैरे विभागात जंगले बऱ्याच प्रमाणात आहेत. त्या जंगलातील कूप आजपर्यंत लिलाव-पद्धतीने व्यापाऱ्यांना विकण्यात येत असत व व्यापारी लोक त्या त्या विभागात राहणाऱ्या मागासलेल्या वर्गांकडून जंगल तोडणे, कोळसा पाडणे वगैरे कामे अत्यंत स्वस्त दरात करून घेऊन त्यांच्या श्रमावर श्रीमंत होत असत. जंगल-कामगारांची अशा रीतीने पिळवणूक होऊ लागल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिति सुधारेना. काँग्रेस सरकार अस्तित्वात आल्यावर त्याने या वर्गाच्या सुधारणाकडे लक्ष दिले व त्या दृष्टीने मागासलेल्या वर्गाच्या उद्धाराचे काम करणाऱ्या काही समाजसेवक-संस्थांना जंगल कामगार संस्थांना प्रेरणा देण्यासाठी व त्यांचे पालकत्व स्वीकारण्यासाठी मान्यता दिली. अशा समाजसेवक-संस्था पंचमहाल, पश्चिम खानदेश, नाशिक, ठाणे, डांग, सुरत वगैरे ठिकाणी काम करीत आहेत व त्यांची नावे भिल्ल सेवामंडळ, आदिवासी सेवा

मंडळ, डांग सेवामंडळ, सर्वोदय-केंद्र; स्वराज्य-आश्रम वगैरे आहेत. या समाजसेवक-संघटना मिशनरी संस्थेप्रमाणे मागासलेल्या वर्गात काम करतात.

१९४७–४८ सालापासून जंगल कामगारांच्या संस्था स्थापन झाल्या. जंगल तोडण्याचे काम व्यापाऱ्यांना न देता ते या सोसायटयांना देण्यास सुरुवात केली. सदरहू सोसायटया समाजसेवक संघटनांच्या मदतीने चालविण्यात येतात. आजपर्यंत अशा प्रकारच्या सुमारे ३०० सोसायटया स्थापन करण्यात आलेल्या आहेत व त्यांना लाखो रुपयांची कॉन्ट्रॅक्ट्स् देण्यात आली आहेत.

कूप चालविण्यास घेण्यासाठी सरकारकडून या सोसायटयांना पुढीलप्रमाणे सवलती मिळतात–( १ ) कूप चालविण्याच्या दृष्टीने सोयिस्कर असलेले कूप निवडण्याची सवलत या सोसायटयांना मिळते. ( २ ) अशा प्रकारे निवडलेले कूप लिलावात न काढता त्या त्या सोसायटीला ' अपसेट ' किंमतीला विकण्यात येतात. ( ३ ) खरेदीच्या किंमतीच्या $\frac{1}{10}$ इतकी रक्कम अनामत म्हणून ठेवण्याची आणि खरेदीच्या रकमेचा पहिला हप्ता भरण्याबाबतची करारातील अट या सोसायटयांबाबत रद्द करण्यात आली आहे. ( ४ ) ' अपसेट ' ( योग्य विक्रीची रक्कम ) किंमत व अनामत रक्कम अगाऊ न भरता सरकारमान्य जामीन दिल्यास कूपातील माल नेण्यास परवानगी दिली जाते. ( ५ ) खरेदीची रक्कम भरण्यास दरसाल १५ जूनपर्यंत मुदत दिली जाते. ( ६ ) या प्रकारच्या सोसायटयांना कर्ज देण्यासाठी मध्यवर्ती बँकेकडे सरकारने काही रक्कम सुपूर्त केली आहे. शिवाय कर्जाच्या परतफेडीबद्दल सरकारने हमी घेतली आहे. त्यामुळे त्यांच्या भांडवलाची अडचण दूर होते.

या सोसायट्या पुढीलप्रमाणे कामे करतात—( १ ) जंगलातील झाडे तोडणे व त्याचे इमारती लाकडे व जळाऊ लाकडे असे वर्गीकरण करणे. ( २ ) लाकडे शहरात विक्रीस पाठविणे. ( ३ ) काही जळाऊ लाकडांचा कोळसा तयार करणे व तो शहरात विक्रीसाठी पाठविणे. याशिवाय काही सोसायटया सडका व रस्ते तयार करण्याचे काम घेतात. त्याचप्रमाणे काही सोसायटया बंधारे घालणे वगैरे कामे करतात. या सोसायटया 'जी जी' पत्रकातील पोटनियम स्वीकारतात.

उद्देश—( १ ) कामगारांची सांपत्तिक स्थिति सुधारण्यासाठी प्रयत्न करणे. ( २ ) खाजगी अगर सार्वजनिक कामांची टेंडरे देऊन किंवा अन्य रीतीने मक्ते मिळवून ती पुरी करणे. ( ३ ) सभासदांना उद्योगरहित राहावे लागणार नाही अशा रीतीने कामाची उभारणी करणे व प्रॉव्हिडंट फंडाची योजना करून सभासदांमध्ये काटकसर, स्वावलंबन व सहकार्य या गुणांची वाढ करणे. ( ४ )

जंगलांचे कूप, बिनसरकारी मालकी नंबर, मक्त्याने अगर इतर रीतीने मिळवून, जंगल तोडणे, त्याचा कोळसा व बिटा तयार करणे, इमारती व जळाऊ लाकडे, कोळसा वगैरे इन्डेन्ट पद्धतीप्रमाणे सरकार, इतर सोसायटया अगर गिऱ्हाईक यांना पुरविणे अगर प्रामाणिक दलालाकडे विक्रीसाठी पाठविणे. (५) जंगलात उत्पन्न होणारे इतर पदार्थ–डिंक, शिकेकाई, हिरडा, टेंभुरणीची पाने, पळसाची पाने वगैरे वस्तूचा व्यापार करणे, जरूर तर सरकारकडून त्याबद्दल लायसेन्स घेऊन सहकारी पद्धतीने विक्री करणे, तसेच सहकारी पद्धतीने सडका तयार करण्याचे काम हाती घेणे.

**सभासदत्व**——वारली, दुबळा, कातकरी, ठाकूर व इतर आदिवासी जातीतील इसमास या सोसायटीचे सभासद होता येते. मात्र तो इसम सोसायटीच्या कार्यक्षेत्रातील गावात राहाणारा असला पाहिजे. आदिवासींच्या उन्नतीविषयी सहानुभूतीपूर्वक झटणाऱ्या इसमालाही सहानुभूतीदर्शक सभासद होता येते. परंतु त्यांची संख्या पांचपेक्षा जास्त असत नाही.

वार्षिक साधारण सभा भरण्यापूर्वी १४ दिवस व विशेष साधारण सभा भरण्यापूर्वी ७ दिवस लेखी नोटीस द्यावी लागते. दोनपंचमांश किंवा वीस यांपैकी कमी असलेली संख्या कोरम समजली जाते.

**घटना**——व्यवस्थापक कमिटी नऊ इसमांची असते. त्यात आदिवासी सभासदांचे चार, सहानभूतीदर्शक सभासदापैकी दोन, असि. रजिस्ट्रारचा नॉमिनी एक, डिव्हिजन फॉरेस्ट ऑफिसरचा एक प्रतिनिधि आणि महाराष्ट्र स्टेट को. बँक अथवा ज्या संस्थेकडून कर्ज घेतले असेल त्या संस्थेचा एक असे सभासद असतात. पांच सभासदांचे कोरम होते. कोणाही सभासदाला निदान दहा भागांचे पैसे पूर्ण भरल्याखेरीज व्यवस्थापक कमिटीचे सभासद होता येत नाही. या सोसायटयांचे वर्ष एक ऑक्टोबरला सुरू होते व ३० सप्टेंबरला संपते.

**व्यवस्थापक कमिटीची कामे**——(१) सोसायटीच्या नोकरांची नेमणूक करणे अथवा त्यास काढून टाकणे; (२) एखाद्या इसमाचे सभासदत्व साधारण सभेचा ठराव होईपर्यंत तहकूब ठेवणे; (३) मंडळीचे हिशेब तयार करणे व तपासणे; (४) सभासद व मजूरदार यांना काम देणे, त्यांमध्ये शिस्त राखणे, तसेच त्यांचे निरनिराळे भाग किंवा टोळया बनवून त्या प्रत्येकावर मुकादम नेमणे; (५) मेंबर व मजूरदार यांना वेतन कोणत्या दराने देणे ते ठरविणे; (६) कर्ज उभारणे व ठेवी मिळविणे; (७) मजुरीचे प्रमाण ठरविणे; (८) टेंडर देणे, करार करणे, मालखरेदीसंबंधाने निर्णय घेणे; (९) सभासद व नोकर यांच्यामध्ये कामाची वाटणी ठरविणे; (१०) कोर्टात कज्जे दाखल

करणे, चालविणे अथवा तडजोड करणे; ( ११ ) जरूर पडल्यास किंवा योग्य वाटल्यास पगारी सुपरिंटेंडेंट अथवा दुसरे वाकबगार कामगार नेमणे; ( १२ ) सार्वजनिक अगर खाजगी स्वरूपाची कामे मक्त्याने टेंडर्स देऊन अगर अन्य रीतीने घेणे; त्याचप्रमाणे लहान कामे अगर इतर अन्य प्रकारची रोजंदारीची कामे उक्ती घेणे.

जबाबदार मंडळ:—वार्षिक साधारण सभेत चार इसमांचे जबाबदार मंडळ नेमतात. त्यांत खात्याचा एक, डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर एक, पालकसंस्थेचा एक व बँकेचा एक असे सभासद असतात. त्यांची कामे—सोसायटीचे हिशेब पाहाणे व तपासणे. वर्ष-अखेरीस सोसायटीची सांपत्तिक स्थिति व कार्यासंबंधी रिपोर्ट करणे. हे मंडळ महिन्यातून एक वेळ तरी भरले पाहिजे.

पालकसंस्थेची कामे:— कूप मिळवून देणे, पंच-कमिटी निवडणे. चेअरमन निवडणे व मार्गदर्शन करणे.

सरकारी मदत:—३००० रुपयेपर्यंत शेअर-भांडवलात भागीदारीकरिता, पहिली दोन वर्षे १२०० रुपयेप्रमाणे व्यवस्था खर्चाकरिता व पहिली तीन वर्षे १५०० रुपयेप्रमाणे कल्याणकारी खर्चाकरिता मदत मिळते.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतील कार्यक्रम :—

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत जंगल कामगारांच्या १६५ सहकारी संस्था नव्याने प्रस्थापित करावयाच्या आहेत. तसेच राज्याच्या प्रत्येक वनमंडळामध्ये असणाऱ्या जंगलकामगार सोसायट्यांची वनमंडळानुसार एक मध्यवर्ती संघटना स्थापन करण्यात यावयाची आहे. राज्यात १५ वनमंडळे असून त्यामध्ये जंगल सहकारी मध्यवर्ती संघटना स्थापन होणार आहे. या मध्यवर्ती संघटनांनी आपल्या कक्षेतील जंगल कामगार सहकारी संघटनांवर देखरेख ठेवणे, त्यांना सहाय्य व मार्गदर्शन करणे ही कामे करावयाची आहेत.

या सहकारी संस्थासाठी आवश्यक असणाऱ्या चिटणीस, हिशेबनीस, डेपो क्लार्क, एजंट, मुकादम वगैरे नोकरांस प्रशिक्षण देण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. यासाठी सहकारी आणि जंगलकारभारशास्त्र यांचे प्रशिक्षण देणारी मध्यवर्ती शाळा सुरू करण्यात येणार आहे.

या सोसायटीची वैशिष्ट्ये:—( १ ) पोटनियमात पालक-संस्थेची तरतूद. ( २ ) सहानुभूतीदर्शक सभासद घेतले जातात. ( ३ ) कूप लिलाव न करता अपसेट प्राइसला दिले जातात. ( ४ ) अपसेट प्राइस भरण्यासाठी मदत दिली जाते. ( ५ ) शेअर-भांडवल, व्यवस्था-खर्च व कल्याणकारी खर्च या-

करिता सरकारी मदत. ( ६ ) कूप सोसायटीकरिता राखून ठेवले जातात. ( ७ ) नफातोट्यात सरकारची भागीदारी.

**संस्थेत ठेवण्यात येणारी पुस्तके व रजिस्टरे :—**

कूपातील रजिस्टरे :— ( १ ) उत्पादन रजिस्टर ( माल किती निघाला याबाबत माहिती. ) ( २ ) मजुरी-रजिस्टर ( तोड, फोड, ओढ वगैरेसंबंधी ) ( ३ ) स्टॉक-रजिस्टर ( कूपातील डेपोवर किती माल आला याची नोंद. ) ( ४ ) माल रवानगी रजिस्टर ( माल रवाना केल्याबद्दल नोंद दर्शविणारे ) ( ५ ) फॉरेस्ट पास रजिस्टर ( माल रवाना करतेवेळी फॉरेस्ट पास देण्यात येतो, याबद्दल ). ( ६ ) कीर्द. ( ७ ) खतावणी. ( ८ ) हजेरी-रजिस्टर. ( ९ ) पावती-बुक. ( १० ) पगारबुक. ( ११ ) मजूरबुक ( यात प्रत्येक मजुराची नोंद केली जाते ). ( १२ ) मोटार, बैलगाडी माल रवानगी डुप्लिकेट बुकें. ( १३ ) शेअर ॲडव्हान्स खाते.

मुख्य डेपो अगर हेड ऑफिसमधील बुके—१ कीर्द, २ खतावणी, ३ मेंबर-रजिस्टर, ४ शेअर ॲडव्हान्स खतावणी, ५ शेअरखाते, ६ शेअर रजिस्टर, ७ शेअर सर्टिफिकेट, ८ स्टॉक रजिस्टर, ९ वाहतूक रजिस्टर, ( मोटार, बैलगाडी, निरनिराळे कूपवार ), १० गट रजिस्टर, ( मालाचे गट लावण्यात येतात त्याबद्दल ), ११ मालविक्री रजिस्टर, १२ माल रजिस्टर, १३ व्यापारी रजिस्टर, १४ माल निर्यात रजिस्टर, १५ फॉरेस्ट पास रजिस्टर, १६ डिव्हिडंड रजिस्टर, १७ पंचकमिटी प्रोसिडिंग बुक, १८ जनरल सभा प्रोसिडिंग बुक, १९ डेडस्टॉक रजिस्टर, २० पगार-रजिस्टर, २१ व्यक्तिगत रजिस्टर, २२ बिलबुके ( माल विक्री झाल्यावर बिले करण्याचे ), २३ जमा पावती बुक, २४ बोनस रजिस्टर, २५ आवक बारनिशी, २६ जावक बारनिशी, २७ हजेरी-बुक, २८ प्रॉव्हिडंट फंड खतावणी, २९ अधिकारपत्र ( माल दिल्याबाबत ), ३० ॲडव्हान्स बुक, ३१ मालनोंद बुक ( रोज येणाऱ्या मालाचे ).

नफा-वाटणी—( १ ) २५ टक्के रिझर्व्ह फंड. ( २ ) जास्तीत जास्त २५ टक्के भागांवर नफा. मात्र तो प्रत्येक भागावर सव्वासहा टक्क्यांपेक्षा अधिक नसावा. ( ३ ) ३० टक्केपर्यंत सोसायटीत काम करणाऱ्या सर्व इसमांस ( मग ते मेंबर असोत किंवा नसोत ) बोनस. ( ४ ) २० टक्के सभासदांच्या प्रॉव्हिडंट फंडाकडे. ( ५ ) उरलेला नफा बेकारी फंड खाते जमा करण्यात येईल.

प्रॉव्हिडंट फंड व बेकारपणाकरिता फंड हे वेगवेगळे व्याजी लावले जातील व ज्या वेळी सोसायटीच्या मेंबरांपैकी एखाद्यास काम नसेल किंवा त्याला

पोटगीखर्चाची जरुरी असेल त्या वेळी मॅनेजिंग कमिटी आपल्या अधिकारात बेकारफंडामधून रक्कम खर्च करील.

जंगल-कामगार सोसायटीचे काम कसे चालते ? :-- प्रथम सोसायटीचे अधिकारी व फॉरेस्ट ऑफिसर कूपाची पाहाणी करतात. पाहाणी करून कूपाची अपसेट प्राइस ठरविली जाते. अपसेट प्राइस म्हणजेच कूपात एकंदर माल किती निघेल याचा प्रथम अंदाज करतात. त्यानंतर पुढील खर्चांचा अंदाज केला जातो.--

( १ ) तोडकाम खर्च, ( २ ) लाकूड-घडाई, ( ३ ) लाकूड-तासाई, ( ४ ) लाकूड गोळा करणे, ( ५ ) लाकूड ओढकाम व बूड सफाई, ( ६ ) कोळसा-विकाई, ( ७ ) एका मुकदमाचे आठ महिन्यांचे वेतन, ( ८ ) राब भराई. ( ९ ) रेषा मजुरी, ( १० ) मांडव उभारणे, ( ११ ) डेपो क्लार्क अगर एजंट याचे सहा महिन्यांचे वेतन. ( १२ ) मोटार भराई; हमाली, ( १३ ) कूपडेपो ते विक्रीडेपो वहातूक खर्च, गाडी अगर मोटारने, ( १४ ) रस्तादुरुस्ती खर्च ( १५ ) पासबुके खर्च, ( १६ ) म्युनिसिपल जकात टोलनाके, ( १७ ) वखार-जागाभाडे, ( १८ ) वखार ऑफिस भाडे, ( १९ ) मांडव खर्च, ( २० ) वखार डेपो क्लार्कचा एका वर्षाचा पगार, ( २१ ) वॉचमनचा एक वर्षाचा पगार, ( २२ ) गट-लावाई ( २३ ) वजन व मापाई खर्च; ( २४ ) मोटार-रेल्वे भराई, ( २५ ) सेक्रेटरी वेतन, ( २६ ) क्लार्क वेतन, ( २७ ) छपाई, ( २८ ) टपाल, (२९) प्रवास-खर्च, ( ३० ) इतर कर, ( ३१ ) कर्जाचे व्याज, ( ३२ ) विमाखर्च, ( ३३ ) कमिशन दलाली, ( ३४ ) डेडस्टॉक झीज ( ३५ ) किरकोळ, ( ३६ ) सरकारी मंजूर खर्चा-वर शे. २ प्रमाणे समाजकल्याण खर्च.

या छत्तीस कलमी खर्चावर शेकडा १० टक्के मार्जिन ठेवून तो खर्च अंदाजी किंमतीतून उणे करतात व जी किंमत राहील त्याला अपसेट प्राईस म्हणतात. ही अपसेट प्राईस सोसायटीला भरावी लागते. त्याखेरीज डेपोमधून फायनल माल हलविण्याचा शेवटचा पास दिला जात नाही. सोसायटीला अपसेट प्राईस मान्य झाल्यावर सोसायटी कूप तोडण्याचे काम हाती घेते. अपसेट प्राईसमध्ये शेकडा दहा टक्क्यांपेक्षा जास्त तफावत पडल्यास प्लॅनिंग कमिटीकडे तक्रार नोंदली जाते. नाहीतर फॉरेस्ट खात्याची किंमत मान्य केली जाते. कूप तोडण्याचे काम मजुरीने किंवा पीसवर्कने केले जाते. मजुरी पुरुषास दीड रुपाया, बाईस सव्वा रुपाया व मुलास ७५ नये पैसे दिली जाते. हे काम आक्टोबरपासून एप्रिलपर्यंत संपवावे लागते. सोसायटी मेंबरांच्या टोळ्या करून त्यांच्याकडून प्रथम रेषाकाम करून घेते. नंतर झाडे तोडण्याचे कार्य केले

जाते. ही तोड करतांना मूळ कूपाचे तीन भाग करून नंतर ते सब–कूप तोडले जातात. नंतर त्याची छाटणी करून लाकडाचे ग्रेडींग केले जाते. छिलाईची आवश्यकता असल्यास तीहि केली जाते. नंतर कूपात एक सोईस्कर डेपो तयार करून त्या ठिकाणी माल ओढून आणून एका ठिकाणी गोळा करून ठेवला जातो. हे काम पाहण्याकरिता कूपास सोसायटीतर्फे कूप-एजंट, मुकादम वगैरे नोकर असतात. एजंट कूपातील रजिस्टरे भरण्याचे काम करतो. साधारण सात दिवसांनी कूपांचा आठवडा-रिपोर्ट पाठविला जातो. नंतर कूपातील डेपोमधून मालविक्री डेपोमध्ये माल हलविला जातो. त्या वेळी फॉरेस्ट पास व रवानगी पास यांची जरूरी भासते. फॉरेस्ट खात्याकडून पासाची चार पुस्तके सुरवातीस दिली जातात. त्या पुस्तकामधील पास फॉरेस्ट-नाक्यावर दाखवावे लागतात. फॉरेस्ट पासचे नंबर्स रवानगी पासवर नोंदले जातात. फॉरेस्ट पासाच्या स्थळ-प्रतीची बुके परत दिल्यानंतर दुसरी नवी पुस्तके सोसायटीला मिळतात. रवानगी पासाच्या तीन प्रती तयार केल्या जातात. त्यापैकी एक स्थळप्रत राहते. दुसरी गाडीवानाबरोबर दिली जाते. ती प्रत गाडीवान डेपोवर माल टाकून आल्यावर सोसायटीला दाखवितो व त्याप्रमाणे पैसे दिले जातात. तिसरी प्रत कूपातून सोसायटीकडे परस्पर पोस्टाने पाठविली जाते. नंतर विक्री-डेपोवर लाकडाचा लिलाव केला जातो. लिलाव बोलताना सुरवातीस पाचशे रुपये डिपॉझिट ठेवावे लागते. नंतर लिलाव ज्याच्या नांवाने तीन वार होईल त्याला $\frac{1}{4}$ रक्कम ताबडतोब भरावी लागते. त्यानंतर १५ दिवसात उरलेली $\frac{3}{4}$ रक्कम भरून माल हलविला पाहिजे. माल हलविते वेळी फॉरेस्ट खात्याचा पास लागतो. त्यासाठी सोसायटीकडून लिहून जाते व फॉरेस्ट खाते त्या व्यापाऱ्याला पास देते. नतर व्यापारी माल हलवितात.

रेषाकाम म्हणजे कूप तोडण्यापूर्वी सर्व कूपाच्या सभोवती सुमारे १५ फुटाची जागा साफ करणे होय. कदाचित् कूपाला आग वगैरे लागली तर त्याची झळ शेजारच्या कूपातील झाडांना बसू नये, हा उद्देश रेषाकामाचा असतो. कूपात काही ठिकाणी रस्ते चांगले नसतात. त्याकरिता कच्चे रस्ते तयार करावे लागतात. कूपात पुन्हा झाडाची नवीन लागण करण्यासाठी जमीन साफ लागते; त्यासाठी कूपातील मूळच्या झाडांना फुटा फुटू नये म्हणून विशिष्ट क्षेत्रात राब घालतात. राब म्हणजे पाने, किरकोळ जळण वगैरे तीन फूट उंच रचून पेटवून देतात. त्याला राब म्हणतात. कल्याणकारी खर्चामधून पाण्याची व्यवस्था, औषधोपचार, पूरक अन्न, शिक्षणवर्ग, करमणूक, भजनीमंडळ वगैरे-साठी खर्च केला जातो.

वरील पद्धत सन १९५३ सालापासून सन १९५९ पर्यंत चालू होती. परंतु आता ता. २३ डिसेंबर १९५९ रोजी सरकारने एक पत्रक काढून सन १९५९-६० सालापासून नवीन पद्धत अमलात आणण्याचे ठरविले आहे.

**नवीन पद्धत**:—या कूपावर जंगलखात्याची आरंभापासून अखेर-पर्यंत देखरेख राहील. त्यासाठी जंगल-खात्यातर्फे एक मनुष्य सोसायटीकडे कूपएजंट म्हणून नेमला जाईल. त्याचा पगार सोसायटीला द्यावा लागेल. मालाचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवणे, मालाचे पास देणे वगैरे कामे या एजंटास पहावी लागतील. नवीन वर्षाच्या सुरवातीस सोसायटीने जंगल-खात्याशी करार केला पाहिजे. त्यासाठी जंगल-खाते त्या त्या विभागाच्या कार्यक्षेत्रांतील सोसायटयांना कूप देऊ करते. करार करण्यापूर्वी सरकारकडे पूर्वीप्रमाणे रक्कम भरण्याची आवश्यकता नाही. सरकारने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे सर्व काम सोसायटीने आपल्या खर्चाने करावयाचे आहे. हा होणारा खर्च ३६ कलमी तक्त्यात दिलेला आहे. प्रत्यक्ष होणारा योग्य असा खर्च व प्रवासभत्त्याची जास्तीत जास्त २५० रु. रक्कम मान्य केली जाते.

लाकडाचा लिलाव करण्याची जाहिरात वर्तमानपत्रांमध्ये देण्यापूर्वी एक आठवडा अगोदर त्या त्या गटाची अपसेट प्राईस सोसायटी व जंगलखाते ठरविते. किमतीमध्ये मतभेद झाल्यास डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर किंवा कॉन्झर्वेटर यांनी सांगितलेली किंमत कायम धरतात. नंतर मालाचा लिलाव लोकल डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर किंवा त्याचा प्रतिनिधि यांच्या देखरेखी-खाली केला जातो. साधारणपणे अपसेट प्राईसपेक्षा जास्त रक्कम आल्यास लिलाव कायम केला जातो. लिलाव कायम करणे अगर न करणे हे जंगल-खात्याच्या ऑफिसरवर अवलंबून राहील. लिलावात बोलणारांनी सुरवातीस ५०० रुपये डिपॉझिट भरले पाहिजे. लिलावात आलेल्या रकमेपैकी ७० टक्के रक्कम तावडतोब सरकारी खजिन्यात भरली पाहिजे व उरलेल्या ३० टक्क्या-मधून सोसायटीने केलेला खर्च, कर्ज फेडण्यासाठी व सरकारची बाकी देण्यासाठी खर्च होतील. कूपासाठी येणारा खर्च वेगवेगळ्या बाबींसंबंधी ठरविण्याकरिता पुढील पाच इसमांची एक कमिटी नेमलेली असते :—

(१) कॉन्झर्वेटर ऑफ् फॉरेस्ट ऑफ् दी सर्कल (चेअरमन). (२) डायरेक्टर ऑफ् कॉटेज इंडस्ट्रीज यांनी त्या त्या भागातून नॉमिनेट केलेला जंगल कामगार सोसायटयांचा एक प्रतिनिधि. (३) जंगलाच्या कॉन्झर्वेटरने नॉमिनेट केलेले दोन कॉंट्रॅक्टर्स. (४) त्या त्या भागाच्या सर्कलचा डिव्हि-जनल फॉरेस्ट ऑफिसर. या कमिटीने खर्चाचे दर ठरविल्यानंतर सोसायटीचा खर्च १ जुलैपासून ३० जूनपर्यंत धरला जाईल. ३० टक्के रकमेपैकी कमी

खर्च झाल्यास उरलेली रक्कम सोसायटीने जंगलखात्याला परत केली पाहिजे व जर खर्च जास्त झाला असेल तर तो ३१ जुलैपर्यंत जंगलखात्याकडून सोसायटीला मिळेल. मात्र त्यासाठी सोसायटीचें ऑडिट झालें पाहिजे, ही अट घातली आहे. ऑडिट झाल्याशिवाय रक्कम मिळणार नाही. या कूपा-पासून जो नफा सरकारास मिळेल त्यापैकी पुढीलप्रमाणे त्याचा भाग सोसायटीला मिळेल. प्रत्यक्ष रजिस्ट्रेशन झाल्यापासून १ ऑक्टोबरपर्यंत तीन वर्षे झालेल्या सोसायटीला नफ्याचा २५ टक्के नफा मिळेल. तीन ते सहा वर्षेपर्यंत २० टक्के नफा; सहा ते नऊ वर्षोपर्यंत १५ टक्के नफा व नऊ वर्षांपेक्षां जास्त जुन्या असलेल्या सोसायटीला शेकडा १० टक्के नफा दिला जाईल. एक वर्ष या नवीन पद्धतीप्रमाणे चाललेल्या कामावर देखरेख ठेवून त्यात काही सुधारणा करणे जरूर आहे किंवा कसे याबद्दल सूचना करण्यासाठी तीन लोकांची एक कमिटी नेमली आहे. या कमिटीमध्ये (१) चीफ् कॉन्झर्वेटर ऑफ् फॉरेस्ट, (२) डायरेक्टर ऑफ् कॉटेज इंडस्ट्रीज व (३) ॲडिशनल रजिस्ट्रार फॉर इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्हज् ही मंडळी आहेत.

**को-ऑर्डिनेशन कमिटी :**— जंगल-कामगार सोसायट्यांची संख्या जास्त वाढू लागल्यामुळे सहाजिकच त्यांच्या देखरेखीचा प्रश्न निर्माण झाला. या सोसायट्यांवर देखरेख ठेवून त्यांना मार्गदर्शन करण्याकरिता व त्यांच्या दैनंदिन कामकाजातील अडचणी दूर करण्यासाठी ता. १२।१०।१९५७ पासून को-ऑर्डिनेशन कमिटी नेमण्यात आली आहे. या कमिटीवर पुढील-प्रमाणे नऊ लोक असतात :—

स्पॉन्सरिंग बॉडीपैकी एक—हा या कमिटीचा अध्यक्ष असतो. फॉरेस्ट डिपार्टमेंटचे दोन अधिकारी; असिस्टंट रजिस्ट्रार, सोसायट्यांपैकी चार व डिस्ट्रिक्ट ऑफिसर फॉर फॉरेस्ट लेबरर हा सेक्रेटरी असतो.

## स्वाध्याय

(१) जंगल-कामगार सोसायट्यांचे उद्देश सांगून त्यांच्या कामाची माहिती द्या.

(२) जंगल-कामगार सोसायट्यांना सरकारने दिलेल्या सवलती सांगा.

(३) टीपा द्या—कूप; सहानुभूतीदर्शक सभासद; समाजसेवक संस्था; अपसेट प्राइस, को-ऑर्डिनेशन कमिटी; कल्याणकारी खर्च.

(४) पालक-संस्थेची कामे सांगा.

(५) जंगल-कामगार सोसायट्यांचे काम नवीन पद्धतीने कसे चालते ?

(६) जंगल-कामगार सोसायटीची वैशिष्ट्ये सांगा.

◆◆◆

## उत्पादक सहकारी सोसायट्यांचे वेगवेगळे प्रकार आणि त्यांची वैशिष्टये.

( १ ) स्वतःचा कारखाना ( वर्कशॉप ) चालविणारी सोसायटी :– मुख्य उद्देश–उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल सोसायटीच्या भांडवलातून व सोसायटीच्या मालकीचा म्हणून खरेदी करणे, होणारे उत्पन्न सोसायटीच्या मालकीचे समजणे, उत्पादन होणाऱ्या पक्क्या मालाची विक्री सोसायटीने करणे व विक्रीचे पैसे सोसायटीच्या भांडवलात पुन्हा जमा करणे.

सोसायटी जे इसम नोकर म्हणून आपल्या कारखान्यात नेमील ते शिस्तीने वागणारे असून योग्य प्रकारे काम करतात, असे किमान एक वर्षभर दिसून आल्यास त्यांना सभासद करून घेतले जाते.

ही सोसायटी चालविताना पुढील बाबींचा प्रामुख्याने विचार करावा लागतो :–वर्कशॉप (कारखाना) कोणत्या जागी काढावा हे ठरविणे, कामाची वाटणी करणे. वेगवेगळ्या नोकरांचे किंवा कारागिरांचे वेतनाचे दर ठरविणे, वेगवेगळ्या कामगारास अंगावर उक्ते काम देणे. विशिष्ट वेळांत काम पुरे झाले पाहिजे, त्या अटी ठरविणे. काही कामगारांच्या टोळीस संयुक्तपणे उक्ते काम देणे. कामाचे दररोजचे तास ठरविणे. कामगारास शिस्त लावणे. कामगारांच्या कामांत वाढ व सुधारणा तज्ज्ञ या नात्याने घडवून आणणे.

( २ ) आपापल्या घरी काम करणाऱ्या कारागिरांची सोसायटी– मुख्य उद्देश :— सभासदांना लागणाऱ्या कच्च्या मालाची संयुक्तपणे खरेदी करणे, सभासदांच्या पक्क्या मालाची संयुक्तपणे विक्री करणे. कच्च्या मालाची व पक्क्या मालाची मालकी वैयक्तिक सभासदांची असते. मात्र अंशतः वैयक्तिक सभासदांच्या व अंशतः सोसायटीच्या मालकीची हत्यारे-अवजारे वगैरे असतात. जे इसम सोसायटीचे नोकर म्हणून शिस्तीने व योग्य प्रकारे काम करतात त्यांना पुढे काही महिन्यांनी सभासद होता येते. ही सोसायटी चालविताना पुढील बाबींचा विचार मुख्यत्वे करावा लागतो :—

कचेरीची जागा ठरविणे, कामे व कामाचे ठेके मिळविणे व त्यांची सभासदांत वाटणी करणे. मालाच्या किंमती ठरविणे. मालाच्या खरेदीवर व विक्रीवर आकारावयाच्या कमिशनचे दर ठरविणे, एकाच इमारतीत काम करण्यास सभासदांना सांगणे व प्रोत्साहन देणे.

( ३ ) वेगवेगळ्या खेड्यांत राहाणाऱ्या कारागिरांची सोसायटी– कच्च्या मालाची खरेदी, पक्क्या मालाची विक्री, उत्पादनाची मालकी, अवजारे–

उपकरणे वगैरेची मालकी वेगवेगळ्या सभासदांची म्हणजे तुटक तुटक व विभक्त अशी असते. त्यामुळे सहकार्य मर्यादित स्वरूपाचे राहाते. सोसायटीच्या नोकरांना काही काळानंतर सभासद करून घेतले जाते. आपल्या नोकरांना किती वेतन द्यावे हे ठरविण्याचा अधिकार व हुकमत सोसायटीची असते. ही सोसायटी चालविताना पुढील बाबींचा विचार विशेषत्वाने करावा लागतो—

कचेरी कोणत्या जागी ठेवावी ? सोसायटीने कोणत्या प्रकारची व कोणत्या मर्यादेपर्यंत कामे करावयाची ते ठरविणे; सोसायटीने जी कामे किंवा कामाचे ठेके मिळविले असतील त्यांची सभासदांत वाटणी करून देणे. खरेदीविक्रीवर द्यावयाच्या कमिशनचे व इतर खर्चाचे दर ठरविणे. काही बाबतीत सभासदांना आपल्या कच्च्या पक्क्या मालाची अनुक्रमे खरेदी व विक्री करण्यास परवानगी देणे, मालाच्या किंमती ठरविणे, नोकरास द्यावयाच्या वेतनाचे दर ठरविणे, सभासदांना त्यांच्या कामाच्या बाबतींत तज्ज्ञ या नात्याने सल्ला देणे.

( ४ ) मजुरीचा ठेका घेणाऱ्या संस्था--मुख्य उद्देश—कामे व कामाचे ठेके मिळविणे, हत्यारे पुरविणे, जरूर तर जादा नोकर नेमणे, मजूर व कारागीर असा फरक करणे.

ही सोसायटी चालविताना पुढील बाबींचा विचार करावा लागतो—मजूर व कारागीर नोकर म्हणून कामावर किती घ्यावेत व त्यांची योजना कोठे करावी ते ठरविणे; कामे व कामाचे ठेके मिळविणे; मिळविलेली कामे सभासदाकडून करवून घेणे, मजुरांच्या टोळ्या करणे व टोळ्यांचे पुढारी ठरविणे, वेगवेगळ्या सभासदांना किंवा सभासदांच्या टोळ्यांना उक्ते काम देणे, कामाची मजुरी ठरविणे व ती देणे, हत्यारे, अवजारे, यंत्रे सभासदांना पुरविणे व त्यांची मालकी कोणाची राहावी ते ठरविणे, सोसायटीच्या उत्पादनाच्या बाबी कोणत्या असतील ते ठरविणे, काम कमी असेल अशा वेळी सभासदांना किती वेतन द्यावयाचे अगर खर्चासाठी किती रक्कम द्यावयाची ते ठरविणे.

( ५ ) वेगवेगळ्या कारागिरांची मिश्र-संस्था—एकाच गावात अगर गांवाच्या गटात अनेक प्रकारच्या उत्पादक सोसायट्या असू शकतात. या उत्पादक सोसायट्यांना भांडवलाची मोठी अडचण पडते. शिवाय या सोसायटीतील सभासद अज्ञान असल्यामुळे पंच कमिटीवर फार तर एखादा दुसरा सभासद सुशिक्षित असतो. सेक्रेटरीचे काम करणारा इसमही बेताचा शिकलेला असतो. अशा वेळीं जर सर्व प्रकारच्या सोसायट्यांनी एकत्र येऊन आपली मल्टिपरपज औद्योगिक सोसायटी बनविली तर त्या सर्वांचे भाग भांडवल, रिझर्वफंड वगैरे मोठ्या प्रमाणांत जमा होईल. ज्या धंद्याला पैसे कमी पडतील

त्यांना ते देता येतील व ज्याचे पैसे उरत असतील ते दुसऱ्या धंद्याला वापरता येतील. सेक्रेटरीकरितां वेगवेगळ्या सोसायटयांना द्यावा लागणारा पैसा वाचेल. प्रत्येक सोसायटीची पंच कमिटी ही सब् कमिटी म्हणून काम पाहील व प्रत्येक सोसायटीचे चेअरमन मिळून मुख्य सोसायटीचे कार्यकारी मंडळ होईल व ते आपला चेअरमन निवडतील. शिवाय सर्वांचे भांडवल एकत्र झाल्यामुळे बँकेकडून भरपूर कर्ज मिळविता येईल. याशिवाय सोसायटीचे म्हणून काही नोकर ठेवावयाचे आहेत किंवा कसे व असल्यास किती व कोणते ते ठरविणे. माल साठविण्यासाठी कोठारे संपादन करणे, उत्पादन किती करावे व पक्क्यामालाची विक्री कशी करावी ते ठरविणे. सोसायटी स्वयंपूर्ण कशी होऊ शकेल ते ठरविणे, मालाच्या किंमती ठरविणे, कामकऱ्यांना द्यावयाच्या वेतनाचे दर ठरविणे, व ते देणे, त्यांना आगाऊ वेतन किंवा आगाऊ उचल किती द्यावी ते ठरविणे, कमिशनचे दर ठरविणे, सहकारी पद्धतीवर सभासदांची राहाण्याची सोय करणे, व त्यांत वाढ करणे, तज्ज्ञ या नात्याने सभासदांना सल्ला देऊन त्यांच्या कामात वाढ व सुधारणा होईल असा प्रयत्न करणे.

**( ६ ) कारागीर व कच्च्या मालाचे उत्पादक यांची मिश्र संस्था :–** **मुख्य उद्देश**—ही सोसायटी आपले स्वतःचे वर्कशॉप चालविणार आहे किंवा तिचे सभासद आपापल्या घरी काम करणार आहेत हे ज्याप्रमाणे ठरेल त्याप्रमाणे या सोसायटीचे उद्देश ठरवावे लागतील. ही सोसायटी चालविताना वेगवेगळ्या बाबी विचारांत घेऊन काम करावे लागेल. कारागीर व कच्च्या मालाचे उत्पादक यांच्यासंबंधी निरनिराळे नियम या संस्थेच्या पोटनियमात करावे लागतील.

**( ७ ) उत्पादक व ग्राहक अशा दोघांची संयुक्त सोसायटी**—वरील दोन्ही प्रकारच्या सोसायटींचे मुख्य उद्देश व काम चालविताना लक्षात घ्यावयाच्या विशेष बाबी बहुतकरून सारख्याच असतात.

**मुख्य उद्देश**–कच्च्या मालाची खरेदी, पक्क्या मालाची विक्री, उत्पादनाची मालकी; अवजारे, हत्यारे, यंत्रे, उपकरणी यांची मालकी सभासदांची वेगवेगळी तरी असते किंवा अंशतः सभासदांची व अंशतः सोसायटीची असते. ही सोसायटी चालविताना पुढील बाबींचा मुख्यत्वे विचार करावा लागतो. कचेरी किंवा वर्कशॉप कोणत्या जागी काढावे, नोकरवर्ग ठेवावा किंवा कसे, असल्यास कोणता व किती; माल साठविण्यासाठी कोठाराची तजवीज करणे, कच्च्या मालाची खरेदी करणे, उत्पादन किती करावे व पक्क्या मालाची विक्री कशी करावी ते ठरविणे, वेगवेगळ्या हितसंबंधीयांचे म्हणजे कारागिरांचे,

कच्च्या मालाच्या उत्पादकांचे किंवा गिऱ्हाइकांचे भाग किती असावेत ते ठरविणे, मालाच्या किंमती ठरविणे, कमिशनचे दर ठरविणे, नोकरांच्या वेतनाचे दर ठरविणे व ते देणे. तज्ज्ञ या नात्याने सभासदांना सल्ला देऊन त्यांच्या कामाची सुधारणा व वाढ होईल असा प्रयत्न करणे.

(८) वाहतूक करणाऱ्या सोसायट्या—मुख्य उद्देश-वहातुकीची व्यवस्था करणे, वाहतुकीची कामे किंवा ठेके मिळविणे, वाहनांची तपासणी व देखरेख करणे, वाहन विकत घेणे किंवा देणे, नोकर ठेवणे व मालाची व माणसाची वहातूक करणे.

ही सोसायटी चालविताना पुढील गोष्टीचा प्रामुख्याने विचार करावा लागतो.

कचेरी कोणत्या जागी ठेवावी, शाखा—कचेऱ्या कोठे काढाव्या, वाहने विकत घेणे, विकत देणे, वर्कशॉप, सर्व्हिस स्टेशन वगैरे सुरू करणे व वाहनांची दुरुस्ती करण्याची तजवीज करणे, त्यासाठी जरूर तो नोकरवर्ग नेमणे, उदा० ड्रायव्हर्स, क्लीनर्स, दुरुस्त्या करणारे फिटर्स, मेकॅनिक्स, तपासनीस, वरिष्ठ नोकर अंमलदार वगैरे. वाहतुकीचे वेळापत्रक ठरविणे, वाहतुक करण्याचे काम आगाऊ पत्करणे, वहातुकीचे दर ठरविणे व ते ठरविताना वाहने, रस्ते वगैरे योग्य प्रकारे दुरुस्त ठेवण्यासाठी येत असलेला खर्च व गिऱ्हाइकास समाधान वाटेल अशा तऱ्हेने त्यांच्या सुखसोई ठेवण्यासाठी येणारा खर्च हे लक्षात घेतले जावेत. वाहतुकीसंबंधी सरकार, म्युनिसिपॉलिट्या, वगैरेनी नियम पाळणे, परवाने मिळविणे.

## उत्पादक किंवा मजूर यांच्या सहकारी सोसायट्या चालविताना लक्षात ठेवावयाच्या काही गोष्टी

(१) सभासदांशी सहकार्यांची वागणूक :—कारखान्यात काम करणारे लोक हे मानव आहेत याची जाणीव कारखान्याचे चालकांनी ठेविली पाहिजे व मानवतेला योग्य दिसेल व साजेल अशीच वागणूक त्याने कामकऱ्यांशी ठेविली पाहिजे. काही काही कामकरी सुस्वभावी नसतात, ते कामात चुकारपणा करतात, एकमेकांचा द्वेष करतात, विशेष चिकित्सा करणारे असतात. उद्धटही असतात व त्यामुळे ते मालकाशी असहकार करतात हे खरे आहे. तसेच काही कामकरी फाजील मित्रेही असतात, तर कांहीं पक्षोपपक्ष निर्माण करणारे असतात. तथापि या सर्व गोष्टी कशा टाळता येतील याचाच विचार मालकाने केला पाहिजे व हा मालक जर सहकारी संस्था असेल तर तिने अर्थातच जास्त

प्रमाणात विचार केला पाहिजे. यासाठी सोसायटीने आपल्या सभासदांशीं विशेष घनिष्ठ संबंध ठेवले पाहिजेत व सोसायटीच्या कामकाजाची त्यांना योग्य ती माहिती दिली पाहिजे. विशेषतः सोसायटीस नुकसान पोहोचण्याचा संभव असेल तर अशी तजवीज शक्य तितक्या लवकर झाली पाहिजे. सर्व सभासदांना आपल्या सोसायटीच्या कामकाजात लक्ष घालण्याचे सारखेच हक्क आहेत हे लक्षात ठेवून त्यांचे सहकार्य जरूर मागावे. त्यांच्या कांहीं अडी-अडचणी असतील तर त्या समजावून घ्याव्या व त्या अडचणी कशा दूर करतां येतील यासंबंधी सभासदांच्या काही विधायक सूचना असतील तर त्या सोसायटीच्या चालकांनी अवश्य ऐकून घ्याव्यात. सभासदांना आपली बुद्धी वापरण्यास संधी देण्यात यावी व त्यांना आपापसांत विचारविनिमय करून वेगवेगळे उपाय सुचविण्यास प्रोत्साहन द्यावे. असे केल्याने सभासदांना आपल्या सोसायटीसंबंधी आपुलकी वाटू लागते व तिजबद्दल त्यांच्या मनात आदर निर्माण होतो असा अनुभव आहे.

(२) सभासदांचें शिक्षण — (अ) सहकाराची तत्त्वें सभासदांचे हक्क व त्यांची कर्तव्ये, सभासदांमध्ये एकोपा व सहकार्याची भावना निर्माण करणे, याबद्दलची माहिती व सहकाराबद्दलचे मूलभूत ज्ञान सभासदांना करून देण्यात यावे. (आ) विशिष्ट धंद्याचे शिक्षण ज्या त्या सभासदास मिळेल अशी तजवीज व्हावी. हे शिक्षण वेगवेगळ्या मार्गांनी देण्याचा प्रयत्न व्हावा. उदा०:—धंद्याची विशेष माहिती ही एकमेकांचे काम पाहून कामकरी मिळवू शकतो. तसेच कामकऱ्याच्या बुद्धिमत्तेप्रमाणे त्याला वेगवेगळ्या कारागिरां-बरोबर चर्चा करण्याची व आपल्या कामाबद्दलच्या अडीअडचणी मांडण्याची संधी मिळावी. त्यामुळे तो आपल्या कामात सुधारणा करू शकतो. (इ) त्याला सर्वसामान्य शिक्षण द्यावे. उदा०—त्याला प्रौढांच्या शिक्षणवर्गात हजर राहावयास लावून त्याला थोडेफार लिहिता वाचता व हिशेब ठेवता येईल इतके तरी शिक्षण देण्याची सोय व्हावी. असे झाल्यास त्याची नैतिक व सांस्कृतिक पातळी उंचावेल. (ई) कामकऱ्यांना आपले काम अधिक चांगल्या प्रकारे करता यावे, त्यांची राहणी सुधारावी व त्यांची करमणूक व्हावी यासाठी त्यांना जरूर ती साधने उपलब्ध करून दिली पाहिजेत. (उ) कामकऱ्यास काम अधिक चांगल्या प्रकारे करता यावे यासाठी तो ज्या जागेत काम करीत असेल तेथे भरपूर हवा, उजेड असला पाहिजे. काम काही ठराविक तासच त्याला करावयास सांगितले पाहिजे व दरम्यान त्याला विश्रांती मिळाली पाहिजे. (ऊ) त्याची राहणी सुधारण्यासाठी त्याला चांगल्या तऱ्हेचा निवास मिळाला पाहिजे. जीवनास लागणाऱ्या जरूर त्या

वस्तू त्याला उपलब्ध झाल्या पाहिजेत. लग्नकार्य, उत्सव वगैरेवर त्याचा फाजील खर्च होता कामा नये. जरूर तेवढी रक्कमच त्याला मिळाली पाहिजे. त्यासाठी त्याला किमान कर्ज मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. त्याला बचत करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे व पैसे ठेव म्हणून ठेवण्यास त्यास शिकविले पाहिजे. (ए) करमणुकीसाठी त्याला दरसाल काही रजा मिळाली पाहिजे व त्यासाठी रजेचे नियम असले पाहिजेत. वेळोवेळी त्याला विश्रांती मिळावी, खेळण्यासाठी क्रीडांगण असावे. तसेच क्लब, उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम वगैरेही त्याला वेळोवेळी उपलब्ध होतील अशी तजवीज झाली पाहिजे.

◆◆◆

# ५. उत्पादक सोसायट्यांची इतर देशांतील कांहीं माहिती

पाश्चात्य देशात अलीकडे उत्पादक सोसायट्यांची पुष्कळच प्रगती झालेली आहे. युरोपातील बहुतेक सर्व प्रमुख राष्ट्रात औद्योगिक सहकाराची वाढ झालेली आहे. त्याबाबतची माहिती मिळविल्यास त्यापासून आपणांस थोडेफार शिकता येण्यासारखे आहे.

आपल्या शेजारच्या चीन राष्ट्राने याबाबतीत अलीकडे बरीच प्रगती केल्याचे आपण ऐकतो. तशीच प्रगती आपणालाही करता येण्यासारखी आहे. सबब युरोपांतील वेगवेगळ्या देशात कोणकोणत्या प्रकारच्या सोसायट्या आहेत, यांची थोडीशी माहिती पुढे दिली आहे.

**इंग्लंड :—** इंग्लंडमध्ये उत्पादकांच्या अशा स्वतंत्र सोसायट्या असून त्याशिवाय ग्राहकांच्या सोसायट्यांनी संघटित होऊन आपल्या मध्यवर्ती संघामार्फत आपणास लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन काहीं प्रमाणात सुरू केलेले आहे. तथापि प्रत्यक्ष उत्पादकांच्या सोसायट्या म्हणजे ज्या सोसायट्यांचा कारभार मुख्यत: उत्पादकांच्या हातीं असतो, अशा सोसायट्यांची जी माहिती को. ऑपरेटिव्ह युनियनने सन १९४५ साली प्रसिद्ध केली होती त्यावरून पुढील परिस्थिति दिसून येते :—

एकंदर ९० औद्योगिक सोसायट्यांची माहिती मिळू शकली. त्यात ९ विणकर, २१ चर्मकार, ३ लोहार, १९ छपाई व पुस्तके बांधणे, १६ पेंट व इतर ६ अशा होत्या. इंग्लंड हे मुख्यत: औद्योगिक राष्ट्र असल्याने तेथील वेगवेगळे मजूर, कारागीर वगैरे कोठल्या ना कोठल्या तरी कारखान्यात सामान्यत: नोकरी करतात. तथापि काही कारागीर नोकरी करण्याऐवजी से

आपापला धंदा संघटितपणे करून आपणांस जास्त मजुरी मिळविण्याचा सहकारी पद्धतीनें प्रयत्न करीत असतात. कायमची नोकरी करीत राहाण्या-ऐवजीं स्वावलंबनाच्या तत्वावर काहीं कारागीर आपापल्या सोसायट्या स्थापन करतात व आपल्या मजुराचा स्वतःस जास्तीत जास्त फायदा करून घेतात. अशा कारागिरांना काही दिवसाच्या सतत प्रयत्नामुळे नोकरीपेक्षा जास्त पैका मिळू शकतो. असा तेथील अनुभव आहे. या वेगवेगळ्या औद्योगिक सहकारी सोसायट्यांचा एक मोठा मध्यवर्ती सहकारी संघ आहे. तो संलग्न सहकारी सोसायट्यांना भांडवलाचा पुरवठा करतो अगर करवू शकतो. तसेच या सोसायट्यांनी उत्पन्न केलेल्या मालाची विक्री करतो अगर करवितो. या संघाचे नांव ‘ को. ऑफ. प्रॉडक्टिव्ह फेडरेशन ’ असे आहे.

सन १९३८ अखेर या फेडरेशनला जोडलेल्या ४२ सोसायट्या होत्या व त्यांचे बरोबर या फेडरेशनचे त्यासाठी जे व्यवहार झाले ते सुमारे चार कोटी रुपयांचे होते. या सालांत सर्व औद्योगिक सहकारी सोसायट्यांनी जो व्यवहार केला तो वरील व्यवहार सोडून सुमारे पाच कोटी रुपयांचा होता.

इंग्लंडमधील उत्पादक सहकारी सोसायट्या मुख्यतः कपडे, पादत्राणे, छपाई वगैरे व्यवसाय करतात. सन १९३२ साली या सोसायट्यांची सभासद संख्या १५८५४ होती व त्यांची एकूण जिंदगी सुमारे तीन कोटी रुपयांची होती. या सोसायट्यांत प्रत्यक्ष काम करणारे इसम ७४९७ होते व त्यांना त्या साली मजुरी सुमारे एक कोटी रुपयाचे वर मिळाली व त्यानी विकलेल्या मालाची किंमत सुमारे चार कोटी रुपयांची होती. त्यांना मिळालेल्या निव्वळ नफ्यातून त्यांनी पुढीलप्रमाणे वेगवेगळ्या बाबींवर खर्च केला —वेगवेगळे फंड ९० हजार रु.; मजुरांना बोनस ४॥ लाख रुपये; खरेदीदारांना बोनस ८ लक्ष रुपये; विद्यालयांना ग्रँट्स् ३० हजार रुपये; धर्मादाय २४ हजार रुपये.

**फ्रान्स**—या देशात उत्पादक सहकाराची पुष्कळ प्रगति झालेली आहे. सन १९२० साली त्या वेळचे मुंबई इलाख्याचे रजिस्ट्रार मि. ऑटो रॉथफील्ड यानी या देशाला भेट देऊन तेथील बऱ्याच उत्पादक सहकारी सोसायट्या पाहिल्या. सन १९१९ अखेर या देशात ७०० पेक्षा जास्त औद्योगिक सहकारी सोसायट्या होत्या. त्यांचे सभासद सुमारे ४० हजार व इतर जादा नोकर १५००० होते. सोसायट्यांनी केलेला व्यवहार १० कोटी फ्रँक्सचा होता. १९३८ साली या सोसायटीच्या संख्येत व सभासदामध्ये काही घट झाली. परंतु त्यांचा व्यवहार पुष्कळच वाढला होता. त्या साली ४७८ सोसायट्या असून त्यांचे सभासद ३२ हजार होते. व्यवहार मात्र सुमारे ६० कोटी फ्रँक्सचा झाला होता.

इंग्लंडपेक्षा या देशाची परिस्थिति वेगळी असल्याने तेथील कारागीर व मजूर यांनी आपल्या उत्पादक सोसायट्या पुष्कळच काढल्या. १८४८ सालच्या क्रांतीनंतर या देशात समाजवादी विचारसरणी सुरू झाली व प्रत्येकास काम मिळण्याचा हक्क आहे असे जनतेने आपले घोषवाक्य ठरवले. त्यामुळे सरकारकडून कारागिरांना व मजुरांना वेगवेगळ्या प्रकारची मदत मिळू लागली व त्यांच्या सोसायट्या स्थापन होऊ लागल्या. परंतु त्या सोसायट्यांचा कारभार योग्य प्रकारे सभासदांना चालविता न आल्याने त्या हळूहळू बंद होऊ लागल्या. पुन्हा सन १८७९ च्या सुमारास मि. गॉडिन यांनी पुढाकार घेऊन या सोसायट्यांचे पुनर्जीवन केले व पूर्वीचे अनुभव लक्षात घेऊन जास्त भक्कम पायावर या संस्था स्थापन केल्या व त्या वाढू लागल्या. विशेषतः छापखानेवाल्यांच्या जास्त पद्धतशीर अशा संस्था त्या वेळी निर्माण झाल्या व त्यांनी आपले काम योग्य प्रकारे चालू केले. त्यामुळे सरकारी वृत्तपत्र व इतर छपाईचे काम या संस्थांना सरकारकडून मिळू लागले. या संस्थांना पॅरिसमधील प्रमुख बँकेकडून जरूर तितके भांडवल मिळत असते.

**स्वीडन**—या देशात खऱ्या अर्थाच्या सहकारी संस्था नाहीत. तथापि गिऱ्हाइकांच्या घाऊक विक्री करणाऱ्या संस्थेने आपल्या सभासद सोसायट्यांना लागणाऱ्या वेगवेगळ्या वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी स्वतःचाच कारखानदारी विभाग चालविला आहे व त्यात ते जरूर त्या वस्तूचे उत्पादन करतात. विशेष लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे विजेच्या दिव्याचे बल्ब तयार करणारी 'ल्युमा' ही योजना त्यांनीच चालविली आहे व ती स्वीडनमध्येच नव्हे तर उत्तर युरोपात फारच प्रसिद्ध आहे.

**जर्मनी**—या देशातील औद्योगिक सहकारी संस्था संघटितपणे वेगवेगळ्या मालाचे उत्पादन करीत नाहीत तर या संस्था सभासदांना लागणारा कच्चा माल घाऊक पद्धतीने खरेदी करून तो त्या आपल्या सभासदांना पुरवितात. प्रत्येक सभासद आपापले उत्पादन विभक्तपणे करतो. येथील उत्पादक सोसायट्यांचे सभासद हे उत्पादक व व्यापारी असे दोघेही असतात. ते आपल्या सोसायट्या स्थापन करून आपणास लागणारा कच्चा माल सोसायटीकडून घेतात व आपापल्या मालाची विक्री सोसायटीकडून करवितात. सांघिकपणे मालाचे उत्पादन त्या करीत नाहीत. त्यामुळे त्या संपूर्णपणे उत्पादक सहकारी संस्था आहेत असे म्हणता येणार नाही. आपल्याकडील बऱ्याच औद्योगिक सहकारी संस्था जर्मनीतील संस्थांच्या पद्धतीप्रमाणेच कामे करतात असे दिसते.

**रशिया**:—हा देश साम्यवादी असल्याने तेथे लोकशाही समाजवादी

संस्था कितपत काम करू शकतील हा मोठा प्रश्न आहे. लेनिन याने या बाबतीत प्रयत्न केलेला होता व तेथे औद्योगिक सहकारी संस्था काढल्याही होत्या. मात्र त्या सस्थांनीं उत्पादन केलेला माल त्यांना किरकोळीने गिऱ्हाइकास विकता येत नसे. सन १९३१ साली अशा सोसायटयांचे सुमारे साडेसात कोटी सभासद होते व त्या संस्थांचा एक मोठा मध्यवर्ती संघही होता. तथापि सन १९३७ साली शहरात चाललेल्या या संस्थांचे काम सरकारने आपल्या ताब्यात घेतले. परंतु ग्रामीण विभागात चाललेले काम राहू दिले होते व त्या संस्था ग्रामीण विभागाच्या गरजा भागवीत होत्या. या संस्थांचे अलीकडील स्वरूप असे दिसते की, त्या उत्पादक-मालक यांचे संघ असून हे संघ आपले संघटित वर्कशॉप चालवितात. या देशात स्वतंत्रपणे उत्पादन करणाऱ्या एकूण दीड कोट लोकांपैकी सुमारे ३० लक्ष लोकांनी-विशेषत: शिंपी, ड्रायव्हर वगैरे कारागिरांनी चालविलेल्या या उत्पादक संस्था आहेत. त्या यांना देशातील "इन कॉटस" म्हणतात. त्यांची कामगिरी चीनमधील इंडस्कोपेक्षा अधिक कार्यक्षम असते असे दिसते.

इटाली—जगातील बहुतेक सर्व देशातील मजुरांपेक्षा इटालीतील मजुरांनी आपले सहकारी संघ स्थापून त्याचेकरवी आपली आर्थिक स्थिति सुधारली आहे असे दिसते. कंत्राटदारांनी (ठेकेदारांनी) पुरविलेल्या कच्च्या मालाच्या साधनांनी पुष्कळ कामे सहकारी पद्धतीवर व सांघिकपणे तेथील मजुरांच्या टोळया पुरी करतात व त्यायोगे ते मजूर आपल्या श्रमाचे पुरेपूर पैसे मिळवितात. हे मजूर संघ एंजिनिअर व इतर तज्ज्ञांची एक समिती नेमतात व ती समिती जे काम संघास पत्करावयाचे असेल त्याचे नकाशे व एस्टिमेट्स् यांची छाननी करते. संघाकडून काम करवून घेते व मजुरांना मजुरी वेळच्या वेळी देते. हे संघ आपल्या सर्वच सभासदांना सदोदित काम पुरवू शकतात असे नाही त्यामुळे काही सभासद काही मुदतीत बेकार राहातात. परंतु असे बेकार लोक इतरत्र हंगामी काम पत्करतात व संघास नवीन काम मिळताच त्या कामी या बेकार लोकांना घेण्यात येते व सर्व सभासदांना मजुरी मिळेल इतकी पुरेशी कामे संघास न मिळाल्यास सभासद आळीपाळीने बेकारीवर जातात. या संघाचे भाग लहान लहान रकमांचे मुद्दामच ठेवतात, त्यामुळे सामान्य मजुरासही ते सहज घेता येतात. निव्वळ नफ्यापैकी ५० टक्के रक्कम धोका व पेन्शन फंडात सामील करून बाकीची रक्कम मजूर सभासदांना त्यांना मिळालेल्या मजुरीच्या प्रमाणात वाटली जाते व थोडी रक्कम ठेवीदारानाहि त्यांना ठरलेल्या दरापेक्षा जास्त दराने व्याज देण्याचे कामी खर्च केली जाते. इटलीतील ब्रॉसीपॅंटी सोसायटीज या नावाने ओळखल्या जाणाऱ्या

संस्थांपैकी काही संस्था सुमारे ७५ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या आहेत. तथापि गेल्या ३०–३५ वर्षांपासून मजुरांच्या सहकार्याला या देशात विशेष महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. पूर्वीप्रमाणे सांघिकपणे मजुरी करणाऱ्या मजुरांच्या टोळ्या म्हणून त्या आता राहिल्या नसून सांघिकपद्धतीने कामाचे ठेके (कंत्राटे) घेणाऱ्या जबाबदार सहकारी संस्था हे स्थान आता प्राप्त झालेले आहे. सरकारकडून त्यांना प्राधान्य देण्यात येते व त्यांचा एकूण खर्च कमी पडत असल्याने त्यांनाच बहुतेक सार्वजनिक कामाचे ठेके (कंत्राटे) मिळतात. आता या संस्था इलेक्ट्रिक रेल्वे, बंदराची कामें; समुद्र हटविणें वगैरे मोठाली कामे पार पाडू शकतात. हे संघ दलादलीच्या जमिनीत सांघिक शेतीही करतात. सन १९३४ साली अशा शेती करणाऱ्या सोसायट्या सुमारे ४०० होत्या. त्याचे सभासद ४६ हजार होते व त्यांनी सुमारे तीन लक्ष एकर शेती केली होती. केवळ मजुरी करणाऱ्याच्या ९०० सोसायट्या होत्या. आता या संस्थांनी इटलीमध्ये आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले असून या सोसायट्यांकडून पडीत जमिनी वसाहतीखाली आणण्याचे काम फार मोठ्या प्रमाणात होत असल्याने राष्ट्रीय दृष्टीने या संस्थांची कामगिरी इटली देशात विशेष उपयोगी पडत आहे असे दिसत आहे. इटलीच्या या उदारणावरून हिंदुस्थानातील खेड्यामधून बेकार असणारांना पुष्कच शिकण्यासारखे आहे. कारण मजुरांच्या दृष्टीने इटलीचे हिंदुस्थानाशी पुष्कळ साम्य आहे.

## ६. जिल्हा औद्योगिक सहकारी संघ

**पूर्व इतिहास**—मुंबई इलाख्यातील हातमागाच्या धंद्याची वाढ करण्यासाठी हिंदुस्थान सरकारने मुंबई सरकारास सन १९३५ साली काही रकम दिली. हातमागाच्या कापडाची योग्य प्रकारे विक्री करण्यासाठी मुंबई सरकारने पुणे, अहमदनगर, अहमदाबाद, हुबळी व सिंद हैद्राबाद या पाच ठिकाणी त्यासाठी सहकारी सोसायटीचे कायद्याखाली नोंदलेले औद्योगिक सहकारी संघ स्थापन केले. या संघाचे सभासदत्व व्यक्तिशः विणकर, विणकरांच्या सहकारी सोसायट्या व सहानुभूती असणारे इसम अशांना खुले होते. हे संघ आपल्या सभासदांना आधुनिक अवजारे व कच्चा माल भाड्याने अगर विकत देत असत. तसेच सभासदांना नमुनेदार कापड विणण्याचे शिक्षण अगर सल्ला देत असत. कापड रंगविण्याचेही काम करीत

व विक्रीसाठी सभासदांकडून येणाऱ्या मालाची विक्री करून देत. किंवा त्यांचा माल खरेदीही करीत असत व मग तो माल आपला म्हणूनच विकत असत. या संघाचे उद्देश साध्य करण्यासाठी ते आपली ठिकठिकाणी दुकाने किंवा केंद्रे चालवीत असत. डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज व रजिस्ट्रार ऑफ् को-ऑप. सोसायटीज् या दोघांचे जॉइंट बोर्ड या संघावर देखरेख ठेवीत असे. हिंदुस्थान सरकारकडून मिळालेल्या आर्थिक मदतीतून या संघाचा चालू खर्च भागविण्यांत येते असे. पुढे या संघांची संख्या वेळोवेळी आणखी वाढविण्यात आली. त्यांचे कार्यक्षेत्रही काही तालुक्यापासून अनेक जिल्हे असे जरूरीप्रमाणे ठरविण्यात येत असे. अशा प्रकारे या संघाचे काम सुमारे दहाबारा वर्षे चालत होते.

पुढे लढाई संपल्यानंतर सुतावर नियंत्रण ठेवण्यात आलेल्या वेळी विणकऱ्यांना सूत पुरविण्याचे काम या संघांना सांगण्यात आले. सूतवाटपाचे काम या संघाकडे आल्यानंतर त्यांचा व्याप पुष्कळच वाढला व त्यांना लागणारे फार मोठे भांडवल मध्यवर्ती सहकारी बँकांकडून उभारता यावे म्हणून सरकारने काही प्रमाणात त्या कर्जाच्या रकमेची हमी सुद्धा पत्करली. अशा प्रकारे या संघाचे काम पुष्कळ वाढले. त्यानंतर या संघाची उपयुक्तता जो जो त्यांच्या सभासदांना पटू लागली तो तो त्यांनी नवीन नवीन प्रकारची कामगिरी करण्याचे पत्करावे अशी मागणी होऊ लागली व मग या संघांनी आपणास झेपेल त्या त्या मानाने वेगवेगळे उत्पादनाचे काम स्वतः करावे, संलग्न सोसायट्यांच्या वर देखरेख करावी, त्यांना मालाच्या स्वरूपात व इतरही प्रकारे भांडवल पुरवावे वगैरे कामे करण्याचे ठरविले. तसेच केवळ हातमागाचे कापड करण्याकडेच किंवा विणकरांच्या सोसायट्यांकडेच लक्ष पुरविण्या-ऐवजी आपापल्या कार्यक्षेत्रातील वेगवेगळ्या प्रकारच्या औद्योगिक सहकारी संस्था, कारागीर-मजूर वगैरेंच्या संस्था, तसेच वैयक्तिक कारागीर व उद्योगधंदे करणारे इसम यांनाही हरतऱ्हेची मदत करण्याची कामगिरी अलीकडे या संघांनी पत्करलेली आहे. या संघाचे हल्लीचे स्वरूप व त्यांची कामकाज करण्याची पद्धत पुढीलप्रमाणे असून त्यास अनुसरून त्यांनी आपापले पोट-नियम सुधारून घेतले आहेत.

**उद्देश :—** स्थानिक उद्योगधंदे व विशेषतः लहान व कुटीर उद्योगधंदे सुरू करणे व त्यांची वाढ करणे. सभासदांना सुधारलेली अवजारे व उपकरणे भाड्याने देणे, उधारीने देणे किंवा भाड्याने विकत घेण्याच्या करारावर देणे, सभासदांना किंवा सभासद सोसायट्यांच्या सभासदांना कच्च्या मालाच्या खरेदीबाबत व नमुन्यांच्या व मागणी असलेल्या धर्तीचा माल उत्पन्न करण्याबाबत माहिती

देणे, सल्ला देणे व मार्गदर्शन करणे; विणकरी, लोहारी, सुतारी वगैरे मालाच्या उत्पादनाच्या वेगवेगळ्या पद्धतींबाबत तज्ज्ञ म्हणून सल्ला व मार्गदर्शन देऊन स्थानिक उद्योगधंद्याचा पक्का माल सुधारलेला व आकर्षक असा निर्माण करणे, सभासद व बिनसभासद यांचा पक्का माल योग्य प्रकारे विकून देणे, सभासदांना पक्क्या मालाचे तारणावर अगर हुड्या किंवा रेल्वे रिसिट यांच्या तारणावर कर्ज देणे, संघाचे कामासाठी, चेक, हुंड्या वगैरे काढणे, वेची करणे, वगैरे कामे करणे. मागणी याद्या घेऊन मालाची खरेदीविक्री करणे, किंवा तावडतोब विक्री करण्यासाठी माल खरेदी करणे किंवा माल जोगड घेऊन त्याची विक्री करणे, लहान उद्योगधंदे व कुटीर उद्योगधंदे किंवा स्थानिक उद्योगधंदे यांच्या वाढीसाठी त्यांचा प्रचार करणे, तसेच त्यांच्या पक्क्या मालाची विक्री करण्यासाठी प्रचार करणे. सभासदांच्या मालाची विक्री होण्याच्या दृष्टीने प्रदर्शन भरविणे, सभासदांच्या मालाचा विमा उतरविणे, जिल्ह्यात हल्ली असलेल्या व पुढे होणाऱ्या उद्योगधंद्यांची आकडेवार माहिती मिळविणे व ती अद्ययावत ठेवणे, जिल्ह्यात औद्योगिक सोसायट्या काढणे, वाढविणे व त्यांवर देखरेख ठेवणे, इतर सर्व कामे करणे. जॉइंट रजिस्ट्रार यांच्या परवानगीने शाखा, दुकाने, केंद्रे काढणे व कामाची प्रदर्शने भरविण, इत्यादि उद्देश या संघाचे आहेत.

**सभासदत्व** :—कार्यक्षेत्रांत चालणारे अगर असणारे असे उद्योगधंदे करणारे इसम किंवा सहानुभूति असणाऱ्या व्यक्ती व कार्यक्षेत्रातील विणकर आणि इतर औद्योगिक संस्था यांना सभासद होता येते. व्यक्ती सभासदांची संख्या सुधारलेल्या पोटनियमांप्रमाणे जास्तीत जास्त ५० ते ७५ पर्यंतच मर्यादित असते. मात्र सोसायट्यांना ही मर्यादा घालीत नाहीत. या संस्थेची जबाबदारी मर्यादित स्वरूपाची असते.

**साधारण सभा** :—इतर सोसायट्यांच्याप्रमाणे साधारण सभा ही सर्वश्रेष्ठ अधिकारी मानण्यांत येते व ती वर्षाचे हिशेब पूर्ण झाल्यानंतर तीन महिन्यात केव्हा तरी भरविली जाते. वार्षिक व विशेष साधारण सभा भरून त्यांत इतर सोसायट्यांप्रमाणेच सर्व नेहमीची कामे केली जातात.

**कार्यकारी मंडळ** :—हे मंडळ कमीत कमी १४ व जास्तीत जास्त १८ सभासदांचे असते. त्याची घटना पुढीलप्रमाणे असते—

डिस्ट्रिक्ट को–ऑप. ऑफिसर ( अधिकारपरत्वे )

डिस्ट्रिक्ट ऑफिसर आय्. सी. ( ,, )

जॉइंट रजिस्ट्रार को. सो. यांचा एक प्रतिनिधी

मध्यवर्ती सहकारी बँकेचा एक प्रतिनिधी (कर्ज घेत असेल तर). प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रियल को. असोसिएशनचा एक प्रतिनिधी. उरलेले ९ ते १३ डायरेक्टर निवडलेले असतात. त्यांपैकी निदान दोन-तृतीयांश सहकारी सोसायट्यांनी निवडलेले असून बाकीचे वैयक्तिक सभासदांनी निवडलेले असतात. ह्या निवडलेल्या डायरेक्टर्सपैकी निम्मे दरसाल निवृत्त होतात व त्यांच्या जागा निवडणुकीने पुन्हा भरल्या जातात.

कार्यकारी मंडळास दैनंदिन सर्व कारभार पहावा लागतो व म्हणून या मंडळास त्याबाबतचे सर्व अधिकार इतर सोसायट्यांप्रमाणेच दिलेले असतात.

**मॅनेजर :**—यांची नेमणूक कार्यकारी मंडळ जॉइंट रजिस्ट्रार यांच्या पसंतीने करते. त्यांची कामे इतर सोसायट्यांच्या सेक्रेटरीप्रमाणेच सर्व-साधारणपणे असतात.

**नफ्याची वाटणी**—२५ टक्के रिझर्व फंड; द. सा. द. शे. ६। टक्के पर्यंत भागावरील नफा देण्यासाठी; जरूर तेवढी रक्कम एज्युकेशन फंड, नियंत्रित मालाच्या व्यवहारात होणाऱ्या नफ्यापैकी ८० टक्के स्पेशल डेव्हलपमेंट फंडात जमा होण्यासाठी, वरीलप्रमाणे रकमा बाजूस काढून ठेवल्यानंतर उरणाऱ्या बाकीपैकी, १० टक्के नोकरांना त्यांच्या पगाराचे प्रमाणात बोनससाठी, ५ टक्के मॅनेजर असि. मॅनेजर, यांना जादा बोनस, ६० टक्के सभासदांनी केलेल्या खरेदीविक्रीचे प्रमाणात त्यांना बोनस देण्यासाठी, १५ टक्के बुडीत कर्जफंड, १० टक्के सहकारी प्रचार व शिक्षण नियंत्रण. जॉइंट रजिस्ट्रार याचे नियंत्रण संघावर राहील व त्याचे हुकूम व सूचना संघाने अमलात आणल्या पाहिजेत.

**स्टाफ कमिटी**—सरकारने किंवा इतर संस्थेने जो नोकरवर्ग संघाच्या दिमतीस दिला असेल त्याच्यावर सर्वसाधारण नियंत्रण व हुकमत स्टाफ कमिटीची राहील. तसेच त्यांच्या डायऱ्या पाहाणे, त्यांची कामे ठरविणे वगैरे कामेही कमिटी करील. ही कमिटी पुढील पाच इसमांची असेल—

१ डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रियल असोसिएशनचा एक प्रतिनिधी.

२ प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल असोसिएशनचा एक प्रतिनिधी.

३ भांडवल पुरविणाऱ्या संस्थेचा एक प्रतिनिधी.

४ असिस्टंट डायरेक्टर ऑफ् कॉटेज इंडस्ट्रीज (अधिकारपरत्वे).

५ डिस्ट्रिक्ट ऑफिसर आय्. सी (अधिकारपरत्वे).

ही कमिटी आपला एक चेअरमन निवडील.

संलग्न सोसायट्यांचे सेक्रेटरी नेमणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे हे कामही ही कमिटी करील.

सरकारी मदत-- जमविलेल्या भाग-भांडवलाच्या रकमेइतकी रक्कम सरकार त्यांना भाग-भांडवल म्हणून देऊ शकते. त्यासाठी या संस्थेने पुढील अटी पाळाव्या लागतात--( १ ) संघ अ किंवा ब वर्गाचा असला पाहिजे. ( २ ) संघाच्या मालकीचे निधी म्हणजे भाग-भांडवल, राखीव निधी आणि इतर निधी मिळून एकूण दहा हजार रुपये असले पाहिजेत. ( ३ ) जिल्ह्यातील एकूण औद्योगिक सहकारी संस्थांपैकी निदान ७५ टक्के संस्था संघाच्या सभासद असल्या पाहिजेत. ( ४ ) संघाच्या मॅनेजरची नेमणूक डायरेक्टर ऑफ् कॉटेज इंडस्ट्रीज यांच्या मान्यतेने केलेली असली पाहिजे. ५५-५६ पासून रजिस्टर झालेल्या संस्थेच्या बाबतीत काही अटी थोड्या सैल करण्यात आलेल्या आहेत.

## प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रियल को. ऑप. असोसिएशन, मुंबई

यालाच राज्य औद्योगिक सहकारी संघ असे म्हणतात. सन १९४२ मध्ये उत्पादन सोसायट्यांच्या कामकाजात मदत करून त्यांना मार्गदर्शन करणारी संस्था म्हणून काम करण्यासाठी एक कमिटी नेमली. नंतर सन १९४६ साली बॉंबे प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑप असोसिएशन ही संस्था रजिस्टर करण्यात आली. औद्योगिक सोसायट्यांची ही शिखर संस्था समजण्यात येते.

उद्देश--महाराष्ट्र राज्यांत लहान प्रमाणावरील चाललेल्या उद्योगधंद्यांच्या सहकारी संस्था स्थापन करणें व त्यांची वाढ करणें हा या असोसिएशनचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी ही असोसिएशन पुढीलप्रमाणे कामे करील—

( १ ) असोसिएशनचे काम चालविण्यासाठी व सभासदांस भांडवल पुरविण्यासाठी पैसा उभारणें.

( २ ) सभासद सोसायट्यांना कच्चा माल पुरविता यावा म्हणून तो विकत घेणे व साठवून ठेवणें; तसेच मेंबर सोसायट्यांनी उत्पादन केलेल्या मालाची विक्री करणे, तो साचविणे व तो लोकांच्या दृष्टीस पडेल अशी तजवीज करणे.

( ३ ) सभासद सोसायटीची उत्पादनक्षमता व त्यांची व्यापार करण्याची क्षमता यांच्यात एकसूत्रता आणणे व अशा सोसायट्यांना मालाचा वाण व प्रतवारी करण्याच्या दृष्टीने सल्लामसलत देणे.

( ४ ) पक्क्या मालात रूपांतर केले जावे म्हणून कच्चा माल पुरविणे.

(५) कच्चा माल, हत्यारे, अवजारे, यंत्रे वगैरे तयार करणारांचा एजंट अगर प्रतिनिधी म्हणून काम करून या वस्तु सभासद सोसायट्यांना पुरविणें.

(६) सभासद सोसायट्यांना हत्यारे, अवजारे, यंत्रे वगैरे भाड्याने देणे किंवा विकत देणे.

(७) माल पुरविण्याचे ठेके घेणे व तो माल तयार करवून घेणे.

(८) असोसिएशनच्या किंवा सभासद सोसायट्यांच्या मालाची विक्री करण्यासाठी ठिकठिकाणी विक्री-केंद्रे काढणे, विक्रीचे प्रतिनिधी किंवा एजंट नेमणे. विक्रीची दुकाने वगैरे काढणे.

(९) विमा कंपन्यांचा एजंट किंवा प्रतिनिधी म्हणून काम करणे.

(१०) सभासद सोसायट्यांच्या कामास सोईचे पडावे म्हणून कारखाने व यंत्रे, उपकरणे वगैरे तयार करणारे वर्कशॉप काढणे, तसेच मालावर प्रक्रिया करणारी यंत्रे चालविणे.

(११) आपल्या देशात व परदेशात वापरल्या जाणाऱ्या यंत्रसामुग्रीची व माल उत्पादन करण्याच्या पद्धतीची माहिती मिळविणे व यंत्राची, मालाची व तो माल तयार करण्याच्या पद्धतीची सुधारणा होण्याच्या दृष्टीने संशोधन करणे.

(१२) लहान उद्योगधंदे फायदेशीर रीतीने चालतील अशा दृष्टीने संशोधन करणे व असे उद्योगधंदे स्थापन करणे. तसेच औद्योगिक सहकारी संस्था संस्थापणें व त्यांची वाढ करणे.

(१३) सभासद सोसायट्यांना फायद्याचे व्हावे म्हणून व्यापारविषयक माहिती देणारे केंद्र चालविणे.

(१४) औद्योगिक सहकाराची वाढ होण्याच्या दृष्टीने प्रचार करणे.

(१५) शहरांतून व खेड्यांतून औद्योगिक संस्था स्थापणे व त्या स्थापन करणाऱ्यांना जरूर ते शिक्षण देणे.

(१६) धंद्यासंबंधाचे व इतर शिक्षण कार्यकर्त्यांना देणे.

(१७) सभासद सोसायट्यांवर देखरेख ठेवणे व त्यांना मार्गदर्शन करणे.

(१८) असोसिएशनच्या धंद्यासाठी जमीन, इमारती, यंत्रे, वाहने विकत घेणे, भाड्याने घेणे किंवा भाडेपट्ट्याने घेणे.

(१९) वरील उद्देश साध्य होण्यासाठी इतर जरूर ती आनुषंगिक कामे करणे.

भाग—या संस्थेचे भाग भांडवल पंचवीस लाख रुपयांचे आहे. प्रत्येक भाग दहा रुपयांचा पूर्ण भरलेला असला पाहिजे. प्रत्येक सभासदाने कमीत कमी एक भाग धारण केलाच पाहिजे. मात्र सहानुभूती असणारे इसम व संस्था यांनी किमान दहा भाग धारण केले पाहिजेत.

सभासदत्व—पुढील संस्थांना व इसमांना असोसिएशनचे सभासदत्व खुले आहे—( १ ) औद्योगिक सहकारी सोसायटया किंवा त्यांचे संघ, ( २ ) न नोंदलेल्या परंतु असोसिएशनला पसंत पडेल अशा सहकारी तत्त्वावर उद्योग करणाऱ्या मजूर संस्थांचे सभासद असलेल्या व्यक्ती, ( ३ ) असोसिएशनचे कायम नोकर व किमान विशिष्ट तास काम करणारे पगारी किंवा बिनपगारी कार्यकर्ते, ( ४ ) असोसिएशनच्या उद्देशासंबंधी सहानुभूती दाखविणारे व असोसिएशनला आर्थिक मदत देणारे किंवा सेवा करणारे इसम, सहकारी संस्था किंवा इतर संस्था, ( ५ ) विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था.

या संस्थेची जबाबदारी मर्यादित असते.

साधारण सभा—इतर सहकारी संस्थांप्रमाणेच या असोसिएशनच्या वार्षिक व विशेष साधारण सभा भरविल्या जातात व त्या सभेत नेहमीची कामे होतात. या सभेला सर्वश्रेष्ठ अधिकार असतात.

बोर्ड ऑफ् मॅनेजमेंट—या बोर्डाचे कमीत कमी नऊ व जास्तीत जास्त १७ सभासद असतात. ते पुढीलप्रमाणे—औद्योगिक सहकारी संस्थांनी निवडलेले कमीत कमी तीन किंवा जास्तीत जास्त सात, नोकर व कार्यकर्ते यांनी निवडलेले तीन, औद्योगिक सहकारी संस्थांशिवाय बाकीच्या सोसायटयांनी व व्यक्तींनी निवडलेले कमीत कमी दोन, सरकारतर्फे दोन प्रतिनिधी.

दैनंदिन सर्व कामे करण्याचा अधिकार या बोर्डास असतो. बोर्डास आपल्या पोट-समित्या नेमता येतात. व त्यांच्याकडे वेगवेगळी कामे सोपविता येतात.

सेक्रेटरी—याची नेमणूक साधारण सभा करते. त्याची कामे व जबाबदाऱ्या इतर प्रकारच्या सोसायटयांच्या सेक्रेटरीप्रमाणेच असतात. काम करणारा तो सर्वश्रेष्ठ अधिकारी असल्यामुळे त्यास जरूर ते अधिकार देण्यात आलेले आहेत.

नफा-वाटणी—निव्वळ नफ्याच्या २५ टक्के रिझर्व्ह फंड व सा. द. शे ५ टक्क्यांपेक्षा जास्त नाही एवढे भागांवरील डिव्हिडंड, बुडीत कर्ज फंडासाठी जरूर तेवढी रक्कम, शिक्षणफंडासाठी कायद्याप्रमाणे द्यावी लागणारी रक्कम.

12603

राहिलेल्या शिलकेपैकी शेकडा ४० टक्क्यापेक्षां कमी नाही एवढी रक्कम औद्योगिक सहकारी सोसायट्यांना रिबेट म्हणून वाटण्यात येते. यानंतर जर काही रक्कम राहिली तर ती पुढीलपैकी काही अगर सर्व कामांसाठी बाजूला काढून ठेवण्यांत येते—(१) डेव्हलपमेंट फंड (२) नोकरांना बोनस (३) कॉमन गुड फंड (४) डिव्हिडंड इक्विलायझेशन फंड (५) असोसिएशनच्या व्यवहारासाठी लागणारा इतर कोणताही फंड (६) न वाटलेला नफा पुढे ओढण्यासाठी.

**देखरेख**——सभासद औद्योगिक सहकारी संस्थांनी आपल्या कामकाजाची तपासणी करण्यास असोसिएशनच्या अंमलदारांना परवानगी दिली पाहिजे.

◆◆◆

## ७. खरेदी-विक्रीसंबंधी काही विचार

कोणत्याही वस्तूचा खप पुढील दोन बाबींवरून कमीजास्त होत असतो—( १ ) वस्तु मिळविण्याबद्दल गिऱ्हाइकास असणाऱ्या आवश्यकतेची तीव्रता व ( २ ) वस्तूसाठी गिऱ्हाइकास पडणारी प्रत्यक्ष किंमत.

( अ ) वस्तु मिळविण्याच्या गरजेची तीव्रता जास्त असल्यास वस्तूसाठी पडणाऱ्या किंमतीचा विचार त्या वेळी गिऱ्हाइक करू शकत नाही. उदा०—तात्काळ लागणारी औषधे. या औषधाना कितीही भरमसाट किंमत दुकानदाराने मागितली तरी त्या वेळी जगणे किंवा मरणे याचा झगडा चालू असल्याने गिऱ्हाईक आपल्या पराकाष्ठेइतकी जास्त किंमत देण्यास तयार असते. त्या वेळी पडलेली किंमत ही त्या वस्तूच्या खऱ्या किमतीच्या अनेकपट जास्त असते. गरजेची तीव्रता कमी असल्यास कमी किंमत पडेल तरच ती वस्तु घेण्यास गिऱ्हाइक तयार होते. त्यावरून अशा प्रसंगी वस्तूबद्दलच्या गरजेच्या तीव्रतेनुसार त्या वस्तूची त्या वेळची किंमत ठरत असते. परंतु सदर वस्तूची मागणी समाजातही स्थिर असल्यास त्या वस्तूचे उत्पादन जास्त जास्त होऊन चढाओढीचे तत्त्वानुसार काही काळाने त्या वस्तूची किंमत आपोआपच खाली येते. यावरून अशी भरमसाट येणारी किंमत ही तीव्रतेच्या अस्थिरतेवर अवलंबून राहाणार हे उघड आहे. मात्र अशा विशिष्ट प्रसंगी विकल्या जाणाऱ्या विशिष्ट वस्तु संख्येने फारच कमी असल्याने ही फाजील मिळणारी किंमत उत्पादकाचे पदरी पडतेच असे दिसत नाही. मध्यस्थ अगर दलाल यांनाच त्याचा फायदा मिळतो. सबब उत्पादकाच्या दृष्टीने या फाजील किंमतीसंबंधीच्या बाबींचा जास्त विचार करण्याची आवश्यकता नाही.

(आ) गिऱ्हाइकाची गरज स्थिर असताना जी किंमत त्याला त्या वस्तूसाठी सामान्यतः द्यावी लागते त्यापेक्षा कमी किंमतीस ती वस्तु बाजारात मिळू शकली, तर तात्कालिक गरज नसताही गिऱ्हाइकास ती वस्तु घेण्याचा मोह उत्पन्न होतो व तो ती वस्तु घेतो असे आपल्या दृष्टीस पडते. यावरून वस्तूची किंमत उतरल्यास तिचा खप वाढतो असे दिसते. उत्पादकास आपल्या उत्पादित वस्तूची शक्य तितक्या लवकर विक्री व्हावी असे वाटत असेल तर त्या वस्तूची किंमत त्यास जितकी कमी ठेवता येईल तितकी त्याने ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे हे उघड आहे व त्या दृष्टीने या बाबींचा आपणास आता जास्त विचार करावयाचा आहे. अर्थशास्त्राच्या दृष्टीने कोणत्याही वस्तूचे उत्पादन होत आहे असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा उत्पादन होणाऱ्या वस्तु तिचा उपभोग घेणारे गिऱ्हाइक वाजवी ती किंमत देऊन ती वस्तू घेऊन जाते व तिचा उपभोग घेते. ज्या मानाने वस्तूचा खप होतो त्या मानानेच त्याचे उत्पादन करणे हे श्रेयस्कर ठरते. नाहीतर मागणी व पुरवठ्याच्या तत्त्वानुसार वस्तूच्या किंमती खाली येण्याचा संभव असतो. सबब उत्पादन वाढवून आपली सांपत्तिक स्थिति सुधारावी असे कारागिरांना वाटत असेल तर त्यांनी ज्या प्रमाणात आपले उत्पादन वाढविण्याचे ठरविले असेल त्या प्रमाणात त्या मालाची वाढत्या प्रमाणात विक्री होईल हेही त्यास पाहाणे भाग पडते. ही मागणी वाढती राहावी म्हणून गिऱ्हाइकास सहजी परवडेल एवढीच किंमत त्या वस्तूची राहील हेही उत्पादकास पहावे लागते

कोणत्याही वस्तूची किंमत म्हणजे उपभोगत्याने त्यासाठी दिलेली बाजारातील किंमत ही होय. परंतु उत्पादकाच्या दृष्टीने मात्र त्या वस्तूची विक्री करण्याचे कामी झालेला वेगवेगळा खर्च व वेगवेगळ्या दलाल वगैरे लोकांनी त्या कामी केलेल्या सेवेची वाजवी ती किंमत व त्यांनी आपल्या नफ्याची काढून घेतलेली जादा रक्कम ही सर्व वजा जाता जी ऐन रक्कम उत्पादकाच्या हाती पडते तीच उत्पादकाची किंमत होय. कोणत्याही वस्तूची वाजवी किंमत ठरविताना पुढील बाबींचा विचार करावा लागला तो—(१) कच्च्या मालास पडणारी किंमत. (२) कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या श्रमाची किंमत. (३) वापराव्या लागणाऱ्या इमारती, यंत्रे वगैरेंची झीज. (४) इमारतीचे भाडे. (५) गुंतवाव्या लागणाऱ्या भांडवलावरील व्याज. (६) कारागिरास (मालकास) त्याच्या श्रमाबद्दल सामान्यपणे द्यावी लागणारी किंमत. (७) सरकारी कर वगैरे. (८) मार्केटिंग कॉस्ट (विक्री करण्याचे कामी होणारा खर्च).

मार्केटिंग कॉस्टमध्ये खालील बाबींवर होणाऱ्या खर्चाचा समावेश

झालेला असतो—( १ ) मूळ जागेवर माल हाताळण्याचा होणारा खर्च, ( २ ) माल एकत्र करण्याचा खर्च, ( ३ ) वाहतुकीचा खर्च ( ४ ) घाऊक खरेदीदाराचा माल हाताळण्याचा होणारा खर्च, ( ५ ) गिऱ्हाइकाना किरकोळीने विक्री करण्याचे कामी येणारा खर्च, ( ६ ) दलालाची वाजवी दलाली व त्याचा नफा, ( ७ ) उत्पादकाचा वाजवी नफा.

वरील बाबीपैकी काही बाबींवरील खर्च कमी करण्याच्या किंवा होण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाला पाहिजे. परंतु तो प्रयत्न एकएकट्या उत्पादकाने करण्याऐवजी त्यांनी संघटितपणे केल्यास त्यास बरेच यश येण्याची शक्यता असते. त्यासाठी उत्पादकाच्या सहकारी संस्था काढणे श्रेयस्कर व जरुरीचे असते.

वरील वेगवेगळ्या बाबींचा विचार सहकारी संस्थेच्या दृष्टीने केल्यास असे आढळून येईल की, व्यक्तीच्या ऐवजी सहकारी संस्थेची किंवा संस्थांची वेगवेगळ्या कामी मदत घेतल्यास ठिकठिकाणी बचत करता येणे शक्य आहे व त्या त्या प्रमाणात वस्तूंची किंमत ( गिऱ्हाइकास द्यावी लागते ती ) थोडी थोडी कमी करता येणे शक्य आहे, व जो जो किंमत कमी होईल तो तो त्या वस्तूंची विक्री हळू हळू वाढत जाईल. आता आपण वेगवेगळ्या बाबींचा विचार सहकारी संस्थेच्या दृष्टीने करू या.

१. कच्च्या मालाची व यंत्रे–अवजारांची घाऊक खरेदी करणें—प्रत्येक कारागिराने त्यास लागणारा कच्चा माल व त्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करण्यासाठी वापरावी लागणारी यंत्रे, अवजारे वगैरे वेगवेगळी व प्रथक्‌पणे खरेदी केली तर त्यासाठी त्याला जी किंमत द्यावी लागेल त्यापेक्षा तोच उद्योगधंदा करणारे आणखी काही कारागीर एकत्र येऊन त्यांनी आपली संघटना केल्यास तिच्यामार्फत त्या सर्वांना लागणारा कच्चा माल एकदम खरेदी करता येईल व त्याची किंमत कमी पडेल. कारण तो माल घाऊक दराने त्या प्रमाणात खरेदी करणे शक्य होईल. तसेच हा सर्व माल हंगामात खरेदी केल्यास तो त्याहीपेक्षा स्वस्त दराने मिळू शकेल. यावरून सहकारी संस्थांच्या द्वारे हा व्यवहार झाल्यास कच्चा माल स्वस्त दराने प्रत्येक कारागिरास उपलब्ध होऊ शकेल हे उघड आहे. यंत्राचे व अवजाराचे बाबतीतहि अशीच व्यवस्था करता येणे शक्य आहे. शिवाय एकाच यंत्राचा किंवा काही अवजाराचा एकापेक्षा जास्त कारागिराना उपयोग करून घेता येणेहि शक्य आहे. तसे झाले तर यंत्रे व अवजारे यांच्यावर कराव्या लागणाऱ्या एकूण भांडवली खर्चातहि बचत करता येणे शक्य आहे. भांडवली खर्चच कमी झाला म्हणजे मग त्यावर द्याव्या लागणाऱ्या व्याजातही सहजी बचत होऊ शकेल. अशा दृष्टीने या वेगवेगळ्या बाबींवर होणाऱ्या खर्चांत सहकार्याच्या जोरावर पुष्कळच बचत करता येणे शक्य आहे.

**मालाची प्रतवारी लावणे**—मालाची विक्री कसोशीने व्हावयास पाहिजे असेल तर तो माल ठराविक दर्जाचा निर्माण झाला पाहिजे व मग त्याची प्रतवारीहि लावली पाहिजे. तसे झाले म्हणजे मालास जास्त किंमत येते असा अनुभव आहे. परंतु हे होण्यासाठी माल फार मोठ्या प्रमाणात एकत्र आणावा लागतो म्हणजे मग त्याच्या वेगवेगळ्या प्रती पाडता येतात. यासाठी वेगवेगळ्या कारागिरांनी उत्पन्न केलेला माल एका मध्यवर्ती ठिकाणी आणला पाहिजे व तेथे त्याची प्रतवारी केली पाहिजे आणि तेथूनच त्याची विक्री केली गेली पाहिजे. तशी व्यवस्था झाली नाही तर प्रत्येक कारागिरास आपापला माल स्वतंत्रपणे तुटक तुटक विकावा लागतो व त्या पद्धतीच्या विक्रीत चांगला माल हलक्या प्रतीच्या मालाच्या किंमतीत घाऊक व्यापारी विकत घेत असतो. सबब हे नुकसान टाळण्यास एकच उपाय आहे आणि तो म्हणजे कारागिरांची संघटना करणे होय.

मालाच्या विक्रीची किंमत योग्य मिळावी यासाठी पुष्कळ माल एकत्रित करणे जरूर असते. कारागिराचा माल एकत्रित केल्यास त्या सर्वांनाच जी किंमत मिळू शकते ती त्यांनी वेगवेगळी विक्री केल्यास त्यांना मिळत नाही. यावरून विक्रीची किंमत ही काही अंशी मालाच्या एक गट जमलेल्या आकार-मानावरून ठरत असते असे दिसते व ते बरोबरही आहे. कारण घाऊक व्यापाऱ्यास लांबवर पसरलेला माल आपल्या दुकानी नेण्यासाठी जो खर्च येतो त्यापेक्षा पुष्कळ माल एकाच केंद्रावर जमलेला असल्यास तो त्या व्यापाऱ्याला आपल्या दुकानात कमी खर्चात नेता येतो व म्हणून तो व्यापारी केंद्रावर एक गट जमलेल्या मालास थोडी जास्त किंमत देण्यास तयार असतो. शिवाय वेगवेगळ्या प्रतींचा माल एकाच ठिकाणी जमलेला असल्याने त्याला पाहिजे असेल त्या प्रतीचा माल तेथे सहजी पसंत करता येतो व त्यासाठी सुद्धा तो थोडी जास्त किंमत देऊ शकतो.

( ३ ) **मालाचा वाण, रंग वगैरे सुधारणे**—लोकांच्या आवडीप्रमाणे माल उत्पन्न झाल्यास त्याची विक्री तात्काळ होत असते. सबब उत्पादकाने लोकांच्या आवडीनिवडीकडे विशेष लक्ष देऊन ही आवड जसजशी बदलत जाईल तसतसा त्याने आपल्या मालाचा वाण, रंग, पोत दिखाऊपणा वगैरे बदलला पाहिजे. तसे केले नाही तर त्याच्या मालाची विक्री त्या किंमतीस होणार नाही व उत्पादकास नुकसान सोसावे लागेल. लोकांच्या या वरचेवर बदलणाऱ्या आवडीनिवडी प्रत्येक कारागिरास तात्काळ समजणे बरेच अवघड असते. या आवडी प्रथम दुकानदाराला कळून येतात व दुकानदार मालाची खरेदी करताना ही बाब लक्षात ठेवीत असतो. कारागिरांनी आपली संघटना निर्माण करून

तिचे मार्फतीने मालाची विक्री केली किंवा विक्रीची दुकाने काढली तर त्या दुकानामार्फत लोकांची आवड संघटनेस लवकर कळू शकेल व ही संघटना आपल्या कारागीर सभासदांना लोकांच्या नवीन आवडीचा माल तयार करण्याबद्दल सल्ला देऊन मार्गदर्शन करील. सबब मालाची विक्री योग्य किंमतीस होण्याच्या दृष्टीने तसेच मालाचे उत्पादन लोकांच्या पसंतीप्रमाणे होण्याच्या दृष्टीने कारागिरांच्या अशा संघटनेची फार जरूरी आहे.

(४) उत्पादनाची विक्री स्थानिक बाजारात करणे :-- उत्पादनाच्या गावी अगर आसपास विक्रीची व्यवस्था करणे हे एक मार्केटिंगचे तंत्र आहे. उत्पादनाची विक्री आसपासच्या खेडयापाडयात करता आल्यास ती उत्पादक व गिऱ्हाईक या दोघांच्याही आर्थिक दृष्टीने सोईची आहे. अशा प्रकारच्या विक्रीच्या कामी दलालाची जरूरी नसल्याने दलालीवर उत्पादकास जो खर्च करावा लागला असता तो वाचतो. म्हणून त्याला आपल्या मालाचे थोडे जास्त पैसे हाती पडतात. गिऱ्हाइकाच्या दृष्टीनेही त्याला वस्तु स्वस्त दरात मिळू शकते. परंतु अशा प्रकारे आसपास विक्री करण्याच्या कामी त्याचा जो वेळ मोडतो तो त्याने उत्पादनाच्या कामी वापरला तर त्याचे उत्पादन त्या मानाने वाढते व त्या वेळेची मजुरी त्यास मिळू शकते. ही अडचण दूर करण्यासाठीही आसपासच्या त्या त्या प्रकारच्या कारागिरांनी आपली सहकारी संस्था काढून तिचे मार्फत हे काम करून घेतल्यास ते सर्वच कारागिरांना सोईचे व फायद्याचे ठरेल.

(५) मालाची दूरवर विक्री करणे -- उत्पादन होणारा सर्वच्या सर्व माल आसपासच्या खेडयात विकला जातो असे सहसा होत नाही. शिवाय अशा प्रकारची स्थानिक विक्री करण्याचे कामी काय काय अडचणी येत असतात ते वर दिलेच आहे. यासाठी उत्पादन होणारा माल बाहेरील शहरात विकणे जरूरीचे आहे. ही विक्री कारागीर सामान्यतः दलालामार्फत करीत असतात. परंतु दलालामार्फत केलेल्या विक्रीमुळे उत्पादकाला कमी पैसे हाती येतात असा अनुभव आहे. याचे कारण विक्रीच्या पैशातून दलाल आपली दलाली व आपला नफा कापून घेऊन राहिलेले पैसे उत्पादकास देत असतो. शिवाय दलाल हा उत्पादकाचा गुमास्ता म्हणून वरवर दिसत असला तरी त्याचा आणि घाऊक व्यापाऱ्याचा नेहमी जास्त घनिष्ठ संबंध येत असल्यामुळे तो उत्पादकाच्या हिताऐवजी घाऊक व्यापाऱ्याचेच हित अधिक प्रमाणात पाहातो व ते स्वाभाविकही आहे. या सर्व परिस्थितीमुळे खाजगी दलालामार्फत विक्री करण आर्थिक दृष्टीने उत्पादकाच्या अनहिताचे ठरते.

बाहेरगावी मालाची विक्री उत्पादकाला स्वतः करणें शक्य नसते व त्यासाठी त्याला दलालाची मदत घेणे भाग पडते. ही अडचण दूर करण्यासाठी एक उपाय उत्पादकाला योजता येणे शक्य आहे. तो हा की, दलाल ही व्यक्ती असण्याऐवजी दलालीचे काम सहकारी संस्थेने करावे व त्या संस्थेचा कारागीर हा सभासद असावा. असे झाल्यास त्या सहकारी संस्थेस जो नफा होईल त्यापैकी रिझर्व फंड वगैरे वजा जाता राहणारी रक्कम शक्य तितकी जास्त सभासदांत वाटली जाते. सबब कारागिराकडून संस्थेने घेतलेल्या दलालीपैकी काही भाग तरी कारागिरास परत मिळण्याची पुष्कळ शक्यता असते. शिवाय, वैयक्तिक दलाल दलालीखेरीज आपला नफा विक्रीतून काढण्याचा प्रयत्न करीत असतो. तसा नफा सहकारी संस्था दलाल काढणार नाही. सबब दलालीचे हें काम सहकारी संस्थेकडून करवून घेतल्यास कारागिराचे दृष्टीने ते फायद्याचे ठरेल. अशी कामे जिल्हा औद्योगिक सहकारी असोसिएशन व प्रॉव्हिन्शिअल औद्योगिक सहकारी असोसिएशन हे करीत असतात. सबब या संस्थांच्या मार्फतीने कारागिरांनी किंवा त्यांच्या सहकारी संस्थांनी आपल्या मालाची विक्री केल्यास ते त्यांच्या फायद्याचे ठरते असा अनुभव आहे. या दोन संस्थांशिवाय काही माल गिऱ्हाइकाच्या संस्थांच्या मार्फतीनें परस्पर विकता येणे शक्य आहे. तसें करता आल्यास ते विशेष सोईचे होईल. कारण त्यामुळे उत्पादक व ग्राहक यांचे जवळचे संबंध येऊन मधले दलाल अजिबात टाळता येतील. या योजनेमुळे उत्पादकास जास्त किंमत मिळू शकेल व गिऱ्हाइकासही स्वस्त भावाने ती वस्तू मिळू शकेल. उत्पादक व ग्राहक यांचे सहकार्य झाल्यास ते राष्ट्रीय दृष्टीने सुद्धा हिताचे ठरत असते.

( ६ ) आधुनिक धंद्याची पद्धत—अलीकडे उद्योगधंद्यांचे विशिष्टिकरण फार मोठ्या प्रमाणात झालेले असल्याने व विविध प्रकारच्या मालाचे उत्पादनही पुष्कळच वाढले असल्याने मालाच्या विक्रीची व्यवस्थासुद्धा नवीन पद्धतीने केली जात आहे. प्रत्येक प्रकारच्या वेगवेगळ्या वस्तूंच्या बाजारपेठाही स्वतंत्र निर्माण होऊं लागल्या आहेत. अशा पेठांत उत्पादकांचे प्रतिनिधी व गिऱ्हाइकांचे प्रतिनिधि एके ठिकाणी जमू शकतात व तेथे त्यांना बाजारभावाची व मालाची माहिती मिळू शकते. उत्पादन केलेला सर्वच्या सर्व माल उतारपेठेत व विक्रीसाठी एकदम आणणें शक्य नाही इतक्या मोठ्या प्रमाणात तो उत्पन्न होत असल्याने व मालाचे वेगवेगळे प्रकार, प्रती, वाण, रंग, पोत वगैरे असल्याने विक्री मालाचे प्रत्यक्ष नमुने पाहून किंवा मालाची माहिती व वर्णन ऐकून किंवा मालाच्या प्रतीनुसार किंवा मालाच्या प्रमाणानुसार होत असते. मात्र ही विक्री माल उत्पादन करणारा कारागीर व त्या मालाचा उपभोग घेणारे

गिऱ्हाईक यांचे दरम्यान होत नाही. कारण त्यांची एकमेकांची भेट झालेली नसते अगर होणे शक्यही नसते. यासाठी या दोघांनाही मध्यस्थ दलालाची मदत घेणे भाग पडते. या दलालाची ही एक साखळी निर्माण होत असते. उत्पादकाकडून माल घाऊक व्यापाऱ्याकडे जातो व तेथून तो पुन्हा लहान व्यापारी व किरकोळ दुकानदार यांचेमार्फत उपभोग घेणाऱ्याचे हाती पडतो. या मध्यस्थाच्या मदतीशिवाय मालाची विक्री करणे शक्य होत नाही. सबब दलाल हे आवश्यक आहेत. फक्त ते वैयक्तिक असण्याऐवजी त्यांची कामे सहकारी संस्थांना मध्यस्थ या नात्याने करता येतील, व तसा प्रयत्न झाला पाहिजे.

विक्री करण्याच्या कामी अलीकडे काही काही वस्तूंचे वायदे बाजार निर्माण झाले आहेत. वायदे बाजार म्हणजे सट्टा अगर जुगार नव्हे. या बाजारामुळे पुढे उत्पन्न होणाऱ्या वस्तूंच्या किंमती आताच ठरत असल्याने वस्तूंच्या किंमती शक्य तितक्या स्थिर राहू शकतात. निदान त्यांच्या किंमतीत एकदम व अनपेक्षित असे चढउतार विशेष प्रमाणाबाहेर होऊ शकत नाहीत व त्यामुळे उत्पादकाला आपण किती माल उत्पन्न करावा याचा अंदाज बांधता येतो.

अलीकडे बाजाराचे केंद्रीकरण होण्याकडे विशेष प्रवृत्ती आहे. उदा० :— राष्ट्रीय केंद्रे, आंतरराष्ट्रीय केंद्रे वगैरे. या योजनेमुळे धंदा करणारांना आपले एकसूत्री धोरण ठरविता येते. तसेच त्यामुळे धंद्यावर व मालाच्या किंमतीवर नियंत्रण ठेवता येते. मालाच्या तारणावर भांडवल उभारता येते व त्यामुळे खरेदीदार व विक्रेता या दोघांच्याही हिताचे संरक्षण करता येते.

आधुनिक बाजारव्यवस्थेत माहितीपत्रके, प्रसिद्धीपत्रके, अहवाल वेळोवेळी प्रसिद्ध करून व तज्ज्ञांच्या अनुभवाची मदत मिळवून बाजाराची परिस्थिति उत्पादक व गिऱ्हाईक यांच्यासमोर मांडता येते.

अशा पद्धतीने व धोरणाने विक्रीची जी अलीकडील व्यवस्था अमलात आलेली आहे, ती उभयता उत्पादक व गिऱ्हाईक या दोघांनाही सोईची व फायद्याची असून त्यात दोघांच्याही हिताचे त्यामुळे संरक्षण होते.

( ७ ) **वजन-मापे सर्वत्र एकसारखीच वापरणे**—मालाची योग्य प्रकारे विक्री होण्याच्या दृष्टीने आणखी एक अडचण आपल्या देशात फार मोठ्या प्रमाणात जाणवते. ती म्हणजे आपणाकडे वापरण्यात येणारी निरनिराळ्या प्रकारची वजने-मापे होत. भारतात वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळी वजने व मापे प्रचलीत आहेत. त्यामुळे उत्पादक व गिऱ्हाईक यांना किंमती सांगताना व देताना गैरसमज निर्माण होतो व विक्री करण्याचे कामी अडचण

निर्माण होते. मात्र यामुळे मध्यस्थ दलालास याचा फायदा चांगला घेता येतो. यासाठी सर्व देशात एकाच प्रकारची वजने व मापे वापरणे आवश्यक झाले आहे. वस्तु वजनाने विकाव्या किंवा मापाने विकाव्या अथवा संख्येने विकाव्यात यासाठी कायद्याने तरतूद व्हावयास पाहिजे व त्या दृष्टीने आता पावले पडण्यास सुरवात झाली आहे. सन १९५४ साली सर्व भारतासाठी मेट्रिक सिस्टिम प्रचारात आणण्याकरिता एक कमिटी नेमली होती व त्या कमिटीच्या शिफारशीनुसार लवकरच मेट्रिक सिस्टिम प्रचारात येईल. तसे झाले म्हणजे परदेशी व्यापार सुद्धा सुलभ होण्यास मदत होईल. यामुळे उत्पादक व गिऱ्हाईक या दोघांनाही फायदा होईल व विक्री करण्याचे कामी गैरसमज होणार नाही किंवा घोटाळे होणार नाहीत.

( ८ ) **वाहतुकीसंबंधाचे काही विचार**—कोणत्याही वस्तूची गिऱ्हाइकास पडणारी किंमत वाढण्याचे आणखी एक कारण म्हणजे त्या वस्तूच्या वाहतुकीचे कामी होणारा जास्त खर्च हे होय. पुष्कळशा वस्तूंची विक्री त्या दूरवर पाठवून करावी लागते व त्यासाठी त्याची वाहतूक करणे भाग पडते. सबब वाहतुकीचा खर्च करणे भागच आहे. तथापि तो जितका कमी पडेल त्या मानाने गिऱ्हाइकास ती वस्तु स्वस्त पडेल. वाहतुक ही कार्यक्षम असली पाहिजे व ती कमी खर्चात होण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

वाहतुकीची कार्यक्षमता ही वाहनाचा वेग व सुरक्षितता, माल नेताना, तो वाहनात भरताना व वाहनाच्या दरात मिळणाऱ्या सवलती यावरून ठरत असते.

वाहनाचा विचार करताना ते वाहन ज्या मार्गाने जाणार आहे तो मार्ग म्हणजे जमीन, पाणी किंवा हवा व वाहनास गती देण्यासाठी वापरलेली शक्ती या बाबी लक्षात घ्याव्या लागतात. वाहतुकीचा खर्च हा मालाच्या आकारावरून, तो ज्या वाहनातून नेला जातो ते वाहन, आणि ते वाहन ज्या मार्गाने जाणार तो मार्ग यावर अवलंबून असतो. यापैकी हवेचा मार्ग फारच खर्चाचा असल्यामुळे सर्वसामान्य माल या मार्गाने केवळ अपवादात्मक परिस्थितीतच पाठविला जातो. मालाची वाहतूक बहुतेक जलमार्गाने किंवा खुष्कीच्या मार्गाने केली जाते. आंतराष्ट्रीय वाहतूक जलमार्गाने सामान्यतः होते तर देशातील वाहतूक खुष्कीच्या मार्गाने विशेषकरून होते.

खुष्कीचे मार्ग म्हणजे पाऊलवाटा, कच्चे रस्ते, पक्के रस्ते व रेल्वे रस्ते हे होत.

**जमिनीवरून चालणारी वाहने म्हणजे माणसे, जनावरे, बैलगाड्या, मोटारी व रेल्वे.**

वाहतुकीस पुढीलप्रमाणे सामान्यतः खर्च येतो—पाऊलवाटेने माणसाच्या डोक्यावर अगर पाठीवर ओझी घेऊन माल नेण्यास दर मणी दर मैली एक आणा खर्च येतो, तोच जनावराच्या पाठीवरून नेल्यास अर्धा आणा ते पाऊण आणा खर्च येतो. कच्च्या रस्त्यावरून बैलगाडीतून माल नेण्यास हा खर्च दर मैली एक ते दोन पैसे येतो. पक्क्या रस्त्यावरून हा माल बैलगाड्यांतून किंवा मोटारीने नेल्यास दोन ते तीन पै खर्च येतो. बैलगाडीपेक्षा मोटारीने माल नेल्यास कमी खर्च येतो. रेल्वेने माल नेल्यास याहीपेक्षा कमी खर्च येतो. हा खर्च दर मैली दरमणी दोन पै ते एकदशांश पै एवढाच येतो. मात्र माल फार मोठ्या प्रमाणार पाठवावा लागतो. या दरास 'क्लास रेट' म्हणतात. विशेष मालासाठी व विशेष मार्गावर 'शिड्यूल रेट' या दराने वाहतुकीचा खर्च रेल्वे आकारते. तो दर 'क्लास रेट' पेक्षा कमी असतो, तर एका ठराविक स्टेशनापासून दुसऱ्या ठराविक स्टेशनापर्यंत विशेष सवलतीचा दर चढाओढीच्या तत्त्वावर रेल्वे आकारीत असते. विशेषतः एका बंदराचे गांवापासून दुसऱ्या बंदराचे गांवासाठी हा विशेष दर ठेवलेला असतो. उदा०—मुंबई ते कलकत्ता या दोन शहरात मालाची ने आण दर मणी फक्त एक रुपयात रेल्वे करते. वास्तविक अंतराच्या मानाने हा दर चार रुपये असावयास पाहिजे. मुंबई ते नागपूर हे अंतर निम्मे असतानाहि त्या दोन स्टेशनमधील वाहतुकीचा दर प्रत्येक मणास दोन रुपये आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

वर दिलेले विशेष सवलतीचे दर म्हणजे दरमणी एक दशांश पै किंवा त्याहीपेक्षा कमी हे एक वॅगनभर माल असेल तरच मिळतात. माल कमी वजनाचा असल्यास व त्यासाठी वॅगन वापरणे परवडणारे नसल्यास रेल्वे-वाहतुकीस दरमणी दर मैली दोन पै पडतात असे दिसून येईल.

वाहतुकीचा सर्वांत कमी खर्च जलमार्गाने येतो. नदी, कालवे यातून माल पाठविण्यास जो खर्च येतो त्यापेक्षा समुद्रातून माल नेण्यास कमी खर्च येतो. परंतु ही वाहतुक माल फार लांबवर किंवा दुसऱ्या देशात पाठविण्याच्या कामीच उपयोगी पडते. देशातील देशात मालाची वाहतूक पुष्कळ प्रमाणात रेल्वे-मार्गानेच होत असते.

या सर्व बाबी लक्षात घेऊन वाहनावर जितका कमी खर्च करता येईल तेवढा करण्याची उत्पादकाने तजवीज केल्यास त्याचा माल गिऱ्हाइकास त्या मानाने स्वस्त दरात देण्यास परवडेल व त्या मानाने त्या मालाची विक्री वाढेल.

(९) जाहिराती देणे व प्रदर्शन भरविणे—कोणत्याही मालाची विक्री होण्यास जितका जास्त वेळ लागेल त्यामानाने त्याच्या विक्रीची किंमत (मार्केटिंग कास्ट) वाढत जाते. ती तशी वाढणे उत्पादकाच्या दृष्टीने अनहिताचे असते. म्हणून उत्पादकाने आपल्या मालाची शक्य तितक्या लवकर विक्री व्हावी म्हणून प्रयत्न केला पाहिजे. माल गिऱ्हाइकाच्या नजरेस नेहमी येत राहिला म्हणजे त्याची विक्री हळुहळू वाढत राहते. त्यासाठी आपल्या मालाची कारागिराने जाहिरात केली पाहिजे. ही जाहिरात वेगवेगळ्या प्रकाराने करतात. एक गोष्ट उत्पादकाने मात्र लक्षात ठेविली पाहिजे. ती ही की, त्याने आपल्या मालाची खोटी जाहिरात करू नये. अशा जाहिरातीमुळे काही लोक काही काळ फसतील, परंतु पुढे मात्र त्या कारागिराच्या चांगल्या मालाची विक्री होण्याच्या कामी त्याच्या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या खोट्या जाहिराती नेहमी आड येत राहतील. यासाठी 'खोट्या जाहिरातीपासून सावध रहा' ही धोक्याची सूचना ज्याप्रमाणे गिऱ्हाइकासाठी असते तशीच ती पर्यायाने उत्पादकासाठीही असते हे त्याने नेहमी लक्षात ठेवावे.

जाहिराती पुढील मार्गांनी देता येतात:—(१) रेडिओ, (२) सिनेमा, (३) हस्तपत्रके, (४) भिंतीपत्रके, (५) कॅलेंडरे, (६) टीपकागद, (७) तारखांची कार्डे, (८) सर्क्युलर लेटर्स, (९) वर्तमानपत्रे, नियतकालिके वगैरे, (१०) नियतकालिके स्वतः काढलेली, (११) पोस्ट ऑफिस, रेल्वे स्टेशने येथे पाट्या, (१२) ट्रॅम्स, बसेस, रेल्वेचे डबे येथे पाट्या, (१३) दुकानावर पाट्या, (१४) स्वतःच्या फिरत्या मोटारी ठेवून त्यातील लाऊडस्पीकर्स वगैरे साधनांनी जाहिरात करता येते व त्याचा उपयोग चांगला होतो.

याशिवाय ठिकठिकाणी प्रदर्शने भरवून, तसेच कायमची प्रदर्शने स्थापना करून त्याद्वारे आपला माल अनेक गिऱ्हाइकांच्या नजरेस पडेल अशी तजवीज कारागीर व उत्पादक यांना करता येते.

या सर्व साधनांनी आपला माल लोकांना दाखवून व तो त्यांना पटवून विकता येतो. शिवाय अशा वेळी गिऱ्हाइकांनाही काही सूचना उत्पादकासाठी देता येतात. अशा सूचनांच्या द्वारे लोकांच्या आवडीनिवडी उत्पादकास समजू शकतात व त्या दृष्टीने तो आपल्या मालाची सुधारणा करू शकतो व आपल्या मालाची शक्य तितक्या थोड्या अवधीत विक्री करू शकतो. ज्या प्रमाणात मालाची विक्री होईल व ती जितक्या कमी वेळात होईल त्या मानाने वाढत्या प्रमाणात उत्पादकास फायदा मिळवता येतो. हीच साधने उत्पादकाच्या सोसायट्यांनी वापरून त्यांना आपल्या सभासदाचा फायदा करून घेता येईल.

◆◆◆

# ८. औद्योगिक सहकारी सोसायट्यांना भांडवलपुरवठा

कारागीर लोकांना आपल्या संस्था चांगल्या प्रकारे चालविण्यासाठी भांडवलाची मोठी अडचण भासते. त्यासाठी त्यांना कोणीकडून तरी पैसा आणणे भाग पडते.

आतापर्यंत औद्योगिक सोसायट्यांना लागणारा पैसा जिल्हा मध्यवर्ती बँका व स्टेट को. बँकेकडून मिळत असे. परंतु नानावटी कमिटीच्या शिफारशी-प्रमाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेला पतवान शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करावयाचा असल्यामुळे त्यांच्यावर अधिक भार पडत चालला आहे. या संस्थांच्या नोकर-वर्गाना व सभासदांनासुद्धा असाच अनुभव आला आहे की, पतवान शेतकऱ्यांना कर्ज देण्याघेण्याचा व्यवहार जास्त प्रमाणांत आहे.

शेतकी सोसायट्यांच्या तारणापेक्षा औद्योगिक सोसायट्यांनी दिलेले तारण वेगळे असते. कारण औद्योगिक सोसायट्यांमध्ये कारागिरांना द्यावयास दुसरे तारण नसल्यामुळे कारागिरांचे कौशल्य हेच त्यांच्याजवळ द्यावयास काय ते तारण असते. परंतु या तारणाचा फारसा उपयोग होत नाही. कारण या तारणावर त्यांना बँकेकडून कर्ज मिळूं शकत नाही. कारागिरांच्या सोसायट्यांची जबाबदारी नियमित असल्याकारणाने त्यांना बँकेकडून मिळणार कर्ज त्यांच्या शेअरभांडवलाच्या प्रमाणातच मिळते. परंतु कारागिरांच्या सोसायट्या त्यांना जरूर लागणारे सुरवातीचे भांडवलसुद्धा शेअर्सच्या रूपाने संपूर्ण जमवू शकत नाहीत. अर्थात् त्यामुळे त्यांना बँकेकडून भरपूर कर्ज मिळू शकत नाही.

औद्योगिक सोसायट्यांचा व्याप वाढता असतो व त्यांच्या वाढत्या व्यापामुळे त्यांना भांडवलाची गरज अधिक भासते. अर्थात् त्यांना लागणारा पैसा जर औद्योगिक बँक पुरवूं शकली तर ते हवे आहे. म्हणून कारागिरांनी बचत करून जर औद्योगिक बँक स्थापन केली तर त्यांच्यावर डायरेक्टर बोर्डाचे चांगले नियमन राहून त्यांच्यामध्ये काटकसर करण्याची सवयही वाढेल.

औद्योगिक सोसायट्या व कारागीर यांना वैयक्तिक कर्ज मिळण्यासाठी जॉइंट स्टॉक बँका, जिल्हा सहकारी बँका व स्टेट को. बँक यांच्याकडून फार अडचणी आलेल्या आहेत.

**( अ ) कर्जाची कारणे :—** औद्योगिक सोसायट्यांना लागणारे कर्ज वेगवेगळ्या गोष्टींसाठी असू शकते. त्यापैकी काही गोष्टी पुढीलप्रमाणे—

( १ ) हत्यारे, अवजारे, जमीन, इमारती यांची खरेदी व त्याचप्रमाणे वर्कशॉप व गोडाउन्स यांची उभारणी.

( २ ) कच्च्या मालाची खरेदी.

( ३ ) माल तयार होत असताना कारागिराना व त्यांच्या कुटुंबाला उपजीविकेसाठी आवश्यक लागणारा पैसा व त्यांच्या हाताखाली मजुरांना द्यावयाची मजुरी.

( ४ ) तयार झालेला माल बाजारात सर्वच्या सर्व एकदम खपत नसल्यामुळे त्याचा साठा करणे आवश्यक असते. दुसरी गोष्ट मालाचे उत्पादन थांबविता येत नाही. बाजारात मालाला भाव नसल्यास तो साठा करून नीटनेटका ठेवणे अगत्याचे आहे व जरूर पडल्यास शिल्लक मालाच्या तारणावर कर्ज मिळणे अत्यंत आवश्यक आहे. बाजारात मालाला चांगला भाव येईपर्यंत त्याचा साठा करून ठेवणे व तोपर्यंत मालाच्या क्रेडिटवर पैसा उचलणे आवश्यक आहे.

( ब ) परिस्थितीप्रमाणे कर्जाचे प्रकार :—हत्यारे, अवजारे, जमीन, इमारती यांच्या खरेदीसाठी किंवा वर्कशॉप व गोडाउन्स यांच्या उभारणीकरिता लांब मुदतीचे किंवा मध्यम मुदतीच्या कर्जाची आवश्यकता असते व ही लांब किंवा मध्यम मुदतीची कर्जे दीर्घ मुदतीच्या हप्त्याहप्त्याने परत करता येतील. कच्च्या मालाची खरेदी, कारागिरांना द्यावयाचा पैसा व त्यांच्या हाताखालील मजुरांची मजुरी, मालाच्या क्रेडिटवर पैशाची उचल इत्यादि गोष्टीसाठी मध्यम व अल्प मुदतीच्या कर्जाची जरूरी आहे व ही अल्प व मध्यम मुदतीची कर्जे अल्प मुदतीत फेडणे जरूर आहे.

( क ) कर्जे मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी :—( १ ) जिल्हा सहकारी बँका व जॉइंट स्टॉक बँका यांचे उद्देश लांब मुदतीचे कर्ज देणे हे नसल्यामुळे त्या अशा प्रकारचे लांब मुदतीचे कर्ज देऊ शकत नाहीत. त्यामुळे कारागिरांना हत्यारे, अवजारे, जमीन, इमारती वगैरेसाठी लागणारे लांब मुदतीचे कर्ज या बँकांकडून त्यांना मिळत नाही.

( २ ) कारागीर लोक वापरत असलेली हत्यारे, अवजारे, इमारती वगैरेसंबंधीची तांत्रिक माहिती किंवा ज्ञान अशा बँकेतील नोकरवर्गांना नसल्यामुळे दिलेल्या कर्जाचा विनियोग योग्य प्रकारे होतो किंवा नाही हे पहाता येत नाही.

( ३ ) या सोसायट्या गरीब लोकांच्या संस्था असल्यामुळे त्यांना शेअर्स व रिझर्व फंडाचे भरपूर तारण बँकेला देता येत नाही.

( ४ ) हत्यारे व अवजारे यांसाठी मध्यम मुदतीचे कर्ज देण्यास या बँका नाखुष असतात.

(ड) कच्च्या मालाची खरेदी—कारागिरांना कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालांत रोजच्या रोज करावे लागते. त्यामुळे सर्वच्या सर्व कच्चा माल बँकेकडे तारण लावता येत नाही. शिवाय जरी कच्चा माल बँकेने तारण म्हणून पत्करला तरी त्यावर मिळणारे कर्ज मालाच्या किंमतीच्या २० ते ४० टक्के कपात करून शेकडा ६० ते ८० पर्यंत दिले जाते. मालाचे भाव कमी झाल्यास या कपातीची भरपाई सुद्धा शेअर-भांडवल व रिझर्व्ह फंड तारण देऊन करावी लागते.

(इ) मजुरांची मजुरी व स्वतःचा खर्च—या बाबतींत सुद्धा बँका अल्प मुदतीची कर्जे देण्यास नाखुष असतात. परंतु जर सोसायटीने स्वतःचे शेअर-भांडवल, रिझर्व्ह फंड, हत्यारे, अवजारे किंवा स्थावर मिळकत तारण दिली तरच कर्ज मिळू शकते. परंतु अशा प्रकारे मिळणारे कर्ज भरपूर नसते व त्यामुळे संपूर्ण गरज भागतेच असे नाही.

(फ) मालाचा साठा व विक्रीसाठी मदत :—बाजारात मालाला भाव येईपर्यंत त्याचा साठा करावा व तोपर्यंत मालावर ॲडव्हान्स घ्यावा म्हटले तर या बाबतींत अशी अडचण येते की, तयार झालेला माल कोणातरी अडत्याजवळ ठेवावा लागतो. अडत्याकडून भरपूर ॲडव्हान्स मिळेलच असे नाही. कधी कधी अडत्याकडून थोडे थोडे पैसे घ्यावे लागतात. बँकेकडे माल तारण द्यावा म्हटले तर किंमतीमध्ये २० ते ४० टक्क्यांची कपात होते व भाव घसरला तर मार्जिन भरून देण्याची जबाबदारी येते व ती जमत नाही.

या सर्व अडचणीमुळे सरकार आता यात लक्ष घालू लागले आहे. यासाठी औद्योगिक सोसायट्यांच्या जॉइंट रजिस्ट्रार यांना कर्ज देण्याचे अधिकार दिलेले आहेत. समाजविकासाच्या हेतूने ग्रामोद्योगांना उत्तेजन देण्यासाठी सरकार धोका पत्करूनही कर्ज व मदत देण्यास तयार झालेले आहे.

प्राथमिक अवस्थेमध्ये औद्योगिक सोसायट्या जरूर लागणारे तारण बँकेला देऊ शकत नाहीत. त्यामुळे बँका त्यांना तारणाच्या अभावी कर्ज देऊ शकत नाहीत. परंतु याच अवस्थेमध्ये औद्योगिक सोसायट्यांना कर्जाची अत्यंत जरूरी असते व ती भागविता यावी म्हणून सरकार यांत लक्ष घालीत आहे व औद्योगिक सोसायट्यांना प्राथमिक अवस्थेमध्ये लागणाऱ्या कर्जाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. बँकांनी औद्योगिक सोसायट्यांना तारणावर जे कर्ज दिले असते त्याच्या मार्जिनला सरकार हमी घेते. त्यामुळे औद्योगिक सहकारी संस्था व बँका यांच्यातील संबंध वाढण्यास मदत झाली आहे.

औद्योगिक संस्थांना मालाच्या तारणावर ॲडव्हान्स देणे सरकारला शक्य नाही व तशा प्रकारचा ॲडव्हान्स सरकारने औद्योगिक सोसायट्यांना देऊही नये. कारण,

( १ ) औद्योगिक सोसायट्यांच्या कामाची व्यवस्था व देखरेख सरकारला स्वतः पाहणे अवघड आहे.

( २ ) पैसे घेणाऱ्या संस्थेला व्यवस्थित धंदा करून त्यातून बराचसा नफा मिळविता आला पाहिजे व त्या नफ्यातून बँकेच्या कर्जाची फेड करून त्यांना स्वतःचे वेगळे भांडवल उभारता आले पाहिजे.

( ३ ) सरकारी कर्जाचा दर जरी बँकेपेक्षा कमी असला तरी बँकेच्या-कडून कर्ज काढल्यानंतर बँक त्यांच्या नांवाचे खाते सुरू करते. व त्या खात्यावर मिळणारे व्याज वजा जाता बँकेचे व्याज सरकारपेक्षा शेवटी कमी पडते म्हणून सरकारकडून कर्ज घेण्यात व्याजाचे बाबतीत नुकसानच आहे.

( ४ ) सर्व रक्कम जर एकदम कारागिराच्या हातांत गेली तर त्या रकमेचा दुरुपयोग होण्याची शक्यता असते·

( ५ ) सोसायट्या व कारागीर यांची संख्या जसजशी वाढत जाईल तसतशी सरकारलाही त्यासाठी फार मोठी रक्कम गुंतवावी लागेल.

म्हणून औद्योगिक सहकारी सोसायट्यांना पैसा पुरविण्याची स्वतंत्र व्यवस्था असणे जरूर आहे.

सोलापूर, विजापूर व बेळगाव जिल्ह्यांकरितां अशा जिल्हा औद्योगिक सरकारी बँका स्थापन झालेल्या आहेत व सुरत, भडोच आणि डांग जिल्ह्यांकरितां दक्षिण गुजराथ औद्योगिक सहकारी बँक रजिस्टर करण्यात आली आहे. ज्या ठिकाणी अशा खास औद्योगिक बँका स्थापन करण्यात आल्या नाहीत तेथे त्या ठिकाणच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका हे पैसे पुरविण्याचे काम करीत आहेत.

स्वतःच्या फंडाची उभारणी : —

औद्योगिक सहकारी सोसायट्यांनी स्वतःचे भांडवल उभारणे अगत्याचे आहे. यांकरिता सभासदांनी नियमित बचत करून त्यातून शेअर्स विकत घेणे जरूर आहे. याकरिता साधारण सभेत ठराव करून सदर भांडवल पुढीलपैकी एक अगर अनेक मार्गांनी उभारता येईल—

( १ ) मजुरीतून रुपयामागे ३ नये पैसे प्रमाणे कपात करून.

( २ ) सभासदांना पुरविल्या जाणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतीवर शे. १ रु. जादा कर वाढवून.

( ३ ) सभासदांना मिळणाऱ्या बोनसमधून २५ टक्के कपात करून.

अशा तऱ्हेने जमा होणारी रक्कम ज्या त्या सभासदांच्या नांवावर वेगळी काढून ठेवण्यात येईल व एका शेअरच्या किंमतीइतकी ही रक्कम होताच तिचे शेअरमध्ये रूपांतर केले जाईल व ही पद्धत त्या सभासदाच्या नावावर ५० शेअर्स होईपर्यंत चालू राहील. त्यानंतर जमा होणारी रक्कम साधारण सभेच्या ठरावानुसार ठेव म्हणून समजण्यात येईल.

जमा होणाऱ्या रकमेला सोसायटीकडून व्याज मिळणार नाही. परंतु ठेव म्हणून ठेवल्या गेलेल्या रकमेवर साधारण सभेच्या ठरावाप्रमाणे व्याज देण्यात येईल.

◆◆◆

# ९. ग्रामीण उद्योगधंद्यांस सरकारची मदत व सहाय्य

सन १९५७–५८ मध्ये घरगुती उद्योगधंद्यांच्या विकासाकरिता मुंबई राज्यात सरकारने घरगुती उद्योगधंदे व औद्योगिक सहकारी संस्था या नावाचे एक स्वतंत्र खाते स्थापन केले. या खात्यामार्फत घरगुती उद्योगधंद्यांना किंवा कुटीर उद्योगांना संपूर्ण मदत मिळत आहे. ग्रामीण उद्योग-धंद्यांची वाढ होऊन ते कार्यक्षम व किफायतशीर होण्याच्या दृष्टीने सरकार प्रयत्न करीत असून या घरगुती उद्योगधंद्यांना जोराची चालना मिळालेली आहे.

यंत्रशक्तीवर किंवा विजेच्या साह्याने शहर किंवा ग्रामीण भागात कारागिरांच्या नांवाने चालविण्यात येणाऱ्या उद्योगधंद्यांस घरगुती उद्योगधंदे म्हणून मानण्यात येते. त्याचप्रमाणे छोट्या कारखान्यांच्या स्वरूपात चालविण्यात येणाऱ्या उद्योगधंद्यांना सुद्धा घरगुती उद्योग समजण्यात येतात. अशा प्रकारच्या घरगुती उद्योगधंद्यांसाठी स्वतः कारागीर व त्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांची संख्या किमान नऊ तरी असली पाहिजे. त्याचप्रमाणे कायम भांडवल म्हणून धंद्यांत १० हजार रुपये तरी गुंतविलेले असले पाहिजेत.

या धंद्याचा सहकारी तत्त्वावर विकास करणे, धंद्याच्या सुधारलेल्या पद्धती व अवजारे शोधून काढण्यासाठी प्रयोग करणे, कारागिरांना ट्रेनिंग देण्याची व्यवस्था करणे, त्यांना लागणारी कर्जे व आर्थिक मदत देणे व घरगुती उद्योगधंद्यात तयार झालेल्या वस्तूंची विक्री करणे वगैरे गोष्टी धोरण म्हणून घरगुती उद्योगधंद्यांच्या बाबतीत ठरविल्या आहेत.

वंशपरंपरागत कारागिरांना घरबसल्या तांत्रिक ट्रेनिंग देऊन उत्पादनाच्या संस्था चालवाव्यात व त्या संघटित कराव्यात म्हणून सरकारने तंत्रविषयक ट्रेनिंगच्या सोयी केलेल्या आहेत. उत्पादनाच्या पद्धतीत सुधारणा हा औद्योगिक विकासाचा पाया आहे व त्यासाठी तंत्रविषयक ट्रेनिंग आवश्यक आहे. विशिष्ट पद्धतीने विशिष्ट अवजारांच्या साह्याने उत्पादन युगानुयुगे चालले आहे. त्यामुळे या धंद्यातील कारागीर रूढीप्रभावामुळे व आर्थिक परिस्थितीमुळे आपले गांव सोडून इतरत्र ट्रेनिंग घेण्यासाठी बाहेर जाण्यास तयार नसतात. अशा प्रकारच्या कारागिरांना शक्यतो त्यांच्या घरीच शिक्षण देण्याची सोय फिरत्या शाळा काढून त्या खात्यामार्फत चालविण्यात येतात. कारागिरांनी अवजारे व छोटी यंत्र कशी वापरावीत, उत्पादनाच्या अद्ययावत् पद्धती कोणत्या? अद्ययावत् पद्धतीची डिझायने कोणती आहेत? व लोकांच्या नेहमी बदलणाऱ्या आवडीनिवडी विचारात घेऊन उत्पादन कसे करावे वगैरेबाबतचे शिक्षण या शाळांमधून देण्यात येते. अशा प्रकारच्या फिरत्या शाळा पुढील उद्योगधंद्यांसाठी आहेत.

( १ ) कापसाचे विणकाम, ( २ ) कापड रंगविणे व त्यावर छपाईकाम करणे, ( ३ ) कातडीकमावणे, ( ४ ) चामड्याच्या वस्तू तयार करणे, ( ५ ) ताग व अंबाडीपासून वस्तू बनविणे, ( ६ ) काथ्या काढून विणणे व त्यापासून वस्तू तयार करणे, ( ७ ) वेत व बांबूकाम, ( ८ ) सुतारकाम व लोहारकाम, ( ९ ) लाखेपासून वस्तू बनविणे, ( १० ) कुंभारकाम, ( ११ ) तेलघाणी उद्योग, ( १२ ) काचेच्या बांगड्या तयार करणे, ( १३ ) लोकरीचे विणकाम, ( १४ ) मधमाशापालन, ( १५ ) दगडी पेन्सिली तयार करणे.

या शाळा ग्रामीण भागात असल्यास प्रत्येक विद्यार्थ्यास दरमहा २० रु. विद्यावेतन देण्यात येते व शहर भागातील शाळेतील विद्यार्थ्यास दरमहा २५ रु. विद्यावेतन देण्यात येते. या शाळांपैकी काही शाळा खास मागासलेल्या वर्गासाठी चालविण्यात येतात. या शाळांतील शिक्षणक्रम ६ महिन्यांपासून २ वर्षपर्यंत निरनिराळा असतो. सहकारी पद्धतीने उद्योगधंदे कसे संघटित करावे याबाबत शिक्षण या विद्यार्थ्यांना दिले जाते. त्याचप्रमाणे ट्रेनिंगचा काळ संपल्यानंतर त्यांनी सहकारी सोसायट्या स्थापन कराव्यात म्हणून त्यांना उत्तेजन देण्यात येते. औद्योगिक सहकार्य शक्य नसलेल्या ठिकाणी कारागिरांना त्यांचा धंदा सुरू करता यावा म्हणून आर्थिक सहाय्य देण्यात येते. समाज विकास योजना ज्या ठिकाणी सुरू झाल्या आहेत, त्या क्षेत्रात देखील बरीच ट्रेनिंग केंद्रे उघडली आहेत.

या शाळेकरिता एखादे ठिकाण निश्चित करण्यापूर्वी निश्चित केलेल्या ठिकाणी भरपूर व मोठ्या प्रमाणात कारागीर या शाळेत येतील किंवा कसे? तो प्रदेश मागासलेला आहे काय? त्या क्षेत्राला समाजविकास योजना लागू करण्यात आलेली आहे काय? वगैरे गोष्टींचा विचार केला जातो. त्याचप्रमाणे एखाद्या प्रदेशात विवक्षित उद्योगधंद्यासाठी लागणारा कच्च्या माल भरपूर प्रमाणात मिळण्यासारखा आहे, परंतु या कच्च्या मालाचा भरपूर उपयोग कसा करून घ्यावा, हे तेथील स्थानिक कारागिरांना कळत नसेल, अशा ठिकाणी देखील अशा शाळा स्थापन केल्या जातात. काही ठिकाणी कच्चा माल उपलब्ध नसेल, परंतु अशा कच्च्या मालापासून बनविलेल्या वस्तू भरपूर प्रमाणात विकण्याची शक्यता असेल, कारागिरांनाही फायदेशीर व्यवसाय मिळवून देण्याची आवश्यकता आहे, अशा ठिकाणीही या शाळा चालविल्या जातात. या शाळेमध्ये १४ ते २५ वर्षे वयाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो. विद्यार्थ्यांची शैक्षणिक लायकी किमान प्राथमिक शाळेतील ४ थी इयत्ता पास पाहिजे. पिढीजाद कारागिरांच्या बाबतीत हा नियम अपवाद समजला जातो. त्यांना शिक्षणाची अट नाही. शाळेत प्रवेश देताना पिढीजाद कारागिरांना अधिक पसंत केले जाते.

उत्पादनाच्या नवीन पद्धतींवर लक्ष ठेवून त्याची माहिती कारागिरांना देणे जरूर आहे. कारागिराचे उत्पादन वाढावे म्हणून संशोधन व प्रयोग करण्यात येतात. पुणे येथे छोट्या उद्योगधंद्यांसंबंधीच्या संशोधनासाठी (१) इंजिनिअरिंग (२) रसायनशास्त्र (३) काच (४) तेल (५) डाइंग आणि प्रिंटिंग व (६) हातमाग असे सहा भाग निवडलेले आहेत. या निरनिराळ्या विभागांत प्रयोग करून अवजारे तयार केली जातात व ती फिरत्या शाळेतून ट्रेनिंग घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी व औद्योगिक संस्था यांना पुरविली जातात. संत्र्याचे तेल काढण्याचे यंत्र, सुधारलेल्या पद्धतीची वर्धा घाणी, ताग सोलण्याचे यंत्र वगैरे निरनिराळी यंत्रे पुणे येथील संस्थेने तयार केली आहेत. त्याचप्रमाणे निरनिराळ्या उद्योगधंद्यांचे ट्रेनिंग देण्याचे वर्ग ठिकठिकाणी चालविण्यात येतात. चादरी व नवार विणणे, फळे व फळांचे पदार्थ टिकविण्याचे वर्ग नागपूर येथे आहेत. शास्त्रीय पद्धतीने काच तयार करणे, काचेची खेळणी बनविणे, खाटा तयार करणे, कुलपे बनविणे, टॉर्चचे बल्ब तयार करणे, तेलघाणी यासंबंधीचे वर्ग पुणे येथे चालतात. कामकाजाच्या वेळात ही यंत्रे या संस्थेत पाहावयास मिळतात व मागणी केल्यास ही यंत्रे किंवा ब्ल्यू प्रिंट्स तेथे विकतही मिळतात. पुणे येथील संस्थेने ६६ प्रकारची आधुनिक अवजारे तयार केली आहेत.

**वैयक्तिक कारागिरांना आर्थिक सहाय्य**—कारागिरांना त्यांचा धंदा चांगल्याप्रकारे चालविण्यासाठी मुख्य भांडवलाची अडचण भासते. पुरेसा पैसा नसल्याकारणाने त्यांना आपला व्यवसाय नीट करता येत नाही. यासाठी निरनिराळ्या योजनांखाली पुढील प्रकारच्या इसमांना कर्जे देण्यात येतात—

१. सुशिक्षित बेकार, २. खरेखुरे कारागीर, ३. मागासलेल्या वर्गांचे कारागीर, ४. मागासलेले वर्ग, वर्गीकृत जनजाती, विमोचित जातीचे ट्रेन्ड कारागीर, भटक्या जमातीतील ट्रेन्ड कारागीर, वंशपरंपरेने उद्योगधंदे करणारे भटक्या व निमभटक्या जमातीतील कारागीर.

दरवर्षी शाळाकॉलेजातून अंदाजे पाऊण लाख विद्यार्थी बाहेर पडतात. ह्या सर्वांना नोकऱ्या देणे शक्य नाही. त्यांचा आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी कुटीर उद्योग हाच एक उपाय आहे. ह्या दृष्टीने ही योजना आखण्यात आली आहे. व्ह. फा. पास झालेल्या किंवा एस्. एस्. सी. पर्यंत शिक्षण झालेल्या पण नोकरी नसलेल्या इसमास सुशिक्षित बेकार मानण्यात येते. अशा सुशिक्षित बेकारांना नवे घरगुती उद्योगधंदे उभारण्यासाठी किंवा विद्यमान धंद्याचा विकास करण्यासाठी ३००० रु. पर्यंत खेळत्या भांडवलाकरिता व साधनसामुग्री विकत घेण्यासाठी कर्ज देण्यात येते. दोन किंवा अधिक सुशिक्षित मित्र एखादा धंदा करणार असतील तर जास्तीत जास्त ६००० रु. कर्ज मिळू शकेल. हे कर्ज स्थावर मालमत्तेच्या दोन तारणांवर किंवा वैयक्तिक जामिनकीवर देण्यात येते. त्यासाठी सरकारबरोबर आवश्यक तो लेखी करार करावा लागतो. या कर्जाची फेड ५ वर्षांत ५० मासिक हप्त्यांनी करावयाची असते व त्यासाठी द. सा. द. शे. ४।। टक्के व्याज आकारण्यात येते पहिला हप्ता कर्ज मिळाल्यानंतर सहा महिन्यांनी भरावा लागतो. नियमित हप्ते भरण्यास चुकल्यास अनियमित हप्त्यास जादा दोन टक्के अधिक व्याज घेण्यात येते. ज्या अटीवर हे कर्ज देण्यात येते, त्या अटी मोडल्यास जमीनमहसुलाप्रमाणे ही रक्कम वसूल करण्यात येते. अर्जदारास गहाणखत व तारणखत करून द्यावे लागते.

सुशिक्षित बेकारांना दिलेल्या आर्थिक सहाय्यापैकी २५ टक्के एवढी रक्कम आर्थिक मदत ( सबसिडी ) किंवा अनुदान म्हणून समजण्यात व मंजूर करण्यात येते. अर्जदाराने जिल्ह्याच्या डेप्युटी रजिस्ट्रार को-ऑ. यांचेकडे अर्ज केला पाहिजे. १५०० रु. पर्यंतची रक्कम मंजूर करण्याचा अधिकार डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार यांना आहे. त्यापेक्षा जास्त रक्कम मागितली असेल तर ते अर्ज निकालासाठी डिव्हिजनल जॉइंट रजिस्ट्रार यांचेकडे पाठविले जाते.

**खरेखुरे कारागीर**—या खात्याच्या फिरत्या शाळेमध्ये शिक्षण घेतलेल्या इसमास किंवा दुसऱ्या कोणत्याही सरकारमान्य तांत्रिक शाळेत विशिष्ट उद्योग-धंद्याचे ट्रेनिंग घेतलेल्या इसमास खरेखुरे कारागीर समजण्यात येते. या योजने-खाली वैयक्तिक कारागिराला २००० रु. पर्यंत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येते. संयुक्त अर्जदारांच्या बाबतीत ६००० रु. पर्यंत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येते. त्यासाठी व्याजाचा दर, कर्जफेडीची मुदत, शिक्षा म्हणून आकारण्यात येणाऱ्या व्याजाचा दर, सबसिडी, करारभंग वगैरे सर्व नियम व अटी सुशिक्षित बेकारांना ज्याप्रमाणे आहेत त्याचप्रमाण असतात. मात्र १५०० रु. च्या ऐवजी २००० रु. पर्यंत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याचा अधिकार डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार को.सो. यांना आहे. सर्वसामान्यपणे २००० रु. रकमेपैकी १००० रु. ची रक्कम खेळत्या भांडवलासाठी किंवा अवजारे व साहित्यसामुग्रीसाठी मंजूर करता येते.

**पिढीजात कारागिर**—पिढीजात कारागिरांना या योजनेखाली वैयक्तिक २००० रु. पर्यंत साधनसामुग्री व अवजारे विकत घेण्यास कर्ज मिळू शकते. तसेच खेळत्या भांडवलाकरिता कर्ज देण्यात येते.

**मागासलेल्या वर्गांना सहाय्य**— विमुक्त जाती, वर्गीकृत जनजाती, भटक्या जमाती, इत्यादि मागासलेल्या वर्गाच्या लोकांची परिस्थिती सुधा-रावी म्हणून सरकारने पाच योजना मंजूर केल्या आहेत. मागासलेल्या वर्गाच्या लोकांना खास सवलती देण्यात येतात. तसेच त्यांना अवजारे आणि साहित्य-सामुग्री खरेदी करण्यासाठी आणि खेळत्या भांडवलासाठी कर्जेही देण्यात येतात. मागासलेल्या वर्गातील कारागिरांना प्रत्येक प्रकरणात अवजारे व साहित्य सामुग्री खरेदी करण्यासाठी व खेळत्या भांडवलासाठी २००० रु. पर्यंत आर्थिक सहाय्य देण्यात येते. खऱ्याखुऱ्या कारागिरांना कर्जे व आर्थिक मदत देण्याच्या बाबतीतील अटी व शर्ती याबाबतही लागू आहेत. मागासलेल्या वर्गाच्या ज्या कारागिरांनी या खात्यामार्फत चालविण्यात येणाऱ्या टेक्निकल ट्रेनिंग संस्थापैकी एखाद्या संस्थेत किंवा सरकारमान्य अशा दुसऱ्या कोणत्याही टेक्निकल ट्रेनिंग संस्थेत ट्रेनिंग घेतले असेल, अशा कारागिरांना बिनव्याजी कर्ज देण्यात येते आणि ज्या कारागिरांनी असे शिक्षण घेतले नसेल त्यांना खेळत्या भांडवलासाठी देण्यात येणाऱ्या रकमेपैकी ५० टक्के रक्कम बिनव्याजी व उरलेली ५० टक्के रक्कम ४॥ टक्के व्याजाने देण्यात येते. अवजारे व साहित्य-सामुग्रीसाठी देण्यात येणाऱ्या रकमेपैकी २५ टक्के रक्कम लायक अशा प्रकरणात मदत ( सबसिडी ) म्हणून समजण्यात येते. डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार को. सो. यांना २००० रु. पर्यंत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याचा अधिकार आहे. त्यासाठी अर्ज करावे लागतात.

**उद्योग धंद्यांना राज्यातर्फे मदत देण्यासंबंधीच्या नियमाखाली देण्यात येणारे आर्थिक सहाय्य :—** छोट्या आणि घरगुती उद्योगधंद्यांना राज्यातर्फे मदत देण्यासंबंधीच्या १९३५ च्या नियमाखाली लायक अशा कारागिरांना पुढील गोष्टींसाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते—(१) इमारती, गुदामे, शेड, भिंती, टाक्या वगैरे बांधणे व त्यासाठी जमीन खरेदी करणे. (२) यंत्रसामुग्री खरेदी करणे व उभारणे. (३) कच्चा माल खरेदी करणे व (४) खेळते भांडवल. ह्या कर्जाकरिता जमीन, बिल्डिंग, आणि मशीनरी यांचे तारण द्यावे लागते. तारण म्हणून ठेवण्यात येणाऱ्या मालमत्तेच्या किंमतीच्या ७५ टक्के इतक्या रकमेची कर्जे मंजूर करण्यात येतात. सरकारने यासाठी मान्यता दिलेल्या समाजसेवा करणाऱ्या संघटनेच्या शिफारशीने निरनिराळ्या इसमांना वैयक्तिक हमीवर (तारणाशिवाय) १.००० रु. पर्यंत कर्ज मंजूर करण्यात येते. १००० रु. पेक्षा जास्त परंतु ५००० रु. हून कमी रकमेची कर्जे एक अथवा अधिक वैयक्तिक जामीन घेऊन मंजूर केली जातात. या योजनेखालील कर्जावर ती ५० हजारांहून कमी असल्यास ३ टक्के दराने व ५० हजारांहून जास्त असल्यास ५ टक्के दराने व्याज आकारण्यात येते. तसेच अवजारे व यंत्रसमुग्रीसाठी दिलेले कर्ज १० वर्षांत व खेळत्या भांडवलासाठी दिलेले कर्ज जास्तीत जास्त ५ ते ७ वर्षांत परत फेडले पाहिजे. ५००० रु. पर्यंतचीच कर्जे फक्त या खात्याला मंजूर करता येतात. ५ हजारापासून १० हजारांपर्यंतच्या कर्जाची प्रकरणे सरकारच्या उद्योगधंदे व सहकार खात्याकडून मंजूर व्हावी लागतात. १० हजार रु. हून अधिक परंतु ७५ हजार रुपयांपर्यंतची कर्जे व अपवादात्मक प्रकरणात एक लाख रु. पर्यंतची कर्जे मिळण्यासंबंधीच्या अर्जांचा विचार मुंबई राज्य फायनान्शियल कार्पोरेशनकडून करण्यात येतो डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार यांना २००० रु.पर्यंतची कर्जे मंजूर करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. १० हजार रु. पेक्षा जास्त कर्ज पाहिजे असेल तर मॅनेजिंग डायरेक्टर बॉंबे स्टेट फायनान्शिअल कार्पोरेशन, मुंबई १ यांचेकडे अर्ज करावेत.

**औद्योगिक सहकारी संस्थांना कर्ज—** ज्यात कमीत कमी $\frac{1}{3}$ सभासद कारागीर आहेत, अशा औद्योगिक सहकारी संस्थांना अवजारे व इतर साधनसामुग्री विकत घेण्यास ५००० रु. पर्यंत कर्ज देण्यात येते. त्यापैकी निम्मी रक्कम सबसिडी (मदत) म्हणून समजण्यात येते. व्याजाचा दर दरसाल दर शेकडा ४॥ दराने असून कर्ज पाच वर्षांत सहामाही हप्त्याने परत करावे लागते. कर्ज मिळविल्यानंतर एक वर्षाने कर्जाच्या परतफेडीला सुरवात होते मागासलेल्या कारीगरांच्या संस्थांना हे कर्ज बिनव्याजी मिळते. खेळत्या भांडवलाकरिताही

१५००० रु. पर्यंत कर्ज वरील अटीवर देण्यात येते. फक्त ह्याकरिता सबसिडी मिळत नाही.

औद्योगिक सहकारी संस्थांना सेंट्रल बँकामार्फत खेळत्या भांडवला-करिता कर्ज—ही योजना नवीनच सुरू करण्यात आली असून या योजने-प्रमाणे फक्त खेळत्या भांडवलासाठीच सेंट्रल बँकेमार्फत कर्ज देण्यात येते. साधन-सामुग्री विकत घेणे, शेड्स्-बिल्डिंग किंवा गोडाऊन बांधण्यासाठी या योजने-खाली कर्ज मिळत नाही. सरकार या योजनेखाली बँकांना $\frac{1}{2}$ टक्के व्याजाने कर्ज देते व बँका औद्योगिक सोसायट्यांना २॥ टक्के व्याजाने कर्ज देतात. हे कर्ज एक वर्षात परत करावे लागते. जर ठराविक मुदतीत कर्जफेड झाली नाही तर १ टक्का जास्त व्याज आकारण्यात येते. बँका सरकारला हे कर्ज दोन हप्त्यांनी परत करतात. पहिला हप्ता ५ वर्षांनी व २ रा १० वर्षांनी द्यावा लागतो. या योजनेची अंमलबजावणी करताना बँकांना नुकसान आल्यास ह्या नुकसानीची $\frac{1}{2}$ रक्कम सरकार सहन करते. या कर्जासाठी ठराविक नमुन्यात अर्ज—डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार मार्फत करावे लागतात. खात्याची शिफारस असल्याखेरीज बँक या योजनेखाली कर्ज देऊ शकत नाही.

### स्वाध्याय

विणकर सहकारी सोसायट्यांना सरकारमार्फत कोणत्या सवलती देण्यात आल्या आहेत ?

◆◆◆

# १०. औद्योगिक सहकारासंबंधी शिफारशी

## इंटरनॅशनल प्लॅनिंग टीम

लहान उद्योगधंद्यांसाठी पतपुरवठा व इतर बाबींची पाहाणी करून शिफारशी करण्यासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ही कमिटी नेमली होती. तिने पुढीलप्रमाणे विधायक सूचना केल्या आहेत—

( १ ) लहान उद्योगधंद्यांना कर्ज देण्याच्या बाबतीत व्यापारी व सह-कारी बँकांनी प्रत्यक्ष भाग घ्यावा. ( २ ) प्रत्येक राज्यासाठी राज्य फायनान्शिअल कार्पोरेशन असावी. ( ३ ) ग्रामोद्योगासाठी जमिनीच्या तारणावर व

घराच्या तारणावर कर्जे मिळावीत. (४) कच्चा माल, मार्केटिंग, अवजारे, कर्ज-उभारणी यांसाठी सहकारी औद्योगिक संस्था काढाव्यात. (५) निर्यात मालाच्या विकासाची कार्यालये उघडावीत व ग्रामोद्योगातील माल कॅनडा, अमेरिका, इंग्लंडमध्ये खपला जाण्यासाठी फिरती प्रदर्शने ठेवावीत. (६) चार रिजनल इन्स्टिटयूट व स्कूल ऑफ् डिझाइन्स यांची स्थापना करून ग्रामोद्योगातील तांत्रिक, विकास शिक्षण व संशोधन यांची वाढ करावी. (७) लहान उद्योगधंद्यांना राज्य सरकारनी सर्व प्रकारच्या आर्थिक मदती द्याव्यात. (८) स्वस्त इलेक्ट्रिकचा पुरवठा करावा. (९) ग्रामीण कारागिरात उत्साह निर्माण करून आत्मीयतेने भाग घेण्याची प्रवृत्ती वाढवावी.

## वस्त्रव्यवसाय चौकशी समिती (कानुंगो समिती)

भारत सरकारच्या व्यापार आणि उद्योगखात्याच्या मिनिस्ट्रीने ता० २५ नोव्हेंबर १९५२ मध्ये एक वस्त्रव्यवसाय चौकशी समिती नेमली. तिचे चेअरमन श्री. नित्यानंद कानुंगो, एम. पी. (ओरिसा) हे होते. म्हणून तिला कानुंगो समिती म्हटले आहे. समितीचे सेक्रेटरी एम्. एस्. रामनाथ होते व याशिवाय सर्वश्री एच. सी. दासप्पा, व्ही. एन्. तिवारी, ए. आर. भट, एस्. के. मुरंजन, आर बाळकृष्ण, एस्. के. बसू, एस्. पी. चोप्रा, टी. स्वामिनाथन् एस्. सुब्रह्मण्यम् हे या समितीचे सभासद होते. या समितीकडे चौकशीसाठी निर्दिष्ट केलेले मुद्दे पुढीलप्रमाणे होते :—

(१) कापसाच्या वस्त्रव्यवसायातील निरनिराळ्या विभागांची रचना व संघटना यांची चौकशी करणे. (२) सुती कापडाच्या मागणीचे देशामध्ये व निर्यात बाजारपेठेत स्वरूप व प्रमाण काय आहे याचा अभ्यास करणे. (३) शक्य असल्यास पुढील गोष्टी लक्षात घेऊन सुती कापड तयार करणाऱ्या तिन्ही विभागांचा उत्पादनासाठी किती उपयोग करता येईल याचे मोजमाप करणे—(अ) देशातील मागणीसाठी सुती कापडाचा योग्य दराने पुरवठा करणे. (ब) परदेशी चलन जास्तीत जास्त मिळविण्याची हमी देणे. (क) आपल्याजवळ असलेल्या मनुष्यबळाचा व साधनसामुग्रीचा समाजाला जास्तीत जास्त हितकारक अशा मार्गाने उपयोग करणे. (ड) प्रत्येक विभागाची व्याप्ती, संघटना आणि प्रगतीची दिशा ठरविणे व त्यासाठी जरूर तर उत्पादनाचे विशिष्ट क्षेत्र एका किंवा अधिक विभागांसाठी राखून ठेवण्याचा विचार करणे. आणि (४) इतर सर्व आवश्यक आणि आनुषंगिक प्रश्नांचा विचार करून, सरकारला योग्य शिफारस करणे.

समितीने ता० २ व ३ जानेवारी १९५३ रोजी मुंबई येथे बैठक भरवून मिल ओनर्स ॲसोसिएशन्स, राज्य सरकारे, हातमागाशी संबंधित अशा संघटना, युनिव्हर्सिटी यांना पाठवावयाच्या प्रश्नपत्रिकेचा नमुना तयार केला. व २० जाने. १९५३ रोजी १३७० ठिकाणी प्रश्नपत्रिका पाठविल्या. त्यांपैकी फक्त १०३ उत्तरे नोव्हेंबर १९५३ पर्यंत आली. ता० २५ व २६ फेब्रुवारी १९५३ रोजी दिल्ली येथे भरलेल्या बैठकीत हातमाग, यंत्रमाग व गिरण्या यांच्या केंद्रांची प्रत्यक्ष पाहाणी करण्याचे समितीने ठरविले व त्याप्रमाणे मार्च व जून महिन्यात मुंबई, म्हैसूर, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, आसाम व पश्चिम बंगाल या राज्यांतून दौरे काढले व नमुन्याची पहाणी करून त्याचा एक अहवाल तयार केला. त्याचप्रमाणे समितीच्या सभासदांपैकी एक सभासद टेक्स्टाईल कमिशनर होते. त्यांना भारत सरकारच्या परवानगीने ग्रेट ब्रिटन व जपानमध्ये कापडाच्या धंद्याच्या संघटनेचे निरीक्षण करण्यासाठी पाठविले. त्यांनी आपला अहवाल २० नोव्हेंबर १९५२ रोजी समितीला सादर केला. या सर्व माहितीच्या आधारे सदर समितीने एकंदर १५४ निर्णय घेऊन ४३ शिफारशी केल्या. त्यापैकी महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे —

( १ ) या धंद्यातील बरीच साधनसामुग्री जुनी आणि पुरातन असून ती बदलणे जरूर आहे. ( २ ) सर्व देशभर पसरलेल्या हातमाग विणकरांना एका सहकारी संघटनेत गोवणे आवश्यक आहे. ( ३ ) तलम आणि अतितलम कापड निर्यात केल्यानेच मोठा फायदा होईल. सर्व जातींच्या कापडांमध्ये सुद्धा सफेत माल पाठविण्याऐवजी रंगीत, छापील व सफाईदार मालाची निर्यात करावी. ( ४ ) उत्पादनाचे परस्पर क्षेत्र निश्चित आणि स्थिर होईपर्यंत कापडाच्या जाती राखून ठेवण्याचे धोरण आवश्यक आहे. ( ५ ) आज असलेल्या हातमागाचे अर्धस्वयंचलित ( सेमी-ऑटोमॅटिक ) माग किंवा यंत्र-मागामध्ये परिवर्तन करणे अत्यंत आवश्यक आहे. ( ६ ) हे परिवर्तन घडवून आणण्यामध्ये शक्य तो सहकारी संस्थांना आणि त्यांच्या सभासदांना प्राधान्य द्यावे. ( ७ ) मागाची मालकी विणकराकडेच असावी. ( ८ ) वाइंडिंग, ताणा ( वार्पिंग ), पांजणी ( साइझिंग ), सुताचा पुरवठा, रंगाचे कारखाने, सफाईची यंत्रे वगैरेंच्या बाबतीत केंद्रीय स्वरूपाची व्यवस्था करावी. ( ९ ) तीन हात-मागांचे २ सुधारलेल्या हातमागांमध्ये आणि २ हातमागांचे १ यंत्रमागामध्ये परिवर्तन करण्यासाठी हातमागांच्या नोंदणीचे काम हाती घ्यावे. ( १० ) नवे हातमाग बसविण्याची परवानगी देण्यात येऊ नये. ( ११ ) मालाच्या दर्जामध्ये समानता येण्याच्या दृष्टीने हातमागाच्या कापडापैकी चांगल्या कापडावर शिक्का

मारण्याचा खुषांची योजना देशात सर्वत्र स्वीकारण्यात यावी. ( १२ ) ऑल इंडिया हँडलूम बोर्डाचा विस्तार वाढवून त्याला बळकटी आणावी. ( १३ ) ऑल इंडिया हँडलूम बोर्डावर सहकारी क्षेत्रातील अनुभवी लोक घ्यावेत.

## कर्वे समितीच्या शिफारशी

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रामीण भागातील उपलब्ध असलेल्या साधन-सामुग्रीचा आणि मानवी शक्तीचा वापर करून खेड्यापाड्यातून वंशपरंपरागत चालत आलेल्या धंद्याचा कसा विकास करता येईल व त्याचप्रमाणे नवीन ग्रामोद्योग कशा रीतीने विकास पावतील याबद्दलची माहिती नियोजन मंडळाला पुरविण्यासाठी जून १९५५ मध्ये प्रो० डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीमध्ये नामवंत अर्थशास्त्रज्ञ आणि सहकार तज्ज्ञ अशी मंडळी होती. समितीने पुढील तीन गोष्टी नजरेसमोर ठेवून आपल्या शिफारशी केल्या. ( १ ) नियोजन काळात लोकांना लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा ग्रामोद्योगामार्फत कसा करता येईल. ( २ ) या ग्रामोद्योगाने अधिकाधिक लोकांना उद्योगधंदा कसा मिळवून देता येईल ! ( अ) ग्रामोद्योग व उत्पादित वस्तूंची खरेदी-विक्री ही सहकारी पद्धतीवर कशी उभारता येईल !

ग्रामीण भागात काही धंद्यांची वाढ सहकार पद्धतीने करता येईल अशी शिफारस या समितीने केली असून विशेषतः हातमाग, कापड, तेलघाणी, भाताची हातसडाई, लोकर विणकाम, कातडी काम, रेशमी विणकाम, काड्याच्या पेट्या, गूळ, खाडसरी या धंद्यांच्या शिफारशी विस्तृत स्वरूपांत केल्या आहेत. कर्वे समितीच्या मुख्य शिफारशी पुढीलप्रमाणेः—

( १ ) सध्या अस्तित्वात असलेल्या उद्योधंद्यांच्या तांत्रिकतेत बदल करून नवीन उत्पन्न होणाऱ्या उद्योगधंद्यात नवीन तंत्राचा वापर करावा व त्यासाठी पुढील कालात क्रमाक्रमाने बदल होण्यासाठी भांडवल, तांत्रिक मदत, व सुधारलेली अवजारे पुरविणे जरूरीचे आहे.

( २ ) विकेंद्रित अर्थव्यवस्थेत उद्योगधंद्याचे क्षेत्र हे खेडेच राहील व ग्रामीण अर्थरचनेच्या कार्यात विस्तृत पायावर उभा असलेला "औद्योगिक पिरामिड" हे औद्योगिक रचनेचे स्वरूप राहील. योग्य प्रमाणांत असणाऱ्या उद्योगधंद्यांना मिळणारे फायदे लहान उद्योगधंद्यांना सहकार्याने मिळू शकतील.

( ३ ) विकेंद्रित धंदे स्वावलंबी व्हावेत व त्यांचे मोठ्या धंद्याशी संयोजन व्हावे व त्यांची इतर उद्योगधंद्यांशी टक्कर देण्याची ताकत वाढावी म्हणून त्याची गुणवत्ताही वाढणे जरूर आहे.

(४) लहान उद्योगधंद्यांना तांत्रिक व आर्थिक मदतीचा अभाव, धंद्यासाठी योग्य जागेची कमतरता, उद्योगधंद्यात झालेल्या मोडतोडीच्या दुरुस्तीची व्यवस्था नसणे वगैरे नाना तऱ्हेच्या येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी औद्योगिक वसाहती स्थापन करणे, सामुदायिक वर्कशॉपस् काढणे, स्वस्त दराने विजेचा पुरवठा करणे, व औद्योगिक सहकारी संस्था निर्माण करणे जरूर आहे.

(५) लहान उद्योगधंद्यातील मालास प्राधान्य देणे, त्यांना बाजारपेठा मिळवून देणे, कच्चामाल, तंत्रविषयक मार्गदर्शन, आर्थिक मदत, संशोधन ह्या सवलती त्या धंद्यांना मिळाल्या पाहिजेत.

(६) औद्योगिक संस्थांची बळकट पायावर उभारणी होणे जरूर आहे. लहान उद्योगधंद्यात तयार होणाऱ्या मालाच्या किमती अगोदर ठरवून देणे जरूर आहे.

(७) कच्च्या मालाचा पुरवठा, तयार मालाची विक्री–व्यवस्था, अवजारे–पुरवठा यासाठी वखारीची व्यवस्था होणे जरूर आहे. शेती मालाच्या नियंत्रित वखारीची जी योजना चालू आहे त्याचेही सहकार्य या उद्योगधंद्यासाठी घेण्यात यावे

(८) सरकारमार्फत लहान उद्योगधंद्यातील माल खरेदी पद्धत सुधारून जास्त प्रमाणात ह्या मालाचा वापर सरकारने करणे जरूर आहे. त्यामुळे त्या वस्तूची मागणी वाढेल व उत्पादनक्षमतेस वाव मिळेल. तसेच त्या वस्तूच्या मागणीबाबत संशोधनकार्य होणेही जरूर आहे.

(९) विकेंद्रित लहान उद्योगधंद्यातील व ग्रामोद्योगांतील कारागिरांच्या धंद्याच्या व राहाण्याच्या जागा अगदी निकृष्ट स्वरूपाच्या आहेत. त्यांत सुधारणा करण्याचे नियोजनबद्ध प्रयत्न करणे जरूर आहे.

(१०) कच्चा माल पुरवठा, पक्क्या मालाचा साठा, शेअर–भांडवल, अवजारे, खेळते भांडवल, कारखाने उभारण्यासाठी लांब मुदतीचा कर्जपुरवठा अशा अनेक गरजा लहान उद्योगधंद्यांना व ग्रामोद्योगांना आहेत त्या भागविण्याच्या दृष्टीने व त्यांच्या विकासासाठी समाधानकारक एकमुखी कर्ज पुरवण्याची योजना आवश्यक आहे. यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशन व मध्यवर्ती सहकारी बँका यांनी सहकार्याने "औद्योगिक एकमुखी पतपुरवठा योजना" अंमलात आणण्याची गरज आहे. ह्यासाठी प्रयोगादाखल काही केंद्रांची निवड करून एकमुखी पतपुरवठ्याची मार्गदर्शक योजना सुरू करावी.

◆◆◆

# ११. ग्रामोद्योग-शिक्षण आणि आर्थिक मदत

## अखिल भारतीय खादी ग्रामोद्योग कमिशन

खादी व ग्रामोद्योगाचे उत्पादन वाढवून विकासाचे कार्यक्रम पार पाडण्यासाठी भारत सरकारने हे कमिशन स्थापन केले आहे. राज्य ग्रामोद्योग मंडळाच्या कामात एकसूत्रीपणा आणणे; खादी व ग्रामोद्योगाच्या विकासाच्या आर्थिक, तांत्रिक व इतर मदतीच्या योजना कार्यान्वित करणे; या योजना अंमलात आणण्यासाठी त्यांना आवश्यक ती आर्थिक मदत मिळवून देणे; खादी व ग्रामोद्योगाचे विकास-कार्यक्रम तयार करणे; त्यासाठी तज्ज्ञ नोकर-वर्ग तयार करणे; कच्चा माल व साधने ही किफायतशीर दरात पुरविणे; खादी व ग्रामोद्योगात तयार झालेल्या मालाच्या खरेदीविक्रीची व्यवस्था करणे; उत्पादनाच्या तंत्राबाबत उत्तेजन देऊन संशोधनकार्यास मदत करणे; वगैरे कामे या कमिशनकडून केली जातात. वेगवेगळ्या राज्यांत ह्या योजना कार्यान्वित करण्याकरिता प्रत्येक राज्यात खादी व ग्रामोद्योग मंडळे स्थापन झाली आहेत. व्हिलेज इंडस्ट्रीज बोर्ड ही बिनसरकारी संस्था आता कायद्याने प्रस्थापित झाली असून बोर्डाने १ खादी, २ ताडगूळ, ३ मधमाशापालन, ४ हातबनावटीचा कागद, ५ मीठ, ६ घाणीचे तेल, ७ रंगीत खडू व क्रे-पास, ८ सील करण्यासाठी वापरण्यात येणारे मेण, ९ सरस, १० हाड भुकटी, ११ खडू, १२ प्लॅस्टर ऑफ पॅरिस, १३ पाट्यांच्या पेन्सिली, १४ चटयांचे विणकाम, १५ हातसडीचा तांदूळ व १६ काड्यांच्या पेट्या अशा एकूण सोळा ग्रामोद्योगाच्या विकासाचे कार्य हाती घेतले आहे. यासाठी या व्हिलेज इंडस्ट्रीज बोर्डास अखिल भारतीय खादी व व्हिलेज इंडस्ट्रीज बोर्डाकडून पैसे मिळतात

**खादी व ग्रामोद्योगाच्या कार्यक्रमात पुढील चौदा उद्योगांचा समावेश होतो.**

१ मधमाशा पाळणे, २ आगपेट्या तयार करणे, ३ कुंभारकाम, ४ अखाद्य तेलापासून साबण तयार करणे, ५ चामड्याचा धंदा ( यात मेलेल्या जनावरांपासून चामडी व इतर वस्तू करणे, चामडे पकविणे हाडाचे खत तयार करणे यांचा समावेश होतो. ६ बैलघाणीद्वारे तेल उत्पादन करणे, ७ हातकागद तयार करणे. ८ गूळ व खांडसारी तयार करणे, ९ नीरेपासून गूळ तयार करणे, १० धान कुटाई व हातचक्कीने दाळी तयार करणे, ११ तागापासून दोर व इतर वस्तू तयार करणे, १२ लोहारकाम व सुतारकाम, १३ पिठाच्या हातचक्क्या, १४ खादी ( सुती, लोकरी, रेशमी. )

प्रामुख्याने औद्योगिक सहकारी संस्था व नेमून दिलेल्या पद्धतीनुसार नोंदलेल्या इतर संस्था यांना वरील उद्योगांकरिता आर्थिक मदत मिळू शकते.

**खादीउद्योग** — या उद्योगाचे दोन भाग पडतात—( १ ) अंबर खादी व ( २ ) ट्रॅडिशनल खादी ( आजपर्यंत चालत आलेला खादीउद्योग. )

**( १ ) अंबर खादी** — ही अंबर चरख्यावर काढली जाते. त्यासाठी सुधारलेला 'अंबर' ह्या नावाचा चरखा तयार करण्यात आला असून त्यावर नेहमीच्या चरख्यापेक्षा चौपट सूत निघते. या चरख्याला चार चात्या असतात. त्यामुळे नेहमीच्या चरख्यापेक्षा जास्त उत्पादन करता येते व त्यामुळे हा चरखा चालविणाराला जास्त मजुरी तर मिळतेच, परंतु तो आपला चरितार्थ या व्यवसायावर चालवू शकतो. या चरख्याचा प्रसार विस्तीर्ण प्रमाणावर करण्याची योजना आखण्यात आलेली आहे. या योजनेची प्रमुख अंगे—( अ ) प्रशिक्षण व ( ब ) सरंजाम कार्यालय अशी आहेत. प्रशिक्षणाचे तीन भाग पडतात. ( १ ) अंबर कार्यकर्ता प्रशिक्षण, ( २ ) अंबर मिस्त्रीचे प्रशिक्षण, ( ३ ) अंबर सूत कातणाऱ्यांचे प्रशिक्षण.

**अंबर कार्यकर्ता प्रशिक्षण** — नासिक येथे त्र्यंबक विद्या-मंदिरात खादी ग्रामोद्योग महाविद्यालय चालविण्यात येत असून त्या ठिकाणी या शिक्षणाची सोय आहे. शिक्षणासाठी विद्यार्थी मॅट्रिकची परीक्षा पास असावा लागतो. हा शिक्षणक्रम ६ महिन्यांचा असून शिक्षणाच्या काळात विद्यार्थ्याला दरमहा ४० रुपये विद्यावेतन मिळते.

**अंबर मिस्त्रीचे प्रशिक्षण**—चांगल्या प्रकारे सुतारकाम जाणणाऱ्या विद्यार्थ्याला हा कोर्स घेता येतो. शिक्षणक्रम ३ महिन्यांचा असून शिक्षणाच्या काळात विद्यार्थ्याला दरमहा ७५ रु. विद्यावेतन मिळते. शिवाय विद्यार्थ्याला तिसऱ्या वर्गाचे जाण्यायेण्याचे भाडे मिळते.

**अंबरसूत कातणाऱ्यांचे शिक्षण**—या शिक्षणाविषयी जास्त माहिती संचालक, केंद्रीय अंबर चरखा शिक्षा विभाग, तुलसीभवन पंचवटी, नासिक यांच्याकडे मिळू शकते. या शिक्षणासाठी देशात ठिकठिकाणी परिश्रमालये स्थापन केली आहेत. परिश्रमालयामध्ये हा शिक्षणक्रम ३ महिन्यांचा असतो. प्रत्येक परिश्रमालयात ५० अंबरचरखे असून प्रत्येक चरख्यावर दोन माणसे शिक्षण घेतात. अशा प्रकाराने दर तीन महिन्यांना १०० माणसे तयार होतात. या शिक्षणासाठी प्रवेश मिळण्यापूर्वी विद्यार्थ्याला दोन अटी मान्य कराव्या लागतात—( १ ) शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर अंबरचरखा खरेदी करीन. चरख्याची किंमत एकाच हप्त्याने देता न आल्यास ती हप्त्याहप्त्याने फेडीन. ( २ ) दर वर्षी कमीत कमी १५०० गुंडी सूत कातीन.

(ब) सरंजाम कार्यालय—अंबर चरखा योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आठ लक्ष अंबर चरखे तयार करावे लागतील व त्यासाठी सरंजाम कार्यालये स्थापन करण्यात येत आहेत. ही कार्यालये औद्योगिक सहकारी संस्था किंवा आयोगाने प्रमाणित केलेल्या पंजीबद्ध संस्था सुरू करू शकतात. याकरिता पुढीलप्रमाणे आर्थिक मदत मिळू शकते :—

(१) आवर्ती अनुदान—दरमहा ३५० रु. प्रमाणे १ वर्षाचा तंत्रज्ञाचा पगार ४२०० रु. अनुभवी खादी कार्यकर्त्यांमधून तंत्रज्ञाची निवड केल्यास या नेमणुकीस आयोगाची पूर्व संमती घ्यावी लागते.

(२) अनावर्ती अनुदान—अनावर्ती खर्चाकरिता पुढीलप्रमाणे अनुदान मिळू शकते. गोडाऊन दहा हजार रुपये. ड्रिलिंग मशिन व मिलिंग अटॅचमेंट अडीचशे रुपये. वूड वार्किंग लेथ ५०० रुपये. सर्क्यूलर सॉ ६०० रुपये. एमरी स्टँड ६०० रुपये. सुतारी अवजारे फर्निचर वगैरे ८०० रुपये. एकुण पंधरा हजार रुपये. कर्ज—दरवर्षी जितके चरखे तयार करण्याचे उद्दिष्ट असेल तितक्या चरख्यांच्या किंमतीच्या एवढी रक्कम खेळत्या भांडवलाकरिता कर्ज म्हणून देण्यात येते.

मोठ्या सरंजाम कार्यालयाशिवाय १५ ते २० चरख्यांचे उत्पादन होणारे लहान सरंजाम कार्यालय सुद्धा सुरू करता येते. या लहान कार्यालयातर्फे खेड्यातील चरखे दुरुस्त करणे, त्यांना सुटे भाग पुरविणे इत्यादि कामे केली जातात. साधारणतः ३०० चरख्यांकरिता एक लहान सरंजाम कार्यालय किंवा दुरुस्तीकेंद्र राहील व अशा केंद्रांस २ ते ३ हजार रुपये अनुदान मिळू शकेल.

परिश्रमालय :— मान्यता दिलेल्या संस्थांना परिश्रमालय चालविण्यासाठी ६७०० रुपयांची मदत मिळू शकते. त्यात ५० अंबर चरख्यांसाठी ६००० रुपये; सुटे भाग ३५० रु; सुतारी अवजारे २०० रु. व फर्निचर १५० रु. अशी वाटणी असते.

## कर्ज

(१) विद्यार्थ्यांचे सूतकताईचे शिक्षण पूर्ण झाल्यावर चरखे हायर परचेस पद्धतीवर विकण्याकरिता ६००० रु. कर्ज.

(२) कापूस विकत घेऊन त्याचा साठा करण्याकरिता कर्ज देण्यात येते. संस्थेने उत्पादनाचे ठरविलेल्या उद्दिष्टावर या कर्जाची रक्कम अवलंबून असते. या कर्जास व्याज नसून ते एका वर्षात परत करावे लागते.

( ३ ) खेळत्या भांडवलाकरिता—सूत कातणाऱ्याकडून सूत विकत घेऊन त्याचा साठा करणे व त्यापासून कापड विणून घेऊन त्याची विक्री करणे, ह्याकरिता संस्थांना दर चरख्यामागे १०० रु. याप्रमाणे कर्ज देण्यात येते. हे कर्ज बिनव्याजी असून ते १० वर्षांत फेडावयाचे असते.

( ४ ) अंबर चरखे चालविणाऱ्यांना तांत्रिक मदत देण्यास संस्थेने सुपरवायझर्स नेमल्यास सुपरवायझर्सचा ६ महिन्यांचा पगार दरमहा कमीत कमी ५० व जास्तीत जास्त ७५ रु. या दराने मिळू शकतो. तसेच प्रत्येक सुपरवायझरकरिता अवजारे विकत घेण्यास ५० रु. देण्यात येतात. प्रत्येक सुपरवायझरने ५० ते १०० विद्यार्थ्यांना सूत कातण्यास मदत केली पाहिजे.

( ५ ) विक्री—अंबर खादीची विक्री होण्यास मदत व्हावी म्हणून पुढील मदत मिळू शकते :—

( १ ) गिऱ्हाइकांना शेकडा १८॥ रिबेट ( २ ) प्रमाणित खादी उत्पादन केंद्रांना त्यांच्या उत्पादनावर दर रुपयास ३ नये पैसे याप्रमाणे उत्पादन अनुदान. ज्या संस्था मागील वर्षापेक्षा पुढील वर्षी दर शेकडा १० अधिक उत्पादन काढतील त्यांना त्यांच्या उत्पादनावर दर रुपयास ३ नये पैसेप्रमाणे जादा उत्पादन अनुदान.

आजपर्यंत चालत आलेली खादी

या योजनेचे ( १ ) वैयक्तिक खादी स्वावलंबन, ( २ ) प्रादेशिक खादी स्वावलंबन व ( ३ ) कमर्शिअल खादी—असे तीन भाग पडतात.

( १ ) **वैयक्तिक खादी स्वावलंबन**—प्रत्येकाने त्याला स्वतःला लागणारे कापड त्याने स्वतः सूत कातून विणवून घ्यावे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. त्याकरिता विणकराच्या मजुरीच्या $\frac{3}{4}$ रक्कम किंवा दर चौरस वारास १२ नये पैसे प्रमाणे मदत मिळू शकते.

( २ ) **प्रादेशिक खादी स्वावलंबन**—काही विशिष्ट प्रदेशात कापडाचे स्वावलंबन करण्याचे दृष्टीने ही योजना आहे. कमिशनच्या इनटेन्सी व एरिया स्कीममध्ये या प्रदेशाचा अंतर्भाव करण्यात येतो.

( ३ ) **कमर्शियल खादी**—या योजनेचा उद्देश खादीचे उत्पादन वाढवून त्याची विक्री करणे असा आहे. या योजनेचे पुढीलप्रमाणे भाग पडतात :—

( अ ) व्यापारी पद्धतीवर खादीचे उत्पादन व विक्री करण्याकरिता कार्यकर्त्यांना प्रशिक्षण.

(ब) प्रमाणित संस्थांच्या उत्पन्नात खंड पडू नये म्हणून त्यांनी केलेले उत्पादन कमिशन आपल्या जवळ ठेवते व ह्या मालाच्या किंमतीच्या शेकडा ६२ रक्कम संस्थांना देण्यात येते. हा माल संस्थांना जसजसा लागेल तसतसा त्या मालाची किंमत घेऊन परत करण्यात येतो.

(क) प्रमाणित संस्थांना कच्च्या मालाचा पुरवठा करण्याकरिता कच्च्या मालाची खरेदी करून साठा ठेवणे.

(ड) सुधारलेली अवजारे कार्यकर्त्यांना अर्ध्या किंमतीत पुरविणे. अंबर खादीप्रमाणेच या खादीवर विक्री रिबेट व उत्पादन मदत देण्यात येते.

प्रमाणित खादीच्या विक्रीकरिता खादी भांडारांना पुढीलप्रमाणे मदत देण्यात येते.

| भांडाराचा प्रकार | फर्निचरकरिता अनुदान | आवर्ती खर्चाकरिता अनुदान |
|---|---|---|
| (अ) दरसाल तीस हजार रुपायांपेक्षा कमी विक्री असणारे भांडार. | फर्निचरच्या किंमतीच्या ७५ टक्के. जास्तीत जास्त १००० रुपये. | झालेल्या विक्रीच्या १० टक्के. जास्तीत जास्त २५०० रुपये. |
| (ब) दरसाल तीस हजार ते १ लक्ष ३० हजार रुपयेपर्यंत विक्री असणारे भांडार. | फर्निचरच्या किंमतीच्या ७५ टक्के. जास्तीत जास्त ५००० रुपये. | झालेल्या विक्रीच्या ६। टक्के. जास्तीत जास्त ५००० रुपये. |
| (क) दरसाल १॥ लाख ते ४ लाखपर्यंत विक्री असणारे भांडार. | फर्निचरच्या किंमतीच्या ७५ टक्के. जास्तीत जास्त १५ हजार रुपये. | झालेल्या विक्रीच्या ४॥ टक्के. जास्तीत जास्त १० हजार रुपये. |

## आगपेट्या तयार करणे

प्रत्येक दिवशी जास्तीत जास्त २५ ग्रोस आगपेट्या तयार होतील असे 'ड' क्लास लहान कारखाने काढण्याकरिता मदत देण्यात येते. या कारखान्यात साधारणपणे ४० लोकांना काम मिळू शकते. यासाठी कमिशनकडून पुढील मदत मिळते—

(अ) अनुदान — (१) फॅक्टरीची इमारत बांधण्याकरिता १५०० रु. (२) यंत्र व अवजारे घेण्याकरिता किंमतीच्या ७५ टक्के. जास्तीत जास्त २१०० रुपये.

(ब) कर्ज — (१) फॅक्टरीची इमारत बांधण्याकरिता ३२०० रु. (२) यंत्र व अवजारे घेण्याकरिता किंमतीच्या २५ टक्के. जास्तीत जास्त ७०० रु.

(क) खेळत्या भांडवलाकरिता ३२०० रुपये.

वरील १ व २ हे कर्ज बिनव्याजी असून ते ५ वर्षांत फेडले पाहिजे. खेळत्या भांडवलासाठी देण्यांत येणारे कर्ज ३ वर्षांत फेडावयाचे असून त्यावर पहिले वर्षी व्याज नाही. नंतर दरसाल दरशेकडा ३ प्रमाणे व्याज राहील.

प्रशिक्षण — पश्चिम बंगालमध्ये खादी प्रतिस्थान, सोदेपूर या ठिकाणी या उद्योगासंबंधी शिक्षण देण्याची सोय आहे. हा कोर्स ४ महिन्यांचा असून मॅट्रीक पास विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांना दरमहा ६० रुपये व इतरांना ४० रु. शिष्यवृत्ती देण्यात येते. याशिवाय तिसऱ्या वर्गाचा रेल्वेप्रवास खर्च-जास्तीत जास्त ६५ रु. मिळतो.

विक्री — विक्रीकरिता दुकाने काढण्यास सहकारी संस्था किंवा इतर रजिस्टर्ड संस्थांना खालील मदत मिळते—

मदत — दुकानखर्चाकरिता एक वर्ष जास्तीत जास्त ३००० रु.

कर्ज — दुकानात दरवर्षी किती विक्री होईल त्याप्रमाणे खेळत्या भांडवलाकरिता कर्ज.

या उद्योगासंबंधी जास्त माहिती ऑर्गनायझर कॉटेज मॅच इंडस्ट्रीज, खादी प्रतिस्थान, २४ परगणे, सोदेपूर पश्चिम बंगाल ह्याकडून मिळेल.

## कुंभारकाम

या उद्योगाच्या विकासाकरिता पुढील मदत मिळू शकते—

(१) कॉमन-वर्कशेड — ज्या कुंभारांना घरी काम करण्यास पुरेशी जागा नसते अशा कुंभारांनी एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन केल्यास त्यांना सहकारी संस्थेमार्फत एक शेड बांधता येईल. या शेडचे क्षेत्रफळ साधारणपणे ४५०० चौ. फूट राहील व त्यात सुमारे १० कुंभारांच्या कुटुंबांना काम करता येईल. ह्या शेडच्या खर्चासाठी ९००० रुपये मिळू शकतात. त्यांपैकी निम्मी मदत व निम्मे कर्ज म्हणून मिळू शकते. कर्ज बिनव्याजी असून ते पाच वर्षांत फेडावयाचे असते.

(२) खरेदी व विक्रीकरिता कर्ज :—कुंभारकामाची खरेदीविक्री करण्यासाठी ५००० रु.पर्यंत कर्ज औद्योगिक सहकारी संस्था किंवा इतर सहकारी संस्था यांना मिळू शकते. या कर्जाला पहिल्या वर्षी व्याज नसते. पुढे द. सा.द. शे. ३ प्रमाणे व्याज द्यावे लागते. हे कर्ज ३ वर्षांत फेडावे लागते.

(३) साधनसामुग्रीचा पुरवठा — सहकारी संस्थांमार्फत अगर इतर पंजीबद्ध संस्थामार्फत कुंभारकामाची साधने ½ किंमतीमध्ये कुंभारांना मिळू शकतात.

(४) भट्टीवर शेड बांधण्याकरिता मदत—कुंभाराच्या भट्टीवर शेड बांधण्याकरिता प्रत्येक शेडमागे १०० रु. अनुदान मिळू शकते.

(५) शेअर भांडवलाकरिता अनुदान—कुंभाराच्या सहकारी संस्था स्थापन व्हाव्या म्हणून प्रत्येक कुंभाराला शेअर–भांडवलाकरिता अनुदान जास्तीत जास्त ५० रु. पर्यंत मिळू शकते. कुंभार सभासदांनी कमीत कमी ५ रु. शेअर-भांडवलाकरितां स्वतःजवळूनच खर्च केले पाहिजेत.

(६) विक्रीकरिता मदत—कुंभारकामात तयार झालेल्या वस्तूंची विक्री करणाऱ्या संस्थांना विक्रीकरिता पुढील मदत मिळू शकते.

१. वार्षिक विक्री २ ते ५ हजार रुपयेपर्यंत असेल तर झालेल्या विक्रीच्या २० टक्के अनुदान.

२. वार्षिक विक्री ५ ते १० हजार रुपये असेल तर झालेल्या विक्रीच्या १५ टक्के अनुदान.

३. वार्षिक विक्री १० हजार रु. च्यावर असेल तर झालेल्या विक्रीच्या १० टक्के अनुदान. मात्र कोणत्याही संस्थेला दरवर्षी ३ हजार रु. पेक्षा जास्त अनुदान मिळणार नाही. तसेच विटा व छपराची कौले यांच्या विक्रीकरिता ही मदत मिळणार नाही.

प्रशिक्षण—कुंभारकामाच्या प्रशिक्षणाची सोय पुढील ठिकाणी आहे—

(१) ग्रामोद्योग संघ, पोस्ट भद्रावती, जिल्हा चांदा

(२) व्हिलेज पॉटरीज सेंट्रल ट्रेनिंग कम् रिसर्च सेंटर, खानापूर, जिल्हा बेळगाव.

(३) खानापूर सेंटरमध्ये पॉटरी सुपरवायझर व मास्टर पॉटर याचा १० महिन्याचा कोर्स आहे. धंदेवाईक कुंभारांना शिक्षण देण्याचा कोर्स भद्रावती येथे असून तो ३ महिन्यांचा आहे. शिष्यवृत्ती दरमहा ४० रु. देण्यात येते. तसेच जाण्यायेण्याचा तिसऱ्या वर्गाचा रेल्वेचार्ज देण्यात येतो.

याशिवाय या शिक्षणाची माहिती ऑर्गनायझर व्हिलेज पॉटरी इंडस्ट्रीज,

ऑल इंडिया खादी अँड व्हिलेज इंडस्ट्रीज कमिशन, पोस्ट बॉक्स नं.४८२ मुंबई, यांच्याकडे मिळू शकेल.

## अखाद्य तेल व साबण उद्योग

निंबोळ्या, टोळी ( Mahua Seeds), करंजी इत्यादींपासून तेल निघते. ह्या तेलाचा उपयोग खाण्याकरिता होत नाही. तेव्हा अशा अखाद्य तेलबियांपासून तेल काढणे व ह्या तेलापासून साबण तयार करणे ह्या गोष्टी ह्या योजनेत समाविष्ट होतात. हा उद्योग स्थानिक परिस्थितीप्रमाणे लहानमोठया प्रमाणावर करता यावा म्हणून उत्पादन-केंद्रांचे 'अ', 'ब' व 'क' असे वर्ग पाडण्यात आले आहेत.

'अ' वर्ग उत्पादन-केंद्र:—ह्या केंद्रात ८ बैलघाण्याद्वारे अखाद्य तेलाचे उत्पादन करण्यात येते व ह्या तेलापासून दरसाल ३० टन साबण तयार करण्यात येतो. ह्या केंद्राकरिता खालील सहायता मिळते.

| अ. नं. | | अनुदान | कर्ज | एकंदर |
|---|---|---|---|---|
| १ | अनावर्त खर्च :-- | | | |
| | (अ) तेलघाणी विभाग | १२,००० रु. | १२,००० रु. | २४,००० रु. |
| | (ब) साबण विभाग | ४,५०० रु. | ४,५०० रु. | ९००० रु. |
| २ | खेळते भांडवल | -- | २०,००० रु. | २०,००० रु. |
| ३ | केमिस्टचा पगार १५० रु. महिना | १८०० रु. | — | १८०० रु. |
| | | १८,३०० रु. | ३६,५०० रु. | ५४,८०० रु. |

'ब' वर्ग उत्पादन-केंद्र :—ह्यांत ४ बैलघाण्यांद्वारे तेल काढण्यात येऊन १५ टन साबण तयार करण्यात येतो. ह्या केंद्राकरिता खालील सहायता मिळते.

| अ. नं. | | अनुदान | कर्ज | एकंदर |
|---|---|---|---|---|
| १ | अनावर्त खर्च :-- | | | |
| | (अ) तेलघाणी विभाग | ३००० रु | ३००० रु. | ६००० रु. |
| | (ब) साबण विभाग | २२५० रु. | २२५० रु. | ४५०० रु. |
| २ | खेळते भांडवल | --- | १०,००० रु | १०,००० रु. |
| ३ | केमिस्टचा पगार १०० रु. महिना | १२०० रु. | — | १२०० रु. |
| | | ६४५० रु. | १५२५० रु. | २१७०० रु. |

'क' वर्ग उत्पादन-केंद्र :—ह्यात २ तेलघाण्या असून वार्षिक ३ टन साबण तयार करता येतो. ह्याकरिता खालील सहायता मिळते—

| अ. नं. | अनुदान | कर्ज | एकंदर |
|---|---|---|---|
| १ अनावर्त खर्च :— | | | |
| (अ) तेलघाणी विभाग | ३००० रु. | ३००० रु. | ६००० रु. |
| (ब) साबण विभाग | २२५० ,, | २२५० ,, | ४५०० ,, |
| २ खेळते भांडवल | — | ५००० ,, | ५००० ,, |
| ३ केमिस्टचा पगार ७५ रु. महिना | ९०० ,, | — | ९०० ,, |
| | ६२५० रु. | १०२५० रु. | १६४०० रु. |

वरील अनावर्त खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे—

(१) तेलघाणी विभाग:—

| | |
|---|---|
| शेड व गोडाऊन | —३००० रुपये |
| २ घाण्या | — ६०० रुपये |
| १ चक्की | — ६०० रुपये |
| ३ बैल | —१२०० रुपये |
| इतर सामुग्री | — ६०० रुपये |
| एकूण | ६००० रुपये |

(२) साबण विभाग:—

| | |
|---|---|
| शेड | —२००० रुपये |
| विहीर | — १००० रुपये |
| यंत्रसामुग्री | —१२५० रुपये |
| किरकोळ | — २५० रुपये |
| | ४५०० रुपये |

वरील मदत ही औद्योगिक सहकारी संस्था किंवा इतर पंजीबद्ध संस्थांना मिळू शकते. शाळांमधून साबण उत्पादनाची लहान केंद्रे काढण्याकरिता शाळांना ५०० रुपये अनुदान मिळू शकते.

**प्रशिक्षण:**— ह्या उद्योगाच्या शिक्षणाची सोय मुंबई राज्यात खालील ठिकाणी आहे—

( १ ) कोरा ग्रामोद्योग केंद्र, बोरीवली, मुंबई.

( २ ) सत्य निकेतन आश्रम, राजूर, जि. अहमदनगर

( ३ ) गांधी ग्रामोद्योग मंदिर, अमरावती.

पदवी परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना ६० रुपये महिना व इतरांना ४० रु. महिना शिष्यवृत्ती मिळते. शिवाय जाण्यायेण्याचा तिसऱ्या वर्गाचा आगगाडीचा खर्च मिळतो. शिक्षणक्रम ३ महिन्यांचा आहे.

ह्या उद्योगाची जास्त सविस्तर माहिती ऑर्गनायझर, नॉन् एडिबल ऑईल ॲण्ड सोप इन्डस्ट्री, खादी ॲण्ड व्हिलेज इन्डस्ट्रीज कमिशन, पोस्ट बॉक्स नं. ४८२, मुंबई १ यांजकडून मिळू शकेल.

## ग्रामीण चर्मोद्योग

चर्मोद्योगाचे ३ भाग पडतात—(१) मेलेल्या पशूपासून चामडे, चरबी, हाडांचे खत इत्यादि तयार करणे, ( २ ) चामडे पकविणे व ( ३ ) पकविलेल्या चामड्यापासून पादत्राण व इतर चामड्याच्या वस्तू तयार करणे. ह्यापैकी ( १ ) व ( २ ) करिता खादी व ग्रामोद्योग कमिशनकडून सहाय्य मिळते.

( १ ) मृतपशुनिकास केंद्रे :—ज्या गावी आसपासच्या ५ मैलांच्या टापूतून दरवर्षी २५० ते ३०० मेलेली जनावरे मिळू शकतील अशा ठिकाणी हे केंद्रे चालू शकते. ह्यामध्ये मेलेली जनावरे योग्य रीतीने फाडण्यात येऊन ह्यापासून कातडे, चरबी, मासाचे खत, हाडाचे खत इत्यादि तयार करतात. एका चांगल्या जनावरापासून साधारणतः ४० ते ५० रु. फायदा होऊ शकतो. ह्या केंद्राकरिता खालील मदत मिळते.

### ( १ ) अनुदान

शेड, बोनडायजेस्टर, बैलजोडी व गाडी इत्यादि अनावर्ती खर्चाचा ½ भाग–३००० रु.

### ( २ ) कर्ज

( १ ) शेड, बोनडायजेस्टर इत्यादि अनावर्ती खर्चाचा ½ भाग—३००० रु.

( २ ) फ्लेअर्सचा दरमहा ६० रु. प्रमाणे ६ महिन्यांचा पगार—३६० रु.

( ३ ) बोनक्रशिंग युनिट्स—हाडांना बोनडायजेस्टरमध्ये शिजवून नंतर त्याची भुकटी करण्यात येते. ह्याकरिता खालील मदत मिळते—

१. कर्जः—खेळते भांडवल व अनावर्ती खर्चाचा ½ हिस्सा—२१५० रुपये.

२. अनुदान :—अनावर्ती खर्चाचा ½ हिस्सा—११५० रुपये.

( ३ ) व्हिलेज मॉडेल टॅनरी :—खेड्यात सुधारलेल्या पद्धतीने चामडे पकविण्याचा उपयोग करता यावा ह्याकरिता ग्रामीण आदर्श चर्मालये ह्या योजनांतर्गत सुरू करता येतात. ह्याकरिता खालील सहाय्य मिळते—

१. अनुदान :—जमीन, शेड, टॅनिंग पिट्स इत्यादींवरील खर्चाचा ¾ हिस्सा—जास्तीत जास्त ८२५० रु.

२. कर्जः—( अ ) जमीन, शेड, टॅनिंग पिट्स इत्यादींवरील खर्चाचा ¼ हिस्सा—जास्तीत जास्त २७५० रु.

(ब) खेळते भांडवल——जास्तीत जास्त ७००० रु.

(४) चामडे पकविण्याची टाकी बांधण्याकरिता मदत :——(अ) नवीन टाकी बांधण्याकरिता दर टाक्यास जास्तीत जास्त ५० रु. प्रमाणें अनुदान.

(ब) जुनी टाकी दुरुस्त करण्याकरिता दर टाक्यास जास्तीत जास्त ५० रु. प्रमाणें अनुदान.

(५) सरस (Glue) तयार करण्याची केंद्रे :—— जनावरांचे मांस, हाडे इत्यादींपासून सरस तयार करण्यात येतो. ही केंद्रे काढण्याकरिता खालील मदत मिळते–

१. अनुदान :— जमीन, शेड, अवजारे ह्यांच्या किमतीचा $\frac{3}{4}$ हिस्सा–जास्तीत जास्त ३००० रु.

२. कर्ज :——(अ) खेळत्या भांडवलाकरिता कर्ज २००० रु.

(ब) जमीन, शेड, अवजारे ह्यांच्या किमतीचा $\frac{1}{4}$ हिस्सा–जास्तीत जास्त रुपये १०००.

(६) विक्री दुकान :— पकविलेले चामडे तसेच चामड्याच्या इतर वस्तू यांच्या विक्रिकरिता दुकाने चालविण्यास खालील मदत मिळते–

(अ) अनुदान :—नोकराचा पगार, भाडे इत्यादींकरिता ४००० रु.

(ब) कर्ज :——खेळत्या भांडवलाकरिता १५००० रु.

## प्रशिक्षण

(अ) कातडी कमावणे :—— ह्या प्रशिक्षणाची सोय कोरा ग्रामोद्योग केंद्र, मुंबई तसेच गोसेवा चर्मालय, नालवाडी येथे आहे. शिक्षणक्रम १ वर्षाचा असून ४० रु. महिन्याप्रमाणे शिष्यवृत्ती मिळते. विद्यार्थी मॅट्रिकची परिक्षा पास झालेला असावा. हा धंदा पिढीजात करणाऱ्या जातीतील विद्यार्थी असल्यास शिक्षणाची ही अट सैल करता येईल.

(ब) मृतपशू विकास शिक्षण :—— हे कोरा ग्रामोद्योग केंद्र, मुंबई येथे देण्यात येते. शिक्षणक्रम ४ महिन्यांचा असून विद्यार्थ्यांना ४० रु. महिना शिष्यवृत्ती देण्यात येते. तसेच रेल्वेचा तिसऱ्या वर्गाचा जाण्यायेण्याचा प्रवास-खर्च देण्यात येतो.

या उद्योगासंबंधी जास्त माहिती टेक्निकल ऑफिसर (लेदर), ऑल इंडिया खादी ॲण्ड व्हिलेज इण्डस्ट्रीज कमिशन, पोस्ट बॉक्स नं. ४८२ फोर्ट मुंबई, यांच्याकडून मिळू शकेल.

# ग्रामीण तेल उद्योग

बैलाने चालणाऱ्या तेलघाणीद्वारे खाद्य तेलाचे उत्पादन करण्याची ही योजना आहे. या योजनेद्वारे सुधारलेल्या घाण्या बसविण्यांत येऊन त्यातून सुधारलेल्या पद्धतीने उत्पादन होईल. तसेच जुन्या घाण्यांना दुरुस्त करून जास्त कार्यक्षम करण्याचाहि उद्देश या योजनेचा आहे. ह्या योजनेच्या अन्तर्गत खालील आर्थिक सहाय्य मिळते.

(१) नवीन घाणी विकत घेण्याकरिता १५० रु. चे कर्ज व १५० रु. चे अनुदान. कर्ज हे विनव्याजी असून ५ वर्षांनी त्याची फेड करावयाची असते.

(२) आदर्श घाणी केंद्र:–हा उद्योग लाभदायक आहे ह्याची खात्री पटविण्याकरितां ठिकठिकाणी घाणी केंद्र स्थापन करण्याकरितां खालील आर्थिक सहाय्यता औद्योगिक सहकारी संस्था किंवा इतर पंजीबद्ध संस्थाना मिळते.

| | | |
|---|---|---|
| (अ) अनुदान:— | इमारतीकरिता | ५००० रुपये |
| | घाणी व इतर साधने | १५०० ,, |
| | तेल्यांचा पगार व इतर किरकोळ खर्च | ४००० ,, |
| | एकूण अनुदान — | १०,५०० रु. |

(ब) कर्ज:—खेळत्या भांडवलाकरिता २००० रु. हे कर्ज पाहिले वर्षी विनव्याजी असून पुढील दोन वर्षी दरसाल दर शेकडा ३ या व्याजाने असते. याची फेड ३ वर्षांत करावी लागते.

(३) घाणी तयार करण्याचे केंद्र:—सुधारलेल्या घाण्या तयार करण्याचे केंद्र चालविण्याकरिता ७९५० रु. चे अनुदान व ९२५० रु. चे कर्ज मिळते. तसेच ही केंद्रे जर लहान प्रमाणावर चालवावयाची असतील तर १७५० रु. चे अनुदान व ४७५० रु. कर्ज मिळते.

(४) घाणी तेल उत्पादक संस्थांचे शेअर्स घेण्याकरिता कर्ज:— तेल्यांना सहकारी संस्थांचे शेअर विकत घेण्याकरिता कर्ज देण्यात येते. जर शेअरची किंमत १०० रु. असेल तर त्याला स्वत:जवळून १२॥ रु. द्यावे लागतात व ८७॥ रु. त्याला कर्ज म्हणून मिळते. हे कर्ज बिनव्याजी असून दोन वर्षांत परत करावे लागते.

(५) तेलबियांचा साठा करण्याकरिता कर्ज :–घाणी उद्योग करणाऱ्या सहकारी संस्थांना योग्य वेळी तेलबियांचा साठा करता यावा म्हणून त्यांच्या आवश्यकतेनुसार कर्ज देण्यात येते. हे कर्ज तीन वर्षांत परत करावयाचे

असते. पहिले वर्षी हे बिनव्याजी असून दुसऱ्या वर्षात दरसाल दर शेकडा ३ रु. व्याज द्यावे लागते.

( ६ ) घाणीकरिता शेड बांधणे--घाणीकरिता शेड बांधण्याकरिता २५० रु. चे अनुदान व २५० रु.चे कर्ज देण्यात येते.

( ७ ) तेल विक्रीवर रिबेट:—घाणीतून निघालेले तेल व मिलमध्ये तयार झालेले तेल ह्यांच्या विक्रीच्या किंमतीत जास्त तफावत असू नये म्हणून घाणी तेलाच्या विक्रीवर दरमणास २॥ रु. रिबेट देण्यात येतो. ह्या रिबेट-संबंधी खालील अटी आहेत—

( अ ) कमिशनने रजिस्टर्ड केलेल्या घाणीच्या उत्पादनावरच रिबेट देता येईल.

( ब ) तेलाची विक्री किरकोळ झाली पाहिजे व ती रजिस्टर्ड को-ऑपरेटिव्ह सोसायटी किंवा कमिशनने प्रमाणित अशा रजिस्टर्ड संस्थांमार्फत व्हावयास पाहिजे.

प्रशिक्षण:-या उद्योगाच्या प्रशिक्षणाचे खालील तीन शिक्षणक्रम आहेत—

१. मिस्त्री कोर्स:-हा तीन महिन्यांचा कोर्स असून सुतारांना घाणी तयार करण्याचे शिक्षण देण्यात येते. शिष्यवृत्ती ७५ रु. महिन्याप्रमाणे देण्यात येते.

२. इन्स्ट्रक्टर कोर्स :-हा सहा महिन्यांचा कोर्स असून मॅट्रीक पास झालेल्याला यात प्रवेश मिळतो. शिष्यवृत्ती ५० रु. महिना देण्यात येते.

३. तेली कोर्स—हा एक महिन्याचा शिक्षणक्रम असून ह्यात तेल्यांना सुधारलेल्या पद्धतीच्या घाण्या चालविण्याचे शिक्षण देण्यात येत. शिष्यवृत्ती ३० रु. महिन्याप्रमाणे देण्यात येते. या शिक्षणाची सोय मॉडेल घाणी सेंटर्स-मध्ये करण्यात येते.

वरील १ व २ शिक्षणक्रम खालील ठिकाणी शिकविण्यात येतात—

( १ ) व्हिलेज ऑईल ट्रेनिंग सेंटर, गांधी आश्रम, मिरज, उत्तरप्रदेश.

( २ ) व्हिलेज ऑईल ट्रेनिंग सेंटर, गांधी निकेतन आश्रम, कलुपति. जिल्हा–मदुरा, मद्रास स्टेट.

( ३ ) बिहार ग्रामोद्योग समिती, सर्वोदय ग्राम, मुझफरपूर, बिहार.

ह्या धंद्याविषयी जास्त माहिती ऑर्गनायझर व्हिलेज ऑईल इन्डस्ट्री, ऑल इंडिया खादी आणि व्हिलेज इंडस्ट्रीज कमिशन, पोस्ट बॉक्स नं ४८२, मुंबई ह्याजकडून मिळू शकेल.

## हात-कागद उद्योग

ह्या धंद्याच्या विकासयोजनेत खालील ४ प्रकारच्या उत्पादन-केंद्रास मदत देण्याची सोय आहे.

( १ ) मोठे उत्पादन-केंद्रः–(२५ टन हायग्रेड कागदाचे वार्षिक उत्पादन)

( २ ) मध्यम उत्पादन-केंद्र :—( १० ते १२ टन हायग्रेड कागदाचे वार्षिक उत्पादन )

( ३ ) लहान उत्पादन-केंद्र :—( अ ) उत्पादन-केंद्र – ५ टन ब्लॉटिंग पेपर किंवा १० टन सर्वसाधारण कागदाचे वार्षिक उत्पादन. ( ब ) प्रशिक्षण तथा उत्पादन-केंद्र. ( क ) घरगुती केंद्र ( व्यक्तींनी चालवावयाची–वार्षिक उत्पादन ३ टन )

( ४ ) शाळांतून चालविण्यात येणारे केंद्र :—वरील केंद्रास कमिशन-कडून खालीलप्रमाणे सहाय्य मिळते—

( अ ) मोठे उत्पादन-केंद्रः—जेथे हा उद्योग वंशपरंपरागत करणारे कारागीर जास्त प्रमाणात आहेत किंवा सहकारी संस्थामार्फत उत्पादन करावयाचे आहे तेथे अशा प्रकारचे केंद्र चालू शकते. ह्या केंद्रात उच्च प्रतीचा कागद, ड्रॉइंग, बॉंड, लेजर फिल्टर पेपर इत्यादि कागद तयार करण्याचे उद्दिष्ट राहील. साधारणतः १ वर्षात १,४०,००० रु. किंमतीचा २५ टन कागद तयार होऊन ६० ते १०० लोकांना काम मिळू शकेल. हे केंद्र स्थापन करण्यास ६०,००० रु. ची यंत्रणासुग्री लागते. ह्याकरिता ३०,००० रु. अनुदान व ३०००० रु. ५ वर्षांत फेडावयाचे बिनव्याजी कर्ज म्हणून मिळते.

( ब ) मध्यम उत्पादन-केंद्रः—ज्या गावात विद्युत् किंवा यांत्रिक शक्ती उपलब्ध असेल तेथे हे केंद्र सुरू करता येते. ह्यात साधारण दर्जाचा कागद तसेच उच्च प्रतीचा कागद हे दोन्हीही तयार होतात. ह्याचे वार्षिक उत्पादन १० ते १२ टन उच्च प्रतीचा कागद किंवा ३० टन साधारण कागद असून २५ ते ५० माणसांना दर पाळीला काम मिळू शकते. ह्या केंद्रास ३०,००० रु. ची यंत्रसामुग्री लागते. त्यापैकी अर्धी रक्कम अनुदानाच्या रूपाने व अर्धी वरील शर्तींवर कर्ज म्हणून मिळते.

( ३ ) लहान केंद्र :—( अ ) उत्पादन-केंद्र :–जेथे मोठे किंवा मध्यम केंद्र काढण्यास सोयी नाहीत आणि जेथे कच्चा माल स्थानिक मिळतो तेथे हे केंद्र काढता येईल. हे केंद्र वार्षिक ५ टन ब्लॉटिंग पेपर किंवा १० टन कार्डबोर्ड किंवा साधारण दर्जाच्या कागदाचे उत्पादन करून १५ माणसांना काम देऊ

शकेल, अशा प्रकारचे केंद्र कारागृहात काढता येईल. ह्याला १५·००० रु. ची यंत्रसामुग्री लागते. त्यांपैकी $\frac{1}{2}$ रक्कम अनुदान व $\frac{1}{2}$ रक्कम कर्ज म्हणून मिळते.

( ब ) प्रशिक्षण तथा उत्पादन-केंद्र :—ह्या केंद्राचा मुख्य उद्देश प्रशिक्षणाचा आहे. ह्याकरिता ७५०० रु. ची मदत ५० टक्के अनुदान व ५० टक्के कर्ज ह्या स्वरूपात मिळते.

(क) घरगुती उत्पादन-केंद्र:—अशा केंद्राद्वारे अगदी अल्प यंत्रसामुग्रीच्या द्वारे व घरातील लोकांच्या साह्याने किंवा थोडे मजूर लावून कागद-उत्पादन माणसाला आपले घरी करता येईल. ह्यात वार्षिक साधारणतः ३ टन कागद तयार होऊन ५ ते ७ माणसांना काम मिळेल. ह्याकरिताही वरीलप्रमाणे मदत मिळेल.

( ४ ) शाळांतून चालविण्यात येणारे केन्द्र:—कागद बनविणे हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आदर्श उद्योग आहे. रद्दी कागद ज्यापासून तयार करतात, तो शाळेत उपलब्ध असतो. तसेच तयार झालेला कागदही शाळांनाच लागतो. बुकबाइंडिंग, स्टेशनरी तयार करणे, लिफाफे तयार करणे, हे सुद्धा जोड-उद्योग म्हणून शिकविता येतात. ह्या केंद्राध १७००रु. लागतात. १३००रु.चे अनुदान कमिशनकडून मिळते. ह्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे—

रु. ४००—यंत्रसामुग्री करिता. रु. ८००—कॅलेंडरिंग मशीनकरिता.

रु. १००—शिक्षकाच्या प्रशिक्षणाकरिता. एकूण रु. १३००

वरील सर्व प्रकारच्या केंद्रांत नुकसान आल्यास दर टनास २५० प्रमाणे अनुदान मिळेल. तसेच खेळत्या भांडवलाकरिता वार्षिक उत्पादनाच्या किंमतीच्या $\frac{1}{5}$ रक्कम ३ वर्षांत परतफेडीच्या अटीवर कर्ज म्हणून मिळेल. हे पहिल्या वर्षी बिनव्याजी असून दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी दरसाल दर शेकडा ३ प्रमाणे व्याज द्यावे लागेल.

प्रशिक्षण :—ह्या उद्योगाकरिता खालील शिक्षणक्रम आहेत—

| अ. नं. | शिक्षण क्रमाचे नांव | अवधी | विद्यार्थ्यांची पात्रता | शिष्यवृत्ती | संस्थेचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑर्गनायझर | १ वर्ष | केमिस्ट्री आणि बॉटनी किंवा फिजिक्स हे विषय घेऊन बी. एस. सी. पास झालेला | ७५ रु. महिना | [१] हँडमेड पेपर रीसर्च सेंटर ॲग्रिकल्चर कॉलेज कम्पौंड पूना. |

| अ. नं. | शिक्षणक्रमाचे नाव | अवधी | विद्यार्थ्यांची पात्रता | शिष्यवृत्ती | संस्थेचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | [२] हँडमेड पेपर लि. आगलेवाडी जि. उत्तर–सातारा. |
| २ | ऑपरेटर | ६ महिने | मॅट्रिक पास फिजिक्स व केमिस्ट्री हे विषय घेतलेले जास्त पसंत | ४० रु. महिना | ,, |
| ३ | क्राफ्ट टीचर आणि इतर | २ महिने | शिक्षक व इतर शिक्षिकाकरिता ११०रु. २ म. करिता | ,, | ,, |

ह्या उद्योग संबंधी जास्त माहिती ऑर्गनायझर, हँडमेड पेपर इन्डस्ट्री, ऑल इंडिया खादी व व्हिलेज इंडस्ट्रीज कमिशन, पोस्ट बॉक्स न. ४८२ मुंबई १ ह्याकडून मिळेल.

## गूळ व खांडसरी उद्योग

सुधारलेल्या पद्धतीने उत्तम प्रतीचा गूळ खेड्यात तयार करणे, तसेच सेंट्रिफ्यूगल मशीनच्या साह्याने राबे पासून खांडसरी साखर तयार करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. ही योजना राज्यसरकारमार्फत कार्यान्वित केली जाते. सुधारलेले चरक, भट्ट्या, कढया यांचा प्रसार करणे, तसेच गुळाचा दर्जा सुधारण्याकरिता सुधारलेल्या पद्धतीने गूळ तयार करण्याचे शिक्षण देणे, ह्या गोष्टी प्रामुख्याने ह्या योजनेद्वारे ऊस पिकणाऱ्या क्षेत्रात केल्या जातात व ह्याकरिता निरनिराळी केंद्रे चालविली जाऊन त्यात हे शिक्षण देण्यात येते. तसेच गूळ तयार करणाऱ्यांच्या सहकारी संस्था स्थापन करून त्यांच्या मार्फत गुळाची विक्री, साठा, तसेच सुधारलेल्या यंत्राची विक्री करण्याकरिता आर्थिक सहाय्यता देण्यात येते.

प्रशिक्षण -- ह्या उद्योगाच्या सविस्तर शिक्षणाची सोय गूळ व खांडसरी ट्रेनिंग व रिफ्रेशर कोर्स, ऑल इंडिया खादी व व्हिलेज इंडस्ट्रीज कमिशन, ७।२०१ स्वरूपनगर, कानपूर येथे आहे. विद्यार्थी हा मॅट्रिक

पास झालेला व ऊस पिकविणारा शेतकरी असावा. शिक्षणक्रम ६ महिन्यांचा असून ग्रॅज्यूएट्सना ५० रु. महिना व इतरांना ४० रु. महिना शिष्यवृत्ती मिळते. तसेच जाण्यायेण्याचा तिसऱ्या वर्गाचा रेल्वेचा खर्च मिळतो.

ह्या उद्योगासंबंधी जास्त माहिती गूळ डेव्हलपमेंट ऑफिसर इन्डस्ट्रियल इंन्स्टिट्यूट बिल्डिंग, सदर नागपूर किंवा ऑर्गनायझर गूळ व खाडसारी इन्डस्ट्री, ऑल इंडिया खादी ॲण्ड व्हिलेज इंडस्ट्रीज कमिशन, ७।२०१ स्वरूपनगर, कानपूर ह्यांचेकडून मिळू शकेल.

## ताडगूळ उद्योग

ताडाच्या झाडापासून निघणाऱ्या रसापासून गूळ तयार करण्याची ही योजना आहे. हिच्या अंतर्गत वेगवेगळ्या प्रकारची प्रशिक्षण तथा उत्पादन-केंद्रे स्थापन करण्यास सहकारी संस्था किंवा इतर पंजीबद्ध संस्थांना खालील आर्थिक सहाय्यता मिळते—

| अ. नं. | केंद्राचे वर्गीकरण | अनुदान | कर्ज |
|---|---|---|---|
| १. | ट्रेनिंग युनिट | ८२०० रु. | –– |
| २. | प्रोपागंडा युनिट | ६९३० ,, | –– |
| ३. | प्रॉडक्शन स्पेशल युनिट | २२,२८० ,, | १८,५०० रु. |
| ४. | प्रॉडक्शन 'ए' युनिट | ६,२८० ,, | २५०० ,, |
| ५. | प्रॉडक्शन 'बी' युनिट | २,८६० ,, | १३०० ,, |
| ६. | पाम प्रॉडक्ट्स् युनिट | ८०० ,, | — |
| ७. | पाम प्लँटेशन युनिट | ८०० ,, | — |
| ८. | कॉलनायझेशन युनिट | १० ००० ,, | — |
| ९. | मॉडेलनीरा आणि शरबत 'ए' युनिट | ३८,३८५ ,, | १८,६२५ ,, |
| १०. | मॉडेलनीरा आणि शरबत 'बी' युनिट | २५,५४० ,, | १४,३०० ,, |
| ११. | मॉडेलनीरा आणि शरबत 'सी' युनिट | १७,५१० ,, | ११,८५० ,, |

वरील केंद्रासंबंधी सविस्तर माहिती पाम गूळ ॲडव्हायसर, खादी आणि व्हिलेज इंडस्ट्रीज कमिशन, डहाणू, जि. ठाणा, महाराष्ट्र राज्य ह्यांच्याकडून मिळू शकेल.

प्रशिक्षण :— ह्या उद्योगाचे प्रशिक्षण वर निर्देश केलेल्या प्रशिक्षण केंद्रात मिळते. शिक्षणक्रम ३ महिन्यांचा असून ४० रु. महिना शिष्यवृत्ती मिळते. तसेच ह्या उद्योगाच्या सर्वांगीण शिक्षणाची सोय भारतीय ताडगूळ

शिल्पभवन, डहाणू, जि. ठाणा येथे आहे. शिक्षणकाल ९ महिन्यांचा असून शिष्यवृत्ती ४० रु. महिना मिळते.

## हात कुटाईचा तांदूळ उद्योग

तांदळाच्या गिरण्यांत धानकुटाई न करता ती खेड्यात घरोघर चक्की व ढेणकीच्या द्वारे करण्याची ही योजना आहे. ह्यामुळे खेड्यातील लोकांना व विशेषतः स्त्रियांना वर्षातून १५० दिवस काम मिळून खाण्याकरिता जास्त जीवनसत्वे असलेला तांदूळ उपलब्ध होऊ शकेल. एक चक्की व दोन ढेणक्या असलेल्या उत्पादन युनिटाचा प्रसार करणे हे या योजनेचे मुख्य अंग आहे. ह्या एका युनिटपासून साधारणतः ६ माणसांना काम मिळून एका हंगामात ४३ टन धानापासून तांदूळ काढता येतो. एका चक्कीवर २ माणसे काम करतात व एका दिवसात ८ ते १० मण धानापासून बगड तयार करतात. तसेच एका ढेणकीद्वारे दररोज ४ ते ५ मण बगडीपासून तांदूळ तयार होऊ शकतो. तसेच तांदूळ सफाईकरिता उडवणीच्या पंख्याची फार मदत होते. ह्या उद्योगाकरिता खालील मदत मिळते--

अनुदान :—(१) दगडी चक्कीची $\frac{1}{2}$ किंमत—जास्तीत जास्त २० रु.

(२) उडवणीच्या पंख्याची $\frac{1}{2}$ किंमत—जास्तीत जास्त ६० रु.

(३) ढेणकीची $\frac{1}{2}$ किंमत—जास्तीत जास्त ५ रु.

(४) हातकुटाई केलेल्या दरमण धानामागे ३७ नव्या पैशांचे उत्पादन अनुदान.

कर्ज :—(१) चक्क्या व ढेणक्या तयार करून त्यांचा विकण्याकरिता साठा करणे.

(२) धानाचा साठा करणे.

वरील कर्ज ३ वर्षांत फेडावयाचे असते. पहिल्या वर्षी व्याज नसून पुढील दोन वर्षांकरिता द. सा. द. शे. ३ प्रमाणे व्याज द्यावे लागते. वरील मदत सहकारी संस्था किंवा इतर पंजीबद्ध संस्थामार्फत मिळते.

प्रशिक्षण :— ह्या उद्योगाचे प्रशिक्षण सेंट्रल ट्रेनिंग इन्स्टिटयूट नडियाद येथे मिळते. शिक्षणकाल २१ दिवसांचा असून ४० रु. शिष्यवृत्ती व तिसऱ्या वर्गाचा रेल्वेचा जाण्यायेण्याचा खर्च मिळतो. विद्यार्थी मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.

ह्या उद्योगासंबंधी जास्त माहिती ऑर्गनायझर हॅंड पाऊन्डिंग ऑफ राईस इंडस्ट्री, ऑल इंडिया खादी अ‍ॅण्ड व्हिलेज इन्डस्ट्रीज कमिशन, पटेल हॉल, नडियाद, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून मिळू शकेल.

## आटा चक्की उद्योग

ह्या योजनेच्या अंतर्गत खालील आर्थिक सहाय्य मिळू शकते–

अनुदान :–(१) सुधारलेल्या हातचक्कीचा $\frac{1}{2}$ किंमत–जास्तीत जास्त १० रु.

(२) जुन्या चक्क्यांना बॉलबेअरिंग लावण्याकरिता बेअरिंगची $\frac{1}{2}$ किंमत–जास्तीत जास्त ३ रु.

## मधमाशा पाळण्याचा उद्योग

मधमाशा पाळून मधाचे उत्पादन करण्याची ही योजना आहे. ह्या योजनेच्या अंतर्गत खालील आर्थिक मदत मिळते...

### (१) एरीया ऑफीस

(अ) साधनसामुग्री, मधमाशाचे पोळे व इतर साधनांकरिता १८०० रु. चे अनुदान. (ब) घरभाडे—२५ रु. महिना अनुदान. (क) किरकोळ खर्च — १० रु. महिना–अनुदान.

(२) सबस्टेशन–(अ) प्रत्येक मधमाशाच्या पोळ्याची $\frac{1}{2}$ किंमत–जास्तीत जास्त प्रत्येकी १० रु. अनुदान.

(ब) साधनसामुग्री — २०० रु. अनुदान. (क) घरभाडे – ५ रु. महिना अनुदान (ड) किरकोळ खर्च – ५ रु. महिना अनुदान.

### (३) मॉडेल एपीअरी

(अ) साधनसामुग्री – २००० रु. अनुदान. (ब) घरभाडे व किरकोळ खर्च २२ रु. महिना अनुदान.

(४) शाळांमधील मधमाशा पालन उद्योग :—मधमाशा पालनाच्या वर्गाकरिता प्रत्येक शाळेला ५०० रु. चे अनुदान.

(५) ब्रीडिंग स्टेशन :—साधनसामुग्रीकरिता ६५००रु. चे अनुदान.

(६) शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर एपीअरीज काढण्याकरिता फील्डमनच्या पगारासाठी दरमहा ५० रु. चे अनुदान.

(७) मधमाशा पालनाचा उद्योग करण्याकरिता सुशिक्षितांना साधन-सामुग्रीकरिता प्रत्येकी ५०० रु. चे अनुदान देण्यात येते. तसेच त्यांना ३ महिन्यांकरिता ह्या उद्योगाचे शिक्षण देण्यात येते व ह्याकरिता खालील सहायता मिळते.

(अ) ३० रु. महिनाप्रमाणे शिष्यवृत्ती. (ब) जाण्यायेण्याचा खर्च जास्तीत जास्त २५ रु. (क) शिक्षणफी १५ रु. महिना.

(८) कर्ज :—(१) ह्या उद्योगाचा विकास करण्याकरिता सहकारी संस्था किंवा इतर पंजीबद्ध संस्थांना खेळते भांडवल म्हणून कर्ज देण्यात येते. हे कर्ज ३ वर्षांत फेडावयाचे असून पहिल्या वर्षी बिनव्याजी व नंतरच्या २ वर्षांकरिता दरसाल द. शे. ३ प्रमाणे व्याजाने असते.

(९) प्रशिक्षण :—एपीअरिस्ट कोर्स व फील्डमन कोर्स असे प्रशिक्षणाचे दोन भाग आहेत.

## (अ) एपीअरिस्ट कोर्स

(१) शिक्षणकाल ६ महिने. (२) शैक्षणिक पात्रता :—इंटरसायन्स पास. (३) शिष्यवृत्ती :- ४० रु. महिना.

## (ब) फील्डमन कोर्स

(१) शिक्षणकाल ३ महिने. (२) शैक्षणिक पात्रता :—व्हर्न्याक्युलर पांचवी पास. (३) शिष्यवृत्ती :—३० रु. महिना.

जाण्यायेण्याचा खर्च जास्तीत जास्त २५ रु. हा प्रत्येक विद्यार्थ्यास मिळतो. ह्या शिक्षणाची सोय महाबळेश्वर येथील खादी आणि व्हिलेज इंडस्ट्रीज कमिशनचे केंद्रात आहे. ह्या उद्योगासंबंधी जास्त माहिती ऑर्गनायझर, बी कीपिंग इन्डस्ट्री, ऑल इंडिया खादी आणि व्हिलेज इन्डस्ट्रीज कमिशन, पो. बॉ. नं. ४८२ मुंबई यांच्याकडून मिळू शकेल.

## तंतू-उद्योग

केतकी, अंबाडी, ताग इत्यादि तंतूपासून दोर, गूळ व कापसाकरिता लागणारे पाट इत्यादि तयार करणे, तसेच मुंज गवतापासून चटया, पायदाने इत्यादि तयार करणे, हे उद्योग ह्या योजनेत येतात. ह्या योजनेची रुपरेखा खालीलप्रमाणे आहे.

(१) गुळाकरिता तसेच कापसाकरिता पाट तयार करणे :—ह्या पाटाकरिता लागणारी सुतळी तयार करण्याकरिता मुंबई व्हिलेज इंडस्ट्रीज बोर्डाने एक चरखा तयार केला आहे. ह्यावर सुतळी कातणे, तसेच पाट विणणे ह्याच्या शिक्षणाचा कोर्स ४ महिन्यांचा असून शिष्यवृत्ती ४० रु. महिना मिळते. जी संस्था हे प्रशिक्षण देण्याचे काम करण्यास तयार असेल त्या संस्थेला दर विद्यार्थ्यामागे ३० रु. महिना शिक्षणफी कमिशनकडून मिळते. ४ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना खेड्यात शिक्षक म्हणून पाठविण्यात येते व तेथे ते खेड्यातील लोकांना शिक्षण देतात. प्रत्येक शिक्षक ८ खेडी घेऊन ३ महिनेपर्यंत तेथे शिक्षण देतो. हे शिक्षण घेणारांना पहिल्या महिन्याला ८ आणे रोज, दुसऱ्या महिन्याला ६ आणे रोज व तिसऱ्या महिन्याला ४ आणे

रोज शिष्यवृत्ती मिळते. जे लोक अंबाडी, केतकी, बोरू इत्यादींची लागवड करतात, अशांनाच हे शिक्षण देण्यात येते. तीन महिन्यांनंतर हे लोक शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली आपआपल्या घरी हा व्यवसाय करतात.

(२) मुंज गवतापासून चटया इत्यादि तयार करणे :—सौदेपूर येथील खादी प्रतिस्थान ह्या संस्थेने बनविलेल्या चरख्यावर चटया करण्यास लागणारी गवताची दोरी बनविता येते. हे गवत हिंदुस्थानात सर्वत्र विपुल प्रमाणात होते. ह्या उद्योगाचा शिक्षणक्रम ३ महिन्यांचा असून १२ आणे रोज प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते. ह्या उद्योगाचे प्रशिक्षण तथा उत्पादन-केंद्र चालविण्यास १००० रु. चे अनुदान मिळते. तसेच विद्यार्थ्यांना ३० रु. महिना शिष्यवृत्ती, प्रत्येक विद्यार्थ्यामागे २५ रु. महिना शिक्षण-फी, व जाण्यायेण्याचा खर्च ह्याकरिता अनुदान मिळते.

(३) या योजनेच्या अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या केंद्रात तयार होणारे पाट विकत घेऊन त्यांची विक्री करण्याकरिता कर्ज देण्यात येते. हे कर्ज ३ वर्षांत फेडावयाचे असून ते पहिल्या दोन वर्षांत बिनव्याजी व तिसऱ्या वर्षी द. सा. द. शे. ३ ह्या व्याजाच्या दराने असते.

वरील सर्व मदत सहकारी संस्था किंवा इतर पंजीबद्ध संस्थांना मिळते. ह्या उद्योगासंबंधी जास्त माहिती ऑर्गनायझर, फायबर इंडस्ट्री, ऑल इंडिया खादी आणि व्हिलेज इंडस्ट्रीज कमिशन, पो. बॉ. नं. ४८२ मुंबई ह्यांच्याकडे मिळेल.

वरील माहितीवरून असे दिसून येईल कीं, "कारागीर लोकांची सहकारी तत्त्वावर संघटना करून त्यांच्या धंद्याचा विकास करणें यास औद्योगिक सहकार असें म्हणतात."

६८३६८ ८५० ०२२८०३